सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला : पुष्प ४२ वें

# संपूर्ण स्वदेशी

राज-
92e

लेखक

महात्मा गांधी

अनुवादक

भाऊ धर्माधिकारी

प्रथमावृत्ति : १९४७ ]

[ मूल्य २। रुपये

प्रकाशक
रघुनाथ गणेश जोशी,
सुलभ राष्ट्रीय ग्रंथमालेच्या
विश्वस्त मंडळाकरितां.
१२ टिळक रोड, पुणें २

संपादक
आचार्य शं. द. जावडेकर
आचार्य स. ज. भागवत

मुद्रक
अमरेन्द्र लक्ष्मण गाडगीळ
अग्रणी मुद्रणालय
आनन्द चेम्बर्स, आंबराई, पुणें ४

# आमचें प्रकाशन

(शिल्लक नसलेल्या पुस्तकांची किंमत दिलेली नाहीं.)

* १–२ **सत्याचे प्रयोग** (द्वितीयावृत्ति) : म. गांधी
* ३ **खादी-मीमांसा** (द्वितीयावृत्ति) : वाळूभाई मेहता
४ **स्वराज्य–शिष्टाई** : म. गांधी
५ **संयम कीं स्वैराचार?** (खंड १ ला) : म. गांधी
६ **हिंदलग्याचा प्रसाद** : काका कालेलकर
* ७ **हिंदुधर्माचीं मूलतत्त्वें व पुनर्घटना** (द्वितीयावृत्ति)
लेखक : एस्. राधाकृष्णन् २–८–०
* ८ **उपनिषदांतील दहा गोष्टी** (तृतीयावृत्ति)
लेखक : शंकरराव देव ०-१२-०
* ९ **विद्यार्थी-जीवन** (द्वितीयावृत्ति)
लेखक : श्री. स. महाजन
* १० **फिलिपाइन्सच्या स्वातंत्र्याचा इतिहास**
लेखक : त्र्यं. र. देवगिरीकर १–४–०
११ **कॉंग्रेसचा इतिहास** (द्वितीयावृत्ति)
लेखक : डॉ. पट्टाभिसीतारामय्या
१२ **समाजवादच कां?** (द्वितीयावृत्ति)
लेखक : जयप्रकाश नारायण २–०–०
१३ **खानबंधू** : महादेवभाई देसाई
१४ **जवाहरलाल नेहरू**: आत्मचरित्र (द्वितीयावृत्ति): पं. नेहरू १२–८–०
* १५ **विश्राम** (चतुर्थावृत्ति) : साने गुरुजी १–४–०
* १६ **भारतीय संस्कृति** (चतुर्थावृत्ति) : साने गुरुजी ३–०–०
१७ **प्रसाददीक्षा** : म. गांधी
१८ **भिल्ल साधु गुलामहाराज** : शं. वि. ठकार
* १९ **आधुनिक भारत** : आचार्य जावडेकर
* २० **हिमालयांतील प्रवास** (तृतीयावृत्ति)
लेखक : काका कालेलकर २–४–०

२१ **गांधजिींचें विविध दर्शन** ( द्वितीयावृत्ति )
संकलनकार : एस्. राधाकृष्णन् २–८–०

* २२ **जिवंत व्रतोत्सव** ( द्वितीयावृत्ति ) : काका कालेलकर ३–१२–०

२३ **गांधी-विचार-दोहन** : किशोरलाल मश्रूवाला

२४ **सत्याग्रही महाराष्ट्र** : प्रेमा कंटक ३–०–०

* २५ **अर्थशास्त्र कीं अनर्थशास्त्र ?** ( द्वितीयावृत्ति )
लेखक : जॉन रस्किन २–०–०

* २६ **जीवन-दर्शन** ( तृतीयावृत्ति )
लेखक : महाकवि खलिल जिब्रान १-१२-०

२७ **ग्रामोद्योगाचें अर्थशास्त्र** : जे. सी. कुमारअप्पा

२८ **बापू** : घनश्यामदास बिडला १–८–०

२९ **संस्कृतीचें भवितव्य** ( द्वितीयावृत्ति ) : एस्. राधाकृष्णन् १–४–०

३० **महात्मा गौतमबुद्ध** : " " १–०–०

३१ **जीवन आणि साहित्य** : आचार्य स. ज. भागवत २–८–०

३२ **प्राचीन साहित्य** : कविसम्राट् रवींद्रनाथ ठाकुर १–८–०

३३ **संयम कीं स्वैराचार ?** ( खंड २ रा ) : म. गांधी १-१२-०

३४ **हिंदु-मुसलमान-ऐक्य** : आचार्य जावडेकर ३–०–०

३५ **गीताहृदय** ( तृतीयावृत्ति ) : साने गुरुजी ०-१२-०

३६ **हिंदूंचें समाजकारण** : काका कालेलकर २–४–०

३७ **द्विखंड हिंदुस्थान** : डॉ. बाबू राजेंद्रप्रसाद ११–०–०

३८ **काँग्रेस-कथा** ( द्वितीयावृत्ति ) : गो. आ. देशपांडे ४–८–०

३९ **भगवान् बुद्धासाठीं** : शंकरराव देव ३–८–०

४० **आचार्य कृपलानी** : निवडक लेख व भाषणें ३–०–०

४१ **वाल्मिकी–आश्रमांतील प्रवचनें** : आचार्य जावडेकर १–०–०

४२ **संपूर्ण स्वदेशी** : म. गांधी २–४–०

---

*हीं पुस्तकें मुंबई, मध्यप्रांत व वऱ्हाड यांतील सरकारी विद्याखात्यांनीं शाळांतील वाचनालयांकरितां व बक्षिसांकरितां मंजूर केलीं आहेत.

नगर वाचनालय
ता. ........
सातारा.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | नवें स्वरूप | १ |
| २ | स्वदेशी | ५ |
| ३ | ‘ स्वदेशी ’ विषयीं आणखी थोडें | ९ |
| ४ | ‘ स्वदेशी ’ संबंधीं संवाद | १२ |
| ५ | ग्रामोद्योग म्हणजे काय ? | १६ |
| ६ | ग्रामोद्योग | १८ |
| ७ | अ. भा. ग्रामोद्योगसंघ : त्याचा अर्थ व व्याप्ति | २४ |
| ८ | त्याचा अर्थ | ३२ |
| ९ | सुरवात कशी करावी ? | ३४ |
| १० | कातडयाचा धंदा | ४३ |
| ११ | “श्रम वांचविणारीं यंत्रें कां नकोत ?” | ४९ |
| १२ | ग्रामोद्योगसंघ हा काय आहे ? | ५२ |
| १३ | निराशा कसली ? | ५७ |
| १४ | भ्रामक समजुती | ६२ |
| १५ | एक घातुक समजूत | ६६ |
| १६ | परत ग्रामोद्योगांकडे | ७० |
| १७ | एक महान् प्रयोग | ७३ |
| १८ | अपूर्व प्रदर्शन | ७६ |
| १९ | खरी देशभक्ति | ८१ |
| २० | ग्राम-प्रदर्शनें | ८४ |
| २१ | गांवकऱ्यांचें प्रदर्शन | ८८ |
| २२ | दरसाल भरणारी अध्यापनशाला | ९४ |
| २३ | वेतनाचें प्रमाण ठरविण्याची जरुरी | ९६ |

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | हिंदी उद्योगधंदे | ... ... | १०० |
| २५ | खरी स्वदेशी | ... ... | १०२ |
| २६ | घिप्पाड राक्षस आणि ठेंगू | ... ... | १०४ |
| २७ | विदेशी वि. स्वदेशी | ... ... | १०९ |
| २८ | खादी आणि स्वदेशी | ... ... | १११ |
| २९ | कांहीं प्रश्न | ... ... | ११३ |
| ३० | फक्त खादीच कां ? | ... ... | ११५ |
| ३१ | "मी यंत्रांविरुद्ध नाहीं" | ... ... | ११७ |
| ३२ | यंत्र-पद्धति | ... ... | १२० |
| ३३ | कारखानदारी | ... ... | १२२ |
| ३४ | बिकट प्रश्न | ... ... | १२४ |
| ३५ | यंत्रांची तरफदारी | ... ... | १२६ |
| ३६ | स्वदेशी उद्योग व भेदभाव | ... ... | १२८ |
| ३७ | वर्धा-शिक्षण-योजनेचा अर्थ | ... ... | १३२ |
| ३८ | ढिगांवारी उत्पादन वि. जनतेकडून उत्पादन | ... | १३७ |

---

नगर वाचनालय
ता. ........
सातारा.

# संपूर्ण स्वदेशी

## नवें स्वरूप : : १

[ गेले कांहीं महिने स्वदेशी चळवळींत काम करणारी कांहीं मंडळी गांधीजींच्याकडे येऊन 'स्वदेशीं'ची एकादी व्यापक व्याख्या आपल्या मार्गदर्शनासाठीं मागत होती. अशी सर्वव्यापी व्याख्या तयार करीत असतांना व दक्षिण हिंदुस्थानकडील सहकाऱ्यांशीं त्यासंबंधीं चर्चा करीत असतांना, अशी व्याख्या करणें जवळजवळ अशक्य आहे आणि 'स्वदेशी' हाच तिची व्याख्या आहे असें गांधीजींना आढळून आलें. ही एक अशी वृत्ति आहे कीं, रोजच्या रोज तिचा विकास होत आहे आणि तिच्यांत बदल पडून येत आहे. तिची व्याख्या बनविण्याच्या प्रयत्नाला यश येणेंच शक्य नाहीं. स्वदेशी वृत्तीच्या विकासाची गति मात्र त्यामुळें कुंठित होण्याचा संभव आहे. म्हणून मग त्यांनीं अ. भा. स्वदेशी लीगच्या आणि इतर तत्सम संस्थांच्या मार्गदर्शनासाठीं एक कामचलाऊ नियम पुढीलप्रमाणें सुचविला:—

अ. भा. स्वदेशी लीगच्या उद्दिष्टाच्या दृष्टीनें 'स्वदेशी'मध्यें अशा उपयुक्त वस्तूंचा समावेश होतो कीं, ज्या वस्तू लहान लहान उद्योगांच्या द्वारा हिंदुस्थानांतच तयार होतात व त्या उद्योगधंद्यांना पाठिंबा मिळण्यासाठीं लोकमानस शिक्षित करण्याची जरूर आहे आणि ते धंदे वस्तूंच्या किंमती ठरवितांना व त्यांत काम करीत असणाऱ्या कामगारांच्या मजुरीकडे व सुस्थितीकडे लक्ष पुरवितांना अ. भा. स्वदेशी लीगचें मार्गदर्शन स्वीकारतील. म्हणून

'स्वदेशी'मध्यें मोठ्या व संघटित अशा कारखान्यांत तयार झालेल्या वस्तू येत नाहींत, त्या कारखान्यांना अ. भा. स्वदेशी लीगच्या मदतीची जरूर नाहीं, त्यांना सरकारची मदत हक्कानें मिळवितां येते आणि ती ते मिळवितातहि."

हा नियम ऐकून कार्यकर्त्यांना विस्मयाचा धक्काच बसला. अर्थात् १९३४च्या जून महिन्यांत गांधीजी जेव्हां हरिजन-दौऱ्यावर असतांना मुंबईला गेले होते त्या वेळीं लीगचे कांहीं सभासद आणि गांधीजी यांच्यामध्यें यासंबंधीं चर्चा झाली. या चर्चेचा सारांश पुढें दिल्याप्रमाणें आहे:—]

"मीं स्पष्टपणें सांगितलें आहे कीं, हा मीं घालून दिलेला नियम स्वदेशी लीगच्या मार्गदर्शनासाठीं आहे. स्वदेशीचें समग्र क्षेत्र व्यापण्याचा त्याचा उद्देश नाहीं. लीगनें आपल्या कामाची व्याप्ति लहान लहान, विशेषतः घरगुती उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्यापुरती आणि त्यांचा प्रचार करण्यापुरतीच मर्यादित ठेवावी आणि मोठमोठ्या, संघटित उद्योगधंद्यांना आपल्या क्षेत्रांतून वगळावें अशी माझी एक सूचना आहे. अशी सूचना करण्यांत मोठ्या उद्योगधंद्यांची किंमत कमी करावी किंवा त्यांच्यामुळें देशाला जो लाभ झाला आहे अथवा पुढें होण्याजोगा आहे त्याकडे दुर्लक्ष करावें असा हेतु नाहीं. पण स्वदेशी लीगसारख्या संस्थेनें आपण होऊन या उद्योगधंद्यांचे जाहिरातदार बनण्याचें काम आतांपर्यंत केलें तसें करण्याचें कांहीं कारण नाहीं. त्यांच्यापाशीं पुष्कळ साधन-संपत्ति पडलेली आहे आणि स्वतःची काळजी ते उत्तम प्रकारें घेऊं शकतात. स्वदेशीची भावना बऱ्याच प्रमाणांत उत्पन्न झाली आहे आणि स्वदेशी संघांच्या प्रयत्नांवांचूनहि या भावनेची त्यांना मदत होते. स्वदेशी संघांना जर कांहीं उपयुक्त काम करावयाचें असेल तर त्यांनीं कसाबसा जीव धरून राहणाऱ्या उद्योगांवर आपलें लक्ष गुंतवावें. मोठ्या, संघटित अशा कारखान्यांच्या मालाची जाहिरात करण्याच्या कसल्याहि प्रयत्नाचा परिणाम फक्त मालाच्या किंमती चढण्यांतच होईल. ग्राहकांवर तो अन्याय होईल. भरभराटींत असलेल्या एखाद्या व्यापारी संस्थेला मदत करण्याकरितां सेवावृत्तीची एखादी संस्था स्थापन करणें म्हणजे श्रमाचा अपव्यय आहे. अशा कारखान्यांची वाढ आणि प्रगति होण्याकरितां

आमचे श्रम साह्यभूत झाले आहेत अशी आम्हीं आपली भ्रामक समजूत करून घेऊं नये. हा खोटा आत्मसंतोष होईल, त्याला वस्तुस्थितीचा आधार मिळणार नाहीं. १९२० सालीं स्वदेशी चळवळ सुरू करण्याच्या वेळीं फाझलभाईंशीं माझें जें संभाषण झालें त्याची मला आठवण होते. त्यांनीं मला बरोबर सांगितलें कीं 'तुम्ही काँग्रेसवाले आमचे जाहिरातदार बनलां तर आमच्या मालाला तेजी येईल आणि आमच्या वस्तूंच्या किंमती वाढतील, याखेरीज़ देशाचें कांहींहि कल्याण होणार नाहीं.' त्यांचें हें म्हणणें तंतोतंत बरोबर होतें. पण मीं जेव्हां त्यांना सांगितलें कीं, मी हातसुताच्या आणि हातविणीच्या खादीला उत्तेजन देणार आहें, कारण तिची अत्यंत खेदकारक उपेक्षा झाली आहे आणि उपाशी मरत असलेल्या लक्षावधि बेकारांची सेवा करावयाची असेल तर तिचें पुनरुज्जीवन केलें पाहिजे, तेव्हां ते थक्कच झाले.

पण खादी हाच एक तसा उद्योग आहे असें नाहीं. म्हणून, आज लोकाश्रयाची जरूर असणारे असे जे लहान प्रमाणावरचे, छोटेछोटे असंघटित उद्योगधंदे आहेत त्यांच्याकडेहि तुम्ही आपलें लक्ष पुरवावें आणि त्यांच्यासाठींहि शक्ति खर्च करावी अशी माझी तुम्हांला सूचना आहे. त्यांना वांचविण्यासाठीं जर कांहीं प्रयत्न केला नाहीं तर ते समूळ नाहींसे होण्याचा संभव आहे. त्यांपैकीं कांहीं धंद्यांना मोठ्या प्रमाणावर चाललेल्या कारखान्यांनीं मागें सारलें आहे; या कारखान्यांत तयार झालेल्या मालांनीं बाजार भरून टाकले आहेत. असे धंदे तुम्हांला मदतीसाठीं हांक देत आहेत.

साखरेचा धंदाच घ्या. कापड-धंद्याच्या खालोखाल सर्वांत मोठा धंदा कोणता असेल तर तो साखरेचा. आमच्या साह्याची त्याला गरज नाहीं. साखरकारखान्यांची झपाट्यानें वाढ होत आहे. या धंद्याची वाढ करण्यासाठीं सार्वजनिक संस्थांनीं कांहींच मदत केलेली नाहीं. अनुकूल कायदा झाल्यामुळेंच त्याची वाढ झाली आहे. आणि आज हा धंदा इतका भरभराटीस आला आहे आणि पसरला आहे कीं, गुळाचीच उत्पत्ति मागें पडली आहे. पोषणाच्या दृष्टीनें गुळाची किंमत पांढऱ्या शुभ्र साखरेपेक्षां खात्रीनें अधिक आहे. या बहुमोल ग्रामोद्योगालाच आपल्या मदतीची जरूर आहे. हा एक असा स्वतंत्र विषय

आहे कीं, त्यांत संशोधनाला आणि भरपूर मदत देण्याला जागा आहे. हा धंदा जिवंत ठेवण्याला कोणते मार्ग पत्करले पाहिजेत आणि कोणतीं साधनें वापरलीं पाहिजेत याचा शोध आपणांला केला पाहिजे.

लहानलहान उद्योगधंद्यांना आपण मदत केली तर आपण राष्ट्राच्या संपत्तींत भर टाकतों याविषयीं माझ्या मनांत बिलकुल शंका नाहीं. या घरगुती धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांचें पुनरुज्जीवन करणें हीच खरी स्वदेशी आहे याविषयीं मला यत्किंचित्‌हि संशय नाहीं. यामुळेंच कोट्यवधि मूक बांधवांना मदत होणार आहे. लोकांच्या उत्पादक बुद्धीला आणि कल्पकतेलाहि यामुळें वाव मिळतो. कामाची गरज असणाऱ्या देशांतील शेंकडों तरुणांना यामुळें उपयुक्त काम देतां येतें. आज फुकट जाणारी शक्ति यामुळें कामीं लावतां येईल. अधिक प्राप्ति करून देणाऱ्या धंद्यांत गुंतलेल्यांनीं ते आपले धंदे सोडावे आणि लहान धंद्यांत शिरावें असें मी म्हणत नाहीं. चरख्याच्या बाबतींत मीं म्हटलें त्याप्रमाणें, बेकारी आणि दारिद्र्य यांनीं पीडलेल्या लोकांनींच हे धंदे हातीं घ्यावे आणि आपल्या अल्प प्राप्तींत आणखी थोडी भर टाकावी, असें माझें सांगणें आहे.

यावरून असें दिसून येईल कीं, कार्यक्रमांत मीं सुचविला तसा बदल केल्यानें मोठ्या उद्योगधंद्यांना कोणत्याहि प्रकारें धोका पोंचत नाहीं. माझें तुम्हां राष्ट्रसेवकांना एवढेंच सांगणें आहे कीं, तुम्ही आपलें कार्य लहानलहान उद्योगां-पुरतेंच मर्यादित ठेवा आणि मोठ्या धंद्यांना आजच्याप्रमाणें आपली स्वतःची काळजी घेऊं द्या. माझ्या कल्पनेप्रमाणें लहान धंदे मोठ्या धंद्यांची जागा घेणार नाहींत तर त्यांना पूरक होतील. मोठ्या कारखानदारांनीं या शुद्ध मानवसेवेच्या कामीं लक्ष घालावें याबद्दल त्यांचें मन वळविण्याची सुद्धां उमेद मी बाळगतों. मी कारखानदारांचाहि हितचिंतक आहें आणि मला शक्य झालें तेव्हां त्यांना मी मदत केल्यावांचून राहिलेलों नाहीं याची साक्ष तेच देतील."*

* जुलै १९३४मध्यें वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाला.

## स्वदेशी

: : २

गेल्या वर्षी उपवासांतून माझी प्रकृति बरी झाल्यानंतर, स्वदेशीमध्यें लक्ष घालणाऱ्या मंडळींनीं आपल्याला येणाऱ्या पुष्कळ अडचणींना उत्तर देतां येईल अशी एक व्याख्या बनवावयास मला सांगितलें. कापडाच्या बाबतींत स्वदेशीच्या ज्या निरनिराळ्या छटा आहेत त्याहि मला लक्षांत घ्यावयाच्या होत्या. मला सुचविण्यांत आलेल्या सर्व व्याख्या मीं स्वतःपुढें ठेवल्या. श्री. शिवराव व श्री. जालभाई नवरोजी यांच्याशीं आणि इतर अनेकांशीं मीं पत्रव्यवहार केला. पण सर्व बाबतींत लागू पडेल अशी व्याख्या मला बनवितां आली नाहीं आणि तशी एक सर्वव्यापक व्याख्या बनविणें अशक्य आहे असें मला आढळून आलें. मी देशाच्या या कोपऱ्यापासून त्या कोपऱ्यापर्यंत प्रवास करीत असतांना मला परिस्थितीचें अवलोकन करण्याची संधि मिळाली आणि स्वदेशी संघ कसे काय काम करीत आहेत तेंहि पाहावयास मिळालें. त्यावरून मी या निर्णयाला आलों कीं, आज चाललेलें कार्य म्हणजे लोकांच्या डोळ्यांत धूळ फेंकणेंच आहे. अर्थात् तें नकळत होत आहे आणि पुष्कळ समर्थ कार्यकर्ते आपली शक्ति निष्फळ प्रयत्नांत खर्च करीत आहेत. ते आपली स्वतःची फसवणूक करून घेत आहेत. ही भाषा कडक आहे आणि माझी मनःस्थिति तीवरून बरोबर व्यक्त होते; तथापि ती स्वदेशी संघांत काम करणाऱ्या मंडळींना ठपका देण्याकरितां मीं वापरलेली नाहीं. ते आपल्या परीनें जास्तींत जास्त करीत

आहेत, पण आपण एका दुष्ट चक्रांत फिरत आहों आणि आत्मवंचना करून घेत आहों याचें त्यांना भान नाहीं.

माझें म्हणणें मी स्पष्ट करतों. आम्ही अशा वस्तूंचीं प्रदर्शनें भरवीत होतों कीं, ज्यांना विशेष मदतीची किंवा विक्रीकरितां जाहिरात करण्याची गरज नाहीं. अशा वस्तूंच्या बाबतींतील आमच्या हस्तक्षेपानें एक तर त्या मालांच्या किंमती वाढतील किंवा तेजींत असलेल्या पण परस्परांशीं स्पर्धा करणाऱ्या कंपन्यांमध्यें बाधक चढाओढ लागेल.

कापड–गिरण्या, साखर–कारखाने आणि तांदळाच्या गिरण्या यांना आम्ही मोफत मदत करतों असा आम्ही दावा करीत असूं; पण त्यामुळें आम्ही अनुक्रमें खेडेगांवचा चरखा, हातमाग आणि त्याचें कापड (खादी), खेड्यांतला उंसाचा चरक आणि त्यापासून उत्पन्न होणारा जीवनसत्त्वयुक्त पोषक गूळ तद्वत्‌च काकवी, आणि विरटी व तीपासून मिळणारा असडीक तांदूळ (ज्याचें जीवनसत्त्वयुक्त कवच विरटीनें जसेंच्या तसेंच राहतें) मारून टाकतों. म्हणून चरखा, चरक आणि विरटी हीं टिकून राहण्याची शक्यता कितपत आहे याचा शोध लावणें आणि त्यांच्यापासून उत्पन्न होणाऱ्या वस्तूंची प्रसिद्धि करून, त्यांचे गुण शोधून काढून, या धंद्यांत काम करणाऱ्यांची स्थिति व यंत्रांनीं या धंद्यांतील किती कामगारांना बेकार केलें तें समजावून घेऊन, त्याचप्रमाणें त्यांचें ग्रामीण स्वरूप टिकवून सुद्धां कारखान्यांच्या चढाओढीला ते पुरून उरतील इतके समर्थ त्यांना बनविण्याच्या दृष्टीनें त्यांच्यांत कशा सुधारणा करतां येतील तें शोधून काढणें, हें आपलें स्पष्ट कर्तव्य आहे. आम्ही त्यांची किती भयंकर व अक्षम्य हेळसांड केली आहे! हे धंदे जिवंत ठेवण्यांत कापडाच्या, साखरेच्या किंवा तांदळाच्या गिरण्यांशीं कसलाहि वैरभाव नाहीं. या गिरण्यांमधून उत्पन्न होणारा माल तशाच प्रकारच्या विदेशी मालापेक्षां अगोदर पसंत केला पाहिजे. विदेशी स्पर्धेमुळें जर त्या नष्ट होण्याचा धोका असेल तर त्यांना अवश्य तो पाठिंबा मिळाला पाहिजे. पण त्यांना तशी गरज नाहीं. विदेशी गिरण्यांची चढाओढ असून सुद्धां त्या भरभराटींत आहेत. अवश्यकता जर कशाची असेल तर ती ग्रामीण धंदे व त्यांत काम करणारे

लोक यांना मोठ्या शक्तीच्या साह्यानें चालणाऱ्या यंत्रांच्या भरडून टाकणाऱ्या स्पर्धेपासून रक्षण मिळण्याची आहे–मग तीं यंत्रें हिंदुस्थानांत काम करीत असोत वा परदेशांत. खादी, गूळ व असडीक तांदूळ यांना अंगभूत किंमत नसेलहि कदाचित् आणि ते नष्ट होणेंच इष्ट असेल. पण एका खादीव्यतिरिक्त ऊंस गाळणें आणि तांदूळ सडणें या धंद्यांवर उपजीविका करणाऱ्या लाखों ग्रामीण लोकांची स्थिति काय झाली आहे हें समजून घेण्याचा कांहीच प्रयत्न माझ्या माहितीप्रमाणें तरी निदान झालेला नाहीं. खरोखर, पुष्कळ देशभक्तांना पुरेल इतकें भरपूर हें काम आहे. वाचक म्हणतील, 'अहो, पण हें फार अवघड काम आहे'. मला तें मान्य आहे. पण तें अत्यंत महत्त्वाचें आणि तितकेंच मनोरंजक आहे. हीच खरीखुरी, फलप्रद आणि शंभर टक्के 'स्वदेशी' आहे असा माझा दावा आहे.

पण मीं तूर्त या प्रश्नाला नुसता ओझरता स्पर्शच केला आहे. मीं केवळ नमुन्यादाखल तीन मोठे, संघटित उद्योग घेतले आणि स्वयंस्फूर्तीनें काम करणाऱ्या स्वदेशी संघांनीं याच प्रकारच्या तीन असंघटित ग्रामोद्योगांवर आपलें लक्ष कसें केंद्रित केलें पाहिजे तें दाखविलें. कारण, हे ग्रामीण उद्योग स्वयंस्फूर्त, बुद्धियुक्त आणि संघटित मदतीवांचून आज नष्ट होत चालले आहेत.

यांव्यतिरिक्त आणखी असंख्य ग्रामीण तसेच नागरी धंदे आहेत. त्यांनाहि लोकाश्रयाची गरज आहे. तो मिळेल तरच ते जगतील आणि त्यांवर पोटाकरितां अवलंबून असणाऱ्या हजारों गरीब कारागिरांना जगवूं शकतील. या दिशेनें केलेलें अल्प कार्यहि परिणामकारक ठरतें. या कामीं खर्च केलेला प्रत्येक तास म्हणजे कोणा सुयोग्य कामगाराच्या पोटाची सोय होय.

या दिशेनें सुव्यवस्थित पायावर जर काम केलें तर तें करणारी संस्था स्वाश्रयी होईल, नवीन बुद्धीला प्रेरणा मिळेल, शिक्षितांना आणि अशिक्षितांना दोघांनाहि कोणाला बेकार न करतां प्रतिष्ठितपणाचें काम मिळेल आणि वाढतें दारिद्र्य असलेल्या या देशाच्या संपत्तींत कोटयवधींची वार्षिक भर पडेल.

सगळ्या स्वदेशी संघांना पुरून उरेल इतकें भरपूर, लाभदायी आणि मनोरंजक काम या क्षेत्रांत आहे. वर्किंग कमिटीनें 'स्वदेशी'संबंधीं नुकत्याच

केलेल्या ठरावाचा* असा आणि याहूनहि अधिक अर्थ आहे. देशांतील कल्पक प्रतिभेला या क्षेत्रांत अमर्याद काम मिळण्याजोगें आहे.+

* वर्किंग कमिटीनें ता. ३० जुलै १९३४च्या बनारसच्या बैठकींत खालील ठराव मंजूर केला:—

" 'स्वदेशी'संबंधींच्या काँग्रेसच्या धोरणाविषयीं शंका उपस्थित केल्या गेल्यामुळें तत्संबंधींची काँग्रेसची भूमिका निःसंदिग्ध शब्दांत पुनः सांगणें अवश्य झालें आहे. कायदेभंगाच्या चळवळीच्या वेळीं कांहींहि केलें गेलें असो, काँग्रेसच्या व्यासपीठांवर आणि काँग्रेसच्या प्रदर्शनांत गिरणीचें कापड व हातकताई-हातविणाईची खादी यांमध्यें स्पर्धा चालूं दिली जाणार नाहीं. काँग्रेस-अनुयायांनीं इतर कापडावर बहिष्कार घालून फक्त हातसुताची व हातविणीचा खादीच वापरावी व तिच्याच वापराला उत्तेजन द्यावें, अशी त्यांचेकडून अपेक्षा आहे.

कापडाव्यतिरिक्त इतर वस्तूंच्या बाबतींत वर्किंग कमिटीनें सर्व काँग्रेस-संस्थांच्या मार्गदर्शनाकरितां पुढील नियम ठरविला आहे:—

'वर्किंग कमिटीचें असें मत आहे कीं, काँग्रेस-संस्थांच्या स्वदेशी-विषयक चळवळी अशा उपयुक्त वस्तूंपुरत्याच मर्यादित राहतील कीं ज्या ग्रामीण आणि इतर लहान उद्योगांच्या द्वारा हिंदुस्थानांतच तयार होतात, ज्या उद्योग-धंद्यांना पाठिंबा मिळण्यासाठीं लोकमानस शिक्षित करण्याची गरज आहे आणि जे उद्योगधंदे वस्तूंच्या किंमती ठरवितांना व आपल्या हाताखालीं असणाऱ्या कामगारांची मजुरी व सुस्थिति पाहतांना, काँग्रेस-संस्थांचें मार्गदर्शन स्वीकारतील!

देशांत स्वदेशीची भावना वाढविण्याच्या व खासगी उपयोगाकरितां फक्त स्वदेशीवस्तूंनाच उत्तेजन देण्याच्या काँग्रेसच्या आजवरच्या अखंडित धोरणांत कांहीं फरक झाला आहे असा या नियमाचा अर्थ कोणीं करूं नये. मोठ्या व संघटित उद्योगधंद्यांना सरकारची मदत हमखास घेतां येत असल्यामुळें व ते ती घेत असल्यामुळें काँग्रेस-संस्थांच्या मदतीची किंवा त्यांच्यासाठीं काँग्रेसनें कांहीं प्रयत्न करावा अशी कसलीहि गरज त्यांना नसते."

+हरिजन, १०-८-१९३४.

## ‘स्वदेशी’विषयीं आणखी थोडें : : ३

१० ऑगस्टच्या ‘हरिजन’मध्यें ‘स्वदेशी’विषयीं व्यक्त केलेल्या विचारांचें सूत्र मी पुनः हातीं घेऊं इच्छितों. हरिजनांचे विशिष्ट धंदेच घ्या. हरिजनांमध्यें ज्या दोन हजारांवर जाती आहेत त्यांना अर्थ आहे. त्यांपैकीं बऱ्याचशा जाती टोपल्या बनविणें, झाडू बनविणें, दोर वळणें, दरी विणणें इत्यादि धंद्यांच्या द्योतक आहेत. या सर्वांची जर एक पूर्ण यादी तयार केली तर ती फार मोठी होईल. या धंद्यांना एक तर उत्तेजन तरी दिलें पाहिजे, किंवा ते निरुपयोगी अथवा बिनाकिफायतशीर असतील तर ते जाणूनबुजून नष्ट तरी केले पाहिजेत. पण ते निरुपयोगी आहेत किंवा उपयोगी आहेत, किफायतशीर आहेत अथवा बिनकिफायतशीर आहेत हें ठरवावयाचें कोणीं ? जर एकादी खरीखुरी स्वदेशी संघटना असेल तर या असंख्य हुन्नरांच्या बाबतींत सत्य काय आहे हें शोधून काढून या धंदेवाल्यांच्याकडे लक्ष पुरविणें हें तिचें काम आहे. मी ज्या शाईनें हें लिहीत आहें ती तेताली येथें तयार झाली आहे. तीवर अदमासें १२ मजूर जगत आहेत. हा धंदा प्रतिकूल परिस्थितीशीं झगडा करीत चालला आहे. माझ्याकडे तीन वेगवेगळ्या शाई बनविणाऱ्यांनीं आपापले नमुने पाठविले होते. ते सर्व तेतालीच्या प्रमाणेंच बिकट परिस्थितींत आहेत. मला त्यांच्याविषयीं सहानुभूति उत्पन्न झाली. मीं त्यांच्याशीं पत्रव्यवहार सुरू केला. पण त्यांच्या बाबतींत मला अधिक कांहीं करतां आलें नाहीं. एकादी स्वदेशीची

संस्था असेल तर ती या नमुन्यांची शास्त्रीय पद्धतीनें परीक्षा करील, त्यांना मार्गदर्शन करील आणि त्यांच्यांत जे होतकरू असतील त्यांना उत्तेजन देईल. हा एक चांगला वाढता उद्योग आहे; त्याला उत्तम रसायनशास्त्राच्या ज्ञानाची गरज आहे.

कानपूर येथें, एका गृहस्थानें जवळच्या एका खेड्यांत त्याचा मित्र तयार करीत असलेल्या कागदाचे नमुने माझ्याकडे पाठविले. या व्यवसायासंबंधीं मीं चौकशी केली. या धंद्यांत अदमासें नऊ माणसें काम करीत आहेत. हा कागद मजबूत आणि गुळगुळीत होता. पण तो लिहिण्याच्या दृष्टीनें चांगला नव्हता. या कारखान्यांत काम करणाऱ्या माणसांचा निर्वाह अगदीं कसाबसा चालला आहे. या धंद्याचें कसब जाणणारा माणूस इतका वृद्ध आहे कीं त्याच्या गोवऱ्या स्मशानांत गेल्या आहेत. जर या व्यवसायाला योग्य मार्गदर्शन मिळालें नाहीं तर तो सबंध व्यवसाय त्याच्याबरोबरच नष्ट होईल. कागदाला जर भरपूर मागणी आली तर गिरणीच्या कागदाच्या किंमतीनें हा कागद देतां येईल असें मला सांगण्यांत आलें. कागदाची रोजची वाढती मागणी हातकागद कधींहि पुरवूं शकणार नाहीं हें मला माहीत आहे. पण सात लक्ष खेडीं आणि त्यांचे हस्तव्यवसाय यांवर प्रेम करणारे लोक सहज मिळण्याजोगा असेल तर हात–कागद नेहमीं वापरूं इच्छितील. हात–कागद वापरणाऱ्या मंडळींना त्याच्यांत असणारा आनंद कांहीं वेगळाच असतो हें माहीत आहे. तो प्रसिद्ध अमदाबादी कागद कोणाला माहीत नाहीं ? टिकाऊपणांत आणि गुळगुळीतपणांत कोणता गिरणीचा कागद त्याला मारूं शकेल ?

जुन्या पद्धतीच्या जमाखर्चाच्या वह्या अजूनहि याच कागदाच्या करतात. पण इतर अनेक असल्याच धंद्यांप्रमाणें हाहि धंदा मरणोन्मुख होत चालला आहे. जर त्याला जरा उत्तेजन मिळालें तर तो कधीं मरणार नाहीं. या धंद्यावर जर देखरेख राहिली तर त्यांत होणाऱ्या क्रिया सुधारतां येतील आणि या हात–कागदांत आज जे दोष दिसत आहेत ते सहज काढून टाकतां येतील. अशा प्रकारच्या अज्ञात व्यवसायांत काम करणाऱ्या असंख्य लोकांच्या आर्थिक परिस्थितीची अवश्य पाहणी करण्याजोगी आहे. त्यांच्याकडे लक्ष देणाऱ्यांचें मार्गदर्शन

तें मोठ्या आनंदानें स्वीकारतील, त्यांचा सल्ला घेतील आणि त्यांचे ऋणी राहतील.

खऱ्या 'स्वदेशी'चें हें क्षेत्र किती उत्कृष्ट पण बिन-कसलेलें आहे हें दाखविण्यासाठीं मीं पुरेशीं उदाहरणें दिलीं आहेत असें मला वाटतें. तें खूप वाढवितां येण्याजोगें आहे, फार भांडवल न गुंतवितां देशांत नवीन संपत्ति निर्माण करण्याची शक्ति त्यांत आहे, त्याचप्रमाणें आज काम नसल्यामुळें उपासमार होत असलेल्यांना प्रतिष्ठित काम देण्याची ताकतहि त्यांत आहे.*

* हरिजन, १४।९।१९३४.

## ‘स्वदेशी’संबंधीं संवाद : : ४

[ ‘ स्वदेशी ’ वरील गांधीजींच्या लेखांनीं लोकांना स्वतंत्रपणें विचार करण्याला पुष्कळच खाद्य पुरविलें आणि गांधीजींच्या मनासारखी संघटना निघेपर्यंत तें काम तसेंच चालूहि राहिलें पाहिजे. या प्रश्नासंबंधीं कांहीं मित्र गांधीजींना भेटावयास आले होते, त्यांच्यामध्यें झालेली चर्चा गांधीजींची भूमिका अधिक स्पष्ट करण्याकरितां मी थोडक्यांत देत आहें. म. दे. ]

प्रश्न—‘जुन्या’ स्वदेशीहून ही ‘नवी’ स्वदेशी कोणत्या प्रकारें भिन्न आहे ?

उत्तर—जुन्या स्वदेशींत माल आपल्या देशांतच उत्पन्न झालेला असला पाहिजे यावर जोर दिला जात होता. तो तयार कसा झाला, कोणीं केला किंवा पुढें त्याच्याविषयीं आशा कितपत बांधतां येईल या गोष्टींचा विचारच केला जात नव्हता. मीं जी मोठ्या, संघटित उद्योगधंद्यांना हरकत घेतली आहे ती ते ‘स्वदेशी’ नाहींत म्हणून नव्हे, तर त्यांना विशेष पाठिंबा देण्याची जरूर नाहीं म्हणून. ते आपल्या पायावर उभे राहूं शकतात आणि आज आपण जागृत झालों आहों अशा परिस्थितींत, त्यांना बाजारावर सहज हुकमत चालवितां येते. नव्या स्वरूपाप्रमाणें ( तें ‘नवें’ असेल तर ) आमच्या स्वदेशी संघांनीं सर्व ग्रामीण उद्योगधंदे शोधून काढावे आणि आज त्यांची परिस्थिति काय आहे हें पाहावें असें मी म्हणेन. आपल्या ज्ञानाचा खेडेगांवच्या

लोकांना उपयोग करूं देतील असे तज्ज्ञ व रसायनशास्त्रज्ञ आपल्याकडे असतील. तुम्हीं तयार केलेल्या वस्तू आम्ही आमच्या तज्ज्ञांच्या मदतीनें तपासून पाहून त्या सुधारण्याच्या दृष्टीनें तुम्हांला सूचना करूं, असें आपण खेडयांतील हस्तव्यवसायी लोकांना सांगूं आणि आमच्या शर्ती ते मान्य करीत असतील तर त्यांच्या वस्तूहि आम्ही विकून देऊं.

प्र.—आपण दिसेल तो हस्तव्यवसाय हातीं घेणार काय ?

उ.—असेंच कांहीं नाहीं. मी एक एक धंदा तपाशीन, गांवच्या आर्थिक जीवनांत त्याचें स्थान काय आहे हें शोधून घेईन आणि त्यांच्यांत अंगभूतच गुण असल्यामुळें त्यांना उत्तेजन दिलें पाहिजे असें जर मला वाटलें, तर मी त्यांना उत्तेजन देईन. आतां उदाहरणार्थ पाहा, खेडयांत तयार झालेली केरसुणी काढून टाकून आधुनिक झाडू किंवा ब्रश घ्यावयाला मी तयार होणार नाहीं. मी कस्तुरबाला आणि घरच्या इतर बायकांना दोन्हींचे गुण काय आहेत तें विचारीन. मात्र लक्षांत ठेवा कीं फायद्याचा विचार मी सर्व दृष्टींनीं करीन. या दृष्टीनें केरसुणीच पसंत करावी असें मी म्हणेन; कारण तिचा उपयोग करण्यांत लहान लहान जीवजंतूंच्याविषयीं कोमलता आणि दयाभावच दिसून येतो पण ब्रश काय करतो ? तो एका झटक्यांत या सर्वांना साफ करून टाकतो ? अशा रीतीनें केरसुणीच्या पाठीमागें एक सबंध तत्त्वज्ञान मला दिसतें; कारण सूक्ष्म जीव आणि (विधात्याच्या दृष्टीनें) सूक्ष्म मानव यांच्यांत तो (विधाता) कांहीं भेद करतो असें मला वाटत नाहीं.

याप्रमाणें खेडेगांवांतले जे हस्त–व्यवसाय आणि उद्योग मरूं घातले आहेत पण जे त्यांच्या अंगभूत गुणांमुळें आणि इतर उपयुक्ततेमुळें जगविण्याच्या लायकीचे आहेत असे सर्व व्यवसाय व उद्योग मी उचलीन आणि अशा रीतीनें माझे शोध होत राहतील. उदाहरणार्थ, आपलें क्षुल्लक दांतणच घ्या. मुंबईच्या बहुतेक रहिवाशांना जर दांतण मिळालें नाहीं तर त्यांचे दांत बिघडतील याची मला खात्री आहे. या दांतणाच्या ऐवजीं दांताचे ब्रश वापरण्याची कल्पना कांहीं मला सहन होणार नाहीं. हे ब्रश आरोग्य–विघातक असतात. एकदां त्यांचा उपयोग केला कीं ते टाकून देण्याच्याच लायकीचे

होतात. त्यांतील रोग–जंतू मारण्याकरितां कितीहि जंतुनाशक औषधें तुम्ही वापरा, ते नव्या ब्रशांइतके चांगले कधींच होणार नाहींत. पण तेंच दांतण पाहा. तें बाभळीचें किंवा कडुलिंबाचेंहि असलें तरी तें एकदांच वापरलें जातें आणि त्यांत हिरड्यांना घट्ट करण्याचा गुण आहे. शिवाय तें जीभ साफ करण्यालाहि उपयोगीं पडतें. पश्चिमेकडील देशांना हिंदुस्थानच्या दांतणाइतकें आरोग्यकारी औषध अजून सांपडलेलें नाहीं. तुम्हांला माहीत नसेल कीं दक्षिण आफ्रिकेंतील एका डॉक्टरानें खाणींत काम करणाऱ्या बान्टु लोकांत पसरलेला क्षयरोग त्यांना हीं दांतणें रोजच्या रोज वापरायला लावून बरा केला. हल्लींचे टुथब्रश जरी हिंदुस्थानांत तयार झाले तरी त्यांची जाहिरात मी कधीं करणार नाहीं. मी आपला दांतण वापरा म्हणूनच सांगेन. ही शंभर टक्के स्वदेशी आहे. आपण तिची काळजी घेतली कीं बाकीच्याची काळजी आपोआप घेतली जाईल. मला काटकोनाची व्याख्या करायला सांगा, मी ती सहज करूं शकेन. पण तुम्ही काढूं शकाल अशा लघुतम कोन आणि विशालतम कोन यांच्या मधल्या कोनांची व्याख्या करायला तुम्ही मला सांगूं नका. मला काटकोनाची व्याख्या समजली कीं मी मला हवा तो कोन करूं शकेन. 'स्वदेशी' या शब्दांतच तिची व्याख्या येते; तथापि मी माझ्या व्याख्येला शंभर टक्के स्वदेशी अशाकरितां म्हणतों कीं स्वदेशींत भेसळ होण्याची भीति आज उत्पन्न झाली आहे. शंभर टक्के स्वदेशीमुळें, ज्यांची सेवेची आकांक्षा कधींच तृप्त होत नाहीं अशांना सेवेला भरपूर वाव मिळेल, कसल्याहि प्रकारच्या बुद्धीला तृप्त करण्याची शक्ति तिच्यांत आहे.

प्र.— या स्वदेशीच्या अंतीं आपल्याला स्वराज्य मिळेल असें आपणांला वाटतें काय ?

उ.— हो, कां नाही ? एकदां चरख्यांत स्वराज्य आहे असें मीं सांगितलें; मग सांगितलें, दारूबंदींत स्वराज्य आहे. याच प्रकारें मी म्हणतों कीं शंभर टक्के स्वदेशींत स्वराज्य आहे. अर्थात्, हें चार आंधळ्यांनीं हत्तीचें वर्णन केलें तसें झालें. ते सर्व आंधळे बरोबर होते, पण संपूर्णपणें बरोबर नव्हते.

आपली सर्व साधनें जर आपण उपयोगांत आणलीं तर माझी खात्री आहे कीं आम्ही जसे एके काळीं सर्व जगांत श्रीमंत होतों ( अशी माझी समजूत आहे ) तसे पुन: होऊं. आम्ही आळशी राहण्याचें सोडून देऊन कोट्यवधि लोकांच्या रिकाम्या वेळेचा सदुपयोग केला तर पुन: आम्ही ती स्थिति आणूं. फक्त आपण उद्योगरत झालें पाहिजे; मात्र एकाद्या यंत्राप्रमाणें नव्हे, तर उद्योगी मधमाशीप्रमाणें. मी ज्याला 'निर्दोष मध' म्हणतों त्याचा हल्लीं मी प्रचार करीत आहें, तुम्हांला माहीत आहे ?

प्र.—'निर्दोष मध' हें काय प्रकरण आहे ?

उ.—मधमाशा पाळण्याचें शास्त्र जाणणाऱ्यांनीं शास्त्रीय पद्धतीनें काढलेला तो मध आहे. ते मधमाशा पाळतात, त्यांना मध गोळा करायला लावतात आणि त्यांना न मारतां तो मध काढून घेतात. म्हणून त्याला मी 'निर्दोष' किंवा 'अहिंसक' मध म्हणतों. पुष्कळ वाढण्याजोगा असा हा एक उद्योग आहे.

प्र.—पण आपण त्याला सर्वस्वीं अहिंसक म्हणूं शकतां का ? गाईचें दूध काढून घेऊन जसें वासराच्या तोंडचें दूध आपण घेतों तसाच मधमाशांचा हा मध आपण हिरावून नाहीं का घेत ?

उ.—बरोबर आहे. पण जग कांहीं केवळ तर्कावर चालत नाहीं. जीवन म्हटलें कीं कांहींना कांहीं हिंसा आलीच. आणि त्यांतूनच आपल्याला कमींत कमी हिंसेचा मार्ग निवडावयाचा आहे. शाकाहारांत सुद्धां हिंसा आहेच. होय कीं नाहीं ? तसेंच, मला जर मध पाहिजे आहे तर मला मधमाशांशीं दोस्ती बांधली पाहिजे आणि त्या जितका मध देतील तितका घेतला पाहिजे. शिवाय, शास्त्रीय पद्धतीच्या मधुमक्षिका–पालनांत मधमाशीपासून मध निःशेष करून हिरावून घेतला जात नाहीं.*

---

* हरिजन, २८–९–१९३४.

## ग्रामोद्योग म्हणजे काय? : : ५

[ परवां एका निकट मित्रानें इतर कांहीं गोष्टींबरोबर मला एक प्रश्न केला कीं 'ग्रामोद्योगाचें काम म्हणून जें तुम्ही म्हणतां त्याचें पूर्ण चित्र माझ्या मनश्चक्षूपुढें येत नाहीं'. हा प्रश्न योग्य आहे. असा प्रश्न अनेकांच्या मनांत आला असेल. त्या मित्राला मीं जें लिहिलें त्याचा सारांश पुढें दिला आहे. ]

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आपण वापरीत असलेल्या वस्तू फक्त अशाच खरीदल्या पाहिजेत कीं ज्या खेड्यांतच बनतात. त्या कदाचित् ओबडधोबड असतील; खेड्यांतील कारागिरांनीं आपली कारागिरी सुधारावी याकरितां त्यांचें मन वळविण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. परदेशीं, नव्हे आपल्या शहरांत म्हणजेच मोठमोठ्या कारखान्यांत तयार होणाऱ्या वस्तू अधिक चांगल्या असतात म्हणून आपण ग्रामीण वस्तूंचा धिक्कार करतां कामा नये. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें तर, खेडुतांची कलात्मक बुद्धि आपण जागृत केली पाहिजे. आपण त्यांचें जें देणें लागतों तें याच रीतीनें खरोखर फिटेल. अशा प्रयत्नांत आपल्याला कधीं काळीं यश येईल कीं नाहीं अशा शंकेनें घाबरून जाण्याचें कारण नाहीं. आजचाच काळ घेतला तरी या काळांत राष्ट्राच्या प्रगतीला अमुक कामांची अवश्यकताच आहे असें जेव्हां आपल्याला कळेल तेव्हां त्या कामांमध्यें असलेल्या अडचणींनीं आपण घाबरून गेलों नाहीं अशीं उदाहरणें आपल्या लक्षांत येऊं शकतील. म्हणून,

हिंदुस्थानच्या खेड्यांचा पुनरुद्धार करणें हें आपल्या अस्तित्वाकरितां अवश्यक आहे असें जर व्यक्ति या नात्यानें आपण मानीत असूं, त्यामुळेंच आपण अस्पृश्यतेचें उच्चाटन करून सर्वांशीं एकरूप होऊं शकूं असें जर आपण समजत असूं, तर कोणत्याहि जातीचे किंवा धर्माचे ते असत ना, आपण मनानें खेडुतांकडे परतलें पाहिजे आणि त्यांच्यापुढें अनुकरणाकरितां शहरी जीवन न ठेवतां त्यांनाच आपला कित्ता म्हणून आपण वागविलें पाहिजे. ही जर योग्य प्रवृत्ति असेल तर मग साहजिकच आपण प्रारंभ आपल्यापासूनच करूं आणि अशा रीतीनें, उदाहरणार्थ, गिरणांच्या कागदाऐवजीं हातकागद वापरूं, शक्य तेथें फाउंटनपेन किंवा टांक यांऐवजीं बोरूच वापरूं, कारखान्यांत तयार झालेल्या शाईऐवजीं खेड्यांतली शाई वापरूं. अशी स्वरूपांचीं उदाहरणें मी आणखी पुष्कळ देऊं शकेन. आपल्या घरांमध्यें वापरण्याजोगी अशी कोणतीहि वस्तु नाहीं कीं जी खेड्यांतील लोकांनीं पूर्वीं तयार केलेली नाहीं किंवा आजहि ते करूं शकत नाहींत. मनाची बैठक बदलून आपण आपली दृष्टि जर खेड्यांकडे ठेवली तर तत्काळ लाखों रुपये आपण खेडेगांवांतील लोकांच्या पदरीं टाकूं लागतों; आज मात्र त्यांना कांहींहि परत न देतां आपण त्यांना लुबाडीत आहोत ही करुण कहाणी पुढें चालविणें आपण थांबविण्याची वेळ आतां आली आहे. माझ्या दृष्टीनें तर ज्यांना अस्पृश्यतेचा टिळा लागलेला आहे त्यांची धार्मिक अस्पृश्यता नष्ट करणें याहून किती तरी अधिक अर्थ या अस्पृश्यता-निवारणाच्या मोहिमेला आहे. शहरवासियाला खेडीं अस्पृश्य झालीं आहेत. खेड्यांचा त्याला माहिती नाहीं, तो खेड्यांत राहणार नाहीं, तो तेथें गेला तरी आपलें शहरी जीवन तेथें निर्माण करूं इच्छील. तरीहि हें सर्व सहन करतां येईल; पण केव्हां ? तीस कोटि मानवजीवांचा समावेश करून घेणारीं शहरें जर आपण अस्तित्वांत आणूं शकलों तर. यापेक्षां ग्रामोद्योगांचें पुनरुज्जीवन करून लोकांची वाढती कंगाली थांबविणें हें अधिक शक्य आहे. ही कंगाली इतर कोणत्याहि कारणाप्रमाणेंच सक्तीच्या बेकारीमुळेंहि निर्माण झाली आहे.*

---

* 'हरिजन', २०-११-१९३४.

## ग्रामोद्योग

: : ६

ग्रामोद्योगांसंबंधींच्या काँग्रेसच्या ठरावाचा × कर्ता म्हणून व ग्रामोद्योगांच्या वाढीकरितां जो संघ स्थापन होत आहे त्याचा एकमेव मार्गदर्शक या नात्यानें या उद्योगांसंबंधींच्या व त्यांना अगदीं चिकटून असणाऱ्या शरीरस्वास्थ्याच्या उन्नतीसंबंधींच्या माझ्या मनांत वावरत असणाऱ्या कल्पना लोकांना शक्य तितक्या सांगणें हें योग्यच होईल.

---

× २७ आक्टोबर १९३४ रोजीं मुंबईच्या अधिवेशनांत काँग्रेसनें खालील ठराव मंजूर केलाः—

"ज्याअर्थीं स्वदेशी कार्याचा पुरस्कार करतों म्हणणारे अनेक संघ सर्व देशांत काँग्रेस–जनांच्या मदतीनें व मदतीशिवायहि निघाले आहेत आणि ज्याअर्थीं त्यामुळें स्वदेशीच्या खऱ्या स्वरूपासंबंधीं जनतेच्या मनांत मोठा गोंधळ उत्पन्न झाला आहे, ज्याअर्थीं काँग्रेसचें ध्येय तिच्या जन्मापासूनच सामान्य जनतेशीं आत्मीयता वाढवीत जाणें हें आहे आणि ज्याअर्थीं ग्राम-संघटना हें काँग्रेसच्या विधायक कार्यक्रमाचें एक अंग आहे, ज्याअर्थीं खेड्यांच्या या पुनःसंघटनेमध्यें हातकताईच्या मुख्य उद्योगाव्यतिरिक्त इतर मेलेल्या आणि मरत चाललेल्या ग्रामोद्योगांना पुनरुज्जीवित करण्याचा व त्यांना उत्तेजन देण्याचा समावेश निश्चयें करून होतो आणि ज्याअर्थीं हातकताईच्या नवसंघटने-

हरिजनयात्रेच्या निमित्तानें मीं मलबारमध्यें प्रवेश केला त्या सुमारास हा संघ स्थापन करण्याच्या माझ्या विचाराला निश्चितता आली होती. एका खादी–सेवकाशीं बोलत असतां शहरांत राहणाऱ्या लोकांनीं खेड्यांतील लोकांपासून निर्दयपणें व अविचारानें जें हिरावून घेतलें आहे तें त्यांना परत करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणारी एक संस्था असण्याची किती अवश्यकता आहे हें दिसून आलें. खेड्यांतील लोकांत सुद्धां अतिशय धक्का जर कोणाला बसला असेल तर तो हरिजनांना. सर्वसाधारणपणें खेड्यांतील लोकांना मोकळ्या असलेल्या उद्योगधंद्यांपैकीं फारच थोडे त्यांच्या वांट्याला येत असतात. त्यामुळें, जेव्हां त्यांच्या हातून ते धंदे निसटून जातात, तेव्हां त्यांच्या जोडीनें राहणाऱ्या ओझ्याच्या गाढवासारखीच त्यांची स्थिति होते.

पण सर्वसाधारण खेड्यांतील लोकांचीहि कांहीं याहून फारशी चांगली स्थिति नाहीं. कसेंबसें पोट भरेल इतक्याचपुरता जमीन कुरतडण्याचाच धंदा त्यांना हळूहळू उरत चालला आहे. हिंदुस्थानांतील लहानलहान व अव्यवस्थित जमिनीच्या तुकड्यांवरील शेती ही फायद्याची राहिलेली नाहीं हें आज फारच थोड्यांना माहीत असेल. खेड्यांतील लोकांचें जीवन चैतन्यशून्य झालें आहे. हळूहळू होत चाललेली उपासमार असें त्यांचें जीवन आहे. कर्जाच्या बोजानें ते वांकले आहेत. सरकार कर्ज देतें, कारण त्याला दुसरें कांहीं करणेंच

---

प्रमाणें हें काम कॉंग्रेसच्या राजकीय प्रवृत्तीपासून अलिप्त व स्वतंत्र राहून तन्मयतापूर्वक व विशेष प्रयत्नांनींच होणें शक्य आहे, त्याअर्थी या ठरावानें श्री. जे. सी. कुमारप्पा यांना गांधीजींची सल्लामसलत घेऊन व त्यांचें मार्गदर्शन पत्करून 'ग्रामोद्योग–संघ' नांवाचा एक संघ कॉंग्रेस–कार्याचें एक अंग म्हणून स्थापन करण्याचा अधिकार दिला जात आहे. सदर संघ उपरोक्त उद्योगांचें पुनरुज्जीवन करण्याकरितां व त्यांना उत्तेजन देण्याकरितां, त्याचप्रमाणें खेड्यांची नैतिक व शारीरिक उन्नति व्हावी याकरितां काम करील आणि त्याला आपली घटना बनविण्याचा, निधि उभा करण्याचा व आपल्या उद्देशपूर्तीस्तव अवश्यक तीं कामें हातीं घेण्याचा अधिकार राहील."

शक्य नाहीं. त्यानें कर्ज दिलें नाहीं तर त्याचें सर्वच येणें बुडीत होईल. कर्ज देण्याची ही खेड्यांतील पद्धत चौकशीला दाद न देणारी आहे. कितीहि बारकाईनें चौकशी केली तरी तीविषयींचें आपलें ज्ञान नांवाचेंच असतें.

ग्रामोद्योग नष्ट झाले कीं हिंदुस्थानच्या सात लाख खेड्यांचा सर्वनाश पुरा झाला.

दैनिक वृत्तपत्रांत मीं मांडलेल्या योजनेवर आलेली टीका मीं पाहिली आहे. खेड्यांना अशा अवस्थेंतून मुक्त करण्याकरितां मनुष्याच्या कल्पक मेंदूनें आपल्या ताब्यांत आणलेल्या निसर्ग–शक्तीचा उपयोग मीं करून घ्यावा असा सल्ला मला त्यांत दिला गेला आहे. पुढें गेलेल्या पाश्चात्य राष्ट्रांनीं जसा पाणी, हवा, तेल व वीज यांचा उपयोग करून घेतला तसाच मींहि त्यांचा पूर्णपणें उपयोग करून घ्यावा असें या टीकाकारांचें म्हणणें आहे. निसर्गाच्या या गुप्त शक्तींवर ताबा मिळाल्यानेंच प्रत्येक अमेरिकनाला तेहतीस गुलामांचें काम करून घेतां येतें असें ते सांगतात.

हा प्रयोग हिंदुस्थानांत लागू केला तर या भूमीच्या प्रत्येक रहिवाशाला तेहतीस गुलाम मिळण्याऐवजीं तोच तेहतीसपटींनीं गुलाम होईल हें मी बेधडकपणें सांगूं शकतों.

यंत्रीकरण केव्हां चांगलें ? जेव्हां योजिलेलें काम पार पाडण्याकरितां माणसें अपुरीं असतील तेव्हां. जेव्हां कामाला जरुरीपेक्षां जास्त माणसें असतील, तेव्हां उद्योगांत यंत्रांचा उपयोग करणें हें दुष्कृत्य आहे. हिंदुस्थानांत तशी स्थिति आहे. दोनचार गुंठे जमीन उकरण्यासाठीं कांहीं मी नांगर वापरणार नाहीं. आपल्यापुढें प्रश्न आहे तो हिंदुस्थानांतील कोट्यवधि लोकांना फुरसतीचा वेळ कसा मिळवून द्यावा हा नाहीं. त्यांच्या फुकट जाणाऱ्या वेळेचा उपयोग कसा करून घ्यावा हा प्रश्न आहे; आणि हा फुकट जाणारा वेळ म्हणजे वर्षांतून सहा महिने होतात. सांगितलें तर विलक्षण वाटेल; पण प्रत्येक गिरणी म्हणजे खेड्यांतील लोकांवर अरिष्ट आहे. हें म्हणणें विलक्षण वाटलें तरी खरें आहे. मीं आंकडेमोड करून पाहिलेलें नाहीं; तथापि गिरणींतील प्रत्येक

नगर वाचनालय (ता. ........)

मजूर हा त्याच्या खेड्यांतील तेंच काम करणाऱ्या कमीत कमी दहा कामगारांचें तरी काम करतो असें मी डोळे मिटून म्हणूं शकतों. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें तर, हाच मजूर खेड्यांत असतांना जितकें मिळवीत होता त्याहून तो अधिक मिळवितो, पण तें आपल्या दहा मजूर बंधूंना उपाशी ठेवून. अशा रीतीनें सुताच्या व कापडाच्या गिरण्यांनीं खेड्यांतील लोकांच्या उपजीविकेचें मोठें साधन हिरावून घेतलें आहे. याला उत्तर म्हणून स्वस्त व अधिक चांगला कपडा गिरण्या काढतात असें म्हणणें हें कांहीं बरोबर नव्हे. कारण, गिरण्यांनीं हजारों कामगारांना बेकार केलें असल्यामुळें स्वस्तांत स्वस्त गिरणीचें कापड हें खेड्यांत तयार झालेल्या महागांत महाग खादीपेक्षांहि महाग आहे. कोळशाच्या खाणीवाल्याला कोळसा कांहीं महाग नसतो; कारण तो त्याला तेथल्या तेथेंच वापरावयास मिळतो. तशीच खादीही स्वतःचें कापड स्वतःच तयार करून घेणाऱ्या खेड्यांतील माणसाला महाग नव्हे. पण गिरण्यांत तयार झालेलें कापड जर खेड्यांतील कामकऱ्यांना बेकार करीत असेल, तर तांदळाच्या व पिठाच्या गिरण्यामुळें हजारों गरीब स्त्री-कामकऱ्यांचें काम हिरावून घेतलें जातें, इतकेंच नव्हे तर व्यवहारांत सबंध जनतेच्या आरोग्याला धोका पोंचतो. ज्या ठिकाणीं मांसाहार घेणें निषिद्ध मानलें जात नाहीं व तें परवडतें. तेथें कदाचित् मैद्यानें आणि शुभ्र गुळगुळीत तांदुळानें हानि होणार नाहीं; पण हिंदुस्थानांत, मांसाहार निषिद्ध नसतांना सुद्धां त्यांना मांस मिळूं शकत नाहीं अशी स्थिति असूनहि कोट्यवधि लोकांना जात्यावर दळलेल्या गव्हाच्या पीठांत व असडीक तांदळांत असलेल्या पौष्टिक आणि जीवनदायी द्रव्यांचा उपयोग करूं न देणें हें खरोखर पाप आहे. मैद्याचा व पांढऱ्या गुळगुळीत तांदळाचा उपयोग करण्यांत काय धोका असतो हें डॉक्टर लोकांनीं व इतरांनीं मिळून लोकांना शिकविण्याची वेळ आली आहे.

खेड्यांतील लोकांना काम देण्याचा मार्ग यंत्रीकरण हा नसून आजवर त्यांनीं जे उद्योगधंदे चालविले त्यांचा पुनरुद्धार करणें हाच आहे, हें दाखविण्याकरितां मीं कांहीं ठोकळ व डोळ्यांत भरणाऱ्या गोष्टींकडे लक्ष वेधलें आहे.

म्हणून माझ्या मते ग्रामोद्योग-संघाचें कर्तव्य मात्र हयात असलेल्या ग्रामोद्योगांना उत्तेजन देणें आणि शक्य व इष्ट तेथें नष्ट झालेल्या व होत चाललेल्या ग्रामोद्योगांचें ग्रामीण पद्धतीप्रमाणेंच, म्हणजे अनादिकालापासून जसे ते आपल्या झोंपड्यांतच ते धंदे करीत आले आहेत त्याप्रमाणें, पुनरुज्जीवन ीवत केलें पाहिजे. रेचणें, पिंजणें, कांतणें आणि विणणें या कलांमध्यें जशा पुष्कळ सुधारणा झाल्या आहेत, तशाच सुधारणा या साध्या पद्धतींतहि करतां येण्याजोग्या आहेत.

एक टीकाकार विरोध करून म्हणतात कीं, ग्रामोद्योगांची ही प्राचीन योजना निव्वळ वैयक्तिक स्वरूपाची आहे आणि तिला सामुदायिक स्वरूप कधींहि येणें शक्य नाहीं. हें मत मला तरी उथळपणाचें वाटतें. खेडुतांनीं आपआपल्या झोंपड्यांतून जरी वस्तू तयार केल्या तरी त्यांचा एकत्र संबंध जोडतां येईल आणि नफ्याची वांटणी करतां येईल. खेडुतांचें काम देखरेखी-खालीं व योजनापूर्वक चालूं शकेल. कच्चा माल सार्वजनिक सांठ्यामधून पुरवितां येईल. सहकारी पद्धतीनें काम करण्याची मनोवृत्ति एकदां उत्पन्न केली कीं सहकार्याला, श्रमविभागाला, वेळाची बचत होण्याला आणि कार्यकुशलतेला खात्रीनें पुष्कळ संधि मिळण्याजोगी आहे. आज चरखासंघाकडून या सर्व गोष्टी पांच हजार खेडेगांवांतून अंमलांत येत आहेत.

पण खादी हा ग्रामोद्योगांच्या ग्रह-मंडळांतील सूर्य आहे. निरनिराळे उद्योग हे ग्रह आहेत. खादीमुळें त्यांना उष्णता आणि जीवन मिळतें आणि त्याच्या मोबदला खादीला त्यांचा आधार मिळतो. तिच्यावांचून इतर उद्योग वाढणार नाहींत. पण माझ्या गेल्या दौऱ्यांत मला असा शोध लागला कीं, इतर धंद्यांचें पुनरुज्जीवन जर केलें नाहीं तर खादीची पुढें प्रगति होऊं शकणार नाहीं. खेडुतांना आपला रिकामा वेळ फायदेशीर कामांत घालवितां यावा याकरितां ग्रामीण जीवनाच्या सर्वांगांशीं संबंध बांधला गेला पाहिजे. चरखा-संघ व ग्रामोद्योग-संघ या दोन संघांच्या मार्फत हेंच करण्याची अपेक्षा राखलेली आहे.

अर्थात्‌च त्यांना राजकारणाशीं अथवा राजकीय पक्षोपपक्षांशीं कांहीं कर्तव्य असणार नाहीं. माझ्या मतानें कॉंग्रेसनें या दोन्ही संघांना स्वायत्त

बनविलें आणि सर्वस्वीं राजकारणातीत ठेवलें हें फार चांगलें केलें. त्यामुळें सर्व पक्षांना आणि जमातींना खेड्यांचा आर्थिक, नैतिक व आरोग्याच्या दृष्टीनें उद्धार करण्याकरितां एकत्र येतां येईल.

खादी हा अर्थशास्त्राच्या कक्षेंत बसणारा विषय मुळींच नाहीं असें मानणारा विचारकांचा एक वर्ग आहे हें मला माहीत आहे. खादी हा ग्रामीण उद्योगांचा मध्य आहे या माझ्या विधानानें ते बुजणार नाहींत अशी मला आशा आहे. खादी आणि इतर ग्रामोद्योग यांचा परस्परांमध्यें काय संबंध आहे हें दर्शविल्यांवांचून माझ्या मनांतील चित्र मला पूर्ण करतां येत नाहीं. ज्यांना तो संबंध दिसत नाहीं त्यांनीं फक्त इतर उद्योगांवर आपले श्रम खुशाल वेंचावे. पण हें सुद्धां या नवीन संघामार्फत करावयाचें झालें तर या लेखांत जी पार्श्वभूमि देण्याचा मीं प्रयत्न केला आहे ती जर त्यांना पटली तरच शक्य होईल.*

* 'हरिजन' १६-११-१९३४.

संपूर्ण स्वदेशी / महात्मा गांधी

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

## अ. भा. ग्रामोद्योग-संघ—त्याचा अर्थ व व्यक्ति : ७

[ कॉंग्रेसनंतर शेवटचा आठवडा गांधीजींना फार कामाचा गेला. ग्रामोद्योग-संघाच्या विचारानें त्यांचें मन सर्वस्वीं गुंतवून टाकलें आहे आणि या विषयावरील त्यांचें टपाल आजच इतकें वाढलें आहे कीं, तें आंवरणें त्यांना कठिण झालें आहे. पण गेला आठवडा तर गांधी-सेवा-संघाच्या वार्षिक बैठकीमुळें अधिकच भरगच्च झाला. या संघांत देशांतील कांहीं वेंचक असे कार्यकर्ते आहेत, त्यांनीं आपला सर्व वेळ विधायक कामाकडे दिला आहे आणि या आठवड्यांत गांधीजींचें त्यांच्यापुढें जें भाषण झालें त्यांत या नवीन स्थापन झालेल्या ग्रामोद्योग-संघाचा अर्थ व त्याची व्याप्ति त्यांनीं विशद केल्या त्याचा सारांश पुढें दिला आहे:— म. ह. दे. ]

ग्रामोद्योग-संघ स्थापन करावा ही गोष्ट माझ्या मनांत कशी आली हें आपल्यापैकीं कांहीं जणांना माहीत असेल. गेल्या वर्षीं हरिजन-कार्याच्या निमित्तानें मी संबंध हिंदुस्थानभर फिरत होतों. त्या वेळीं मला सूर्यप्रकाशाप्रमाणें स्पष्ट असें दिसून आलें कीं, ज्या रीतीनें खादीचें कार्य आज आपण करीत आलों आहों त्या रीतीनें कांहीं खादी देशव्यापी व्हावयाची नाहीं आणि या प्रकारें आमच्या खेड्यांना नवें जीवनहि मिळावयाचें नाहीं. खादी वापरणारे देशांत फारच थोडे लोक आहेत हें मीं पाहिलें आणि जे लोक खादी वापरीत आहेत तेहि असें कांहींसें मानीत आहेत कीं बस्स,

आतां आपण कृतार्थ झालों आणि बाकी करावयाचें कांहीं [illegible] नाहीं. आतां आम्हांला वाटेल त्या वस्तू ( मग त्या कशा कां तयार झालेल्या असत ना ) वापरावयाला हरकत नाहीं. मला असें दिसून आलें कीं, खादीच्या पाठीमागें जी भावना आहे ती विसरून जाऊन एकाद्या जड रूढीप्रमाणें आम्ही खादीचा उपयोग करूं लागलों आहों. हीच परिस्थिति जर चालू राहिली तर निव्वळ पोषण न मिळाल्यामुळेंच खादी मरून जाईल असें मला दिसून आलें. जर एकाग्रतेनें आणि उत्कंठेनें आपण फक्त खादीकार्यांतच लक्ष घातलें तर खात्रीनें त्यांत आपल्याला यश मिळेल. पण मला कोठेंहि तशी एकाग्रता किंवा उत्कंठा दिसून आली नाहीं. सर्वांनीं आपला सर्व रिकामा वेळ कधींहि चरख्याला किंवा तकलीला दिला नाहीं आणि फक्त खादीच वापरण्याचें व्रतहि सर्वांनीं घेतलें नाहीं.—तरी कांतणाऱ्यांच्या संख्येहून खादीधाऱ्यांची संख्या निश्चितपणें अधिक आहे. पण बाकीचे सर्व लोक निरुद्योगी मात्र राहिले. लाखों माणसांपाशीं त्यांच्यावर सक्तीनें लादलेला रिकामा वेळ किती तरी आहे. अशा परिस्थितीनें आमचा सत्यानाश झाल्याशिवाय राहणार नाहीं असें मला दिसून आलें. या लोकांना कधीं स्वराज्य मिळणें शक्य नाहीं असा विचार माझ्या मनांत आला. कारण हीं माणसें आळसांत अनिच्छेनें बसून दिवस कंठीत असोत किंवा स्वेच्छेनें बसून कंठीत असोत, हीं परदेशी आणि देशी लुटारूंची शिकार बनल्यावांचून राहाणारच नाहींत. यांना लुबाडणारे हिंदुस्थानच्या शहरांतील असोत वा विला-यतचे असोत, यांची स्थिति सदैव अशीच राहणार. यांना स्वराज्य मिळावयाचें नाहीं,—मिळवावयाचेंहि नाहीं. म्हणून मीं मनाशीं म्हटलें कीं, या लोकांना खादीमध्यें गोडी वाटत नसेल तर यांना दुसरें कोणतें तरी काम करण्याला सांगितलें पाहिजे; मग, यांचे पूर्वज जें काम करीत होते, पण जें कांहीं काळापासून बंद पडलें आहे, असेंच काम यांनी कां करूं नये ? कांहीं थोड्या वर्षांपूर्वींच हे लोक आपल्या नित्योपयोगी अनेक वस्तू स्वतःच तयार करून घेत होते; पण आज त्यांना त्यांसाठीं बाहेरच्या जगावर अवलंबून राहावें लागत आहे. लहान लहान कसब्यांत राहणाऱ्या लोकांच्या नित्योपयोगाच्या अशा पुष्कळ वस्तू होत्या कीं, ज्यांकरितां त्यांना खेडेगांवांतील लोकांवर अवलंबून राहावें लागत

असे; पण आज त्या वस्तू ते मोठ्या शहरांतून मागवितात. ज्या क्षणीं खेड्यांतील लोक आपला फुरसतीचा सर्व वेळ कोणत्या तरी उपयुक्त कामाला लावण्याचा निश्चय करतील, त्याचप्रमाणें शहरांतील लोकांहि खेड्यांत बनलेल्या या वस्तूंचाच उपयोग करण्याचा संकल्प करतील, त्याच क्षणीं खेड्यांतील लोकांचा व शहरांतील लोकांचा जो पारस्परिक प्रेमसंबंध आज तुटलेला आहे, तो फिरून जोडला जाईल. मेलेल्या किंवा मरत चाललेल्या ग्रामोद्योगांपैकीं व हुन्नरांपैकीं कोणकोणते उद्योग व हुन्नर पुनरुज्जीवित करतां येतील, यासंबंधीं आज आम्हांला निश्चित असें कांहींच सांगतां येणार नाहीं; ज्या वेळीं आम्ही खेड्यांत जाऊं, त्यांची कसून चौकशी करूं, त्यांची एक यादी बनवून त्यांचें वर्गीकरण करूं, तेव्हांच आम्हांला त्यासंबंधीं सांगतां येईल. पण मीं आज सर्वांत महत्त्वाच्या म्हणून दोन गोष्टी निवडल्या आहेत—खाण्यापिण्याच्या वस्तू व पेहरण्यापांघरण्याच्या वस्तू. पेहेरण्यापांघरण्याच्या वस्तूंत खादी तर आहेच. आहाराच्या वस्तूंत आमची स्वयंपूर्णता झपाट्यानें नष्ट होत चाललेली आहे. कांहीं थोड्या वर्षांपूर्वीं आपण तांदूळ उखळींत हातानें सडून घेत होतों आणि धान्य जात्यांत घालून दळून घेत होतों. आरोग्याचा प्रश्न आपण थोडा वेळ बाजूला ठेवूं. तरी सुद्धां पिठाच्या व तांदळाच्या गिरण्यांनीं लाखों स्त्रियांचें काम निर्दयपणें हिरावून घेतलें आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. किती तरी असहाय्य, अनाथ स्त्रियांचें पोट त्यांवर चालत होतें; पण आज या दुष्ट गिरण्यांनीं त्यांची रोजगारी सुद्धां पिसून टाकली आहे! गुळाची जागा साखर घेऊं लागली आहे आणि पाव-बिस्किटांसारख्या खाण्याच्या वस्तू आयत्या तयार होऊन आमच्या खेड्यापाड्यांत बिनधोकपणें शिरूं लागल्या आहेत. याचा अर्थ असा कीं खेडेगांवांतील बहुतेक सर्व उद्योग खेडुतांच्या हातांतून निसटून जाऊं लागले आहेत आणि बिचारे खेडूत आपणांला लुटणाऱ्या लोकांकरितां कच्चा माल उत्पन्न करण्याव्यतिरिक्त दुसरें कांहीं करूं शकत नाहींसे झाले आहेत. ते कच्चा माल एकसारखा देत आहेत, पण मोबदल्यांत त्यांच्या पदरीं मात्र कांहींच पडत नाहीं. कच्च्या मालाच्या मोबदल्यांत त्यांना जो थोडासा पैसा मिळतो तोहि ते साखरेच्या आणि कापडाच्या व्यापाऱ्यांच्या स्वाधीन करून टाकतात. त्यांच्या खिशांत एक पैहि राहत नाहीं. ज्या जनावरांच्या

संगतींत ते रात्रंदिवस असतात त्यांच्यासारखेंच त्यांचें मन व शरीर होऊन गेलीं आहेत. आपण विचार करतों तेव्हां आपणांला दिसून येतें कीं, पन्नास वर्षांपूर्वींच्या खेड्यांतील माणसांत जितकी बुद्धि आणि जितकी चतुरता होती तिच्या निम्म्यानें सुद्धां आजच्या खेडेगांवच्या माणसांत राहिलेली नाहीं. याचें कारण हें आहे कीं,आजचा ग्रामवासी दारिद्र्य,परावलंबन व आळस यांच्या गर्तेत जाऊन पडला आहे. पण पन्नास वर्षांपूर्वींचा ग्रामवासी आपल्याला लागणाऱ्या वस्तू आपल्या बुद्धीचा आणि हातांचा उपयोग करून स्वतः तयार करून घेत असे. गांवांतील कारागिरांची दशा सुद्धां गांवांतील इतर लोकांप्रमाणेंच बुद्धिविहीन अशी झाली आहे. गांवांतील एकाद्या सुताराकडे जा आणि त्याला एक चरखा तुमच्यासाठीं करून द्यावयाला सांगा, गांवांतील एकाद्या लोहाराकडे जा आणि त्याला एक चाते बनवावयाला सांगा; तुमची निराशा होईल. ही अत्यंत दयाजनक अवस्था आहे. हीवर उपाय म्हणूनच ग्रामोद्योग-संघाची कल्पना सुचली आहे.

कोणी टीकाकार म्हणतात कीं, 'खेड्याकडे परत' ही घोषणा म्हणजे प्रगतीचा कांटा मागें फिरविणें आहे. पण वास्तविक तसेंच आहे का? हें खेड्याकडे परत जाणें आहे कीं त्याचें देणें त्याला परत देऊन टाकणें आहे? शहरवासियांना कांहीं मी खेड्यापाड्यांत जाऊन राहावयाला सांगत नाहीं. मी त्यांना एवढेंच म्हणत आहें कीं, खेड्यांचें जें देणें तुमच्यावर चढलें आहे तें त्यांचें त्यांना परत करा. खेडुतांच्या शिवाय शहरवाल्यांना एक तरी कच्चा माल मिळण्याजोगा आहे काय? जर नसेल तर पूर्वीं खेडूत करीत होता आणि आमचे लूटमारीचे रस्ते जर बंद झाले तर तो आजहि करील त्याप्रमाणें त्याला स्वतःलाच त्या कच्च्या मालावर कारागिरी करावयाला कां शिकवूं नये?

पण खेडुताला त्याची जी एके काळीं स्वाभाविक स्थिति होती त्या स्थितीप्रत पुनः नेऊन पोंचविणें हें सोपें काम नाहीं. मला वाटलें होतें कीं ग्रामोद्योग-संघाची घटना मी तयार करूं शकेन आणि हा संघ श्री० कुमारप्पा यांच्या मदतीनें थोड्या काळांत चालता करूं शकेल. पण या बाबतींत मी जितका अधिकाधिक बुड्या मारीत आहें तितका अधिकाधिक खोलांतच मी जात आहें. एक प्रकारें, खादीपेक्षां हें काम बरेंच बिकट आहे. कारण खादीमध्यें कांहीं

असे गुंतागुंतीचे प्रश्न येत नाहींत. फक्त परदेशी आणि यंत्रावर तयार झालेल्या सर्व कापडाचा बहिष्कार केला कीं खादीचा पाया बळकट झाला. पण हें क्षेत्र इतकें व्यापक आहे, उद्योग हातीं घ्यावयाचे व संघटित करावयाचे म्हटलें तर त्याच्यांत इतकी अनंत विविधता आहे कीं त्यांत आमच्या व्यापारी कौशल्याची, दर्दीपणाची आणि वैज्ञानिक शिक्षणाची पूर्ण कसोटीच लागणार आहे. अंग मोडून कष्ट केल्याशिवाय, अविरत प्रयत्न केल्याशिवाय आणि याच एका महान् कार्याला आपली सर्व व्यापारी व वैज्ञानिक बुद्धिशक्ति लावल्याबांचून ह्या कार्यांत सिद्धि मिळावयाची नाहीं. उदाहरण म्हणून, मी कांहीं सुप्रसिद्ध डॉक्टर व रसायन-वेत्ते यांच्याकडे एक प्रश्नावलि पाठविली; तींत सडलेले व असडीक तांदूळ, गूळ व साखर इत्यादि पदार्थांचें रासायनिक विश्लेषण करून त्यांचें अन्नमूल्य काय हें त्यांना विचारून मी माहिती मागविली होती. बऱ्याच मित्रांनीं तत्काळ उत्तरें पाठविलीं; त्यांचा मी आभारी आहें. पण त्यांनीं त्यांत कबूल केलें आहे कीं, मीं विचारलें तशा कांहीं बाबतींत अजून संशोधनच झालेलें नाहीं. गुळासारख्या एका साध्या वस्तूचें रसायनिक पृथक्करण कोणाहि शास्त्रज्ञाला देतां येऊं नये ही खरोखर किती दुःखाची गोष्ट आहे ! याचें कारण हेंच कीं, आम्हीं कधीं खेडेगांवच्या माणसांचा विचारच केलेला नाहीं. मधाचीच गोष्ट घ्या. मला असें सांगण्यांत आलें आहे कीं परदेशांत मधाचें इतकें काळजीपूर्वक पृथक्करण केलें जातें कीं एका विशिष्ट कसोटीला जर तो उतरला नाहीं तर तो बाटलींत भरून बाजारांत पाठविलाच जात नाहीं. हिंदुस्थानांत उत्कृष्ट मधाचें उत्पादन करण्याला प्रचंड साधनसामुग्री आमच्यां जवळ पडली आहे, पण आम्हांला त्यासंबंधीं कांहींचेंहि अनुभवज्ञान नाहीं. एका डॉक्टर मित्रानें मला लिहिलें आहे कीं, त्याच्या रुग्णालयांत तरी निदान सडलेला तांदूळ हा मुळींच घेतला जात नाहीं आणि उंदिरांवर व इतर प्राण्यांवर केलेल्या प्रयोगांनीं सिद्ध झालें आहे कीं, सडलेला तांदूळ हा हानिकारक आहे. पण सर्व डॉक्टर लोकांनीं आपल्या संशोधनाचे व प्रयोगाचे परिणाम कां नाहीं प्रसिद्ध केले ? असल्या तांदूळाचा उपयोग निश्चितपणें हानिकारक आहे असें त्यांनीं कां नाहीं जाहीर केलें ?

एक दोन उदाहरणें देऊन मी फक्त माझी अडचण दाखविली. आमची संघटना कशा प्रकारची असावी ? आमचें उद्दिष्ट साधण्यासाठीं कशा प्रकारचें संशोधन आम्हांला प्रयोगशाळेंत केलें पाहिजे ? आम्हांला अशा अनेक वैज्ञानिकांची व रसायनशास्त्रज्ञांची गरज लागेल कीं जे आपलें अनुभवाचें ज्ञानच फक्त आम्हांला देणार नाहींत तर आमच्या प्रयोगशाळांत ठाण मांडून बसून तासन् तास मीं · दर्शविलेल्या दिशेनें विनामोबदला प्रयोग करण्याला सिद्ध होतील. आम्हांला या प्रयोगांचे परिणाम वेळोवेळीं प्रसिद्ध करावे लागतील एवढेंच नव्हे तर अनेक प्रकारच्या उत्पादित वस्तूंचें निरीक्षण करून त्यांना प्रमाणपत्रें द्यावीं लागतील. त्याचप्रमाणें एकाद्या वस्तूचें किंवा अन्नधान्याचें उत्पादन करणारा खेडूत त्याची निर्यात करतो व त्या वस्तूच्या वा अन्नधान्याच्या बदला बाहेरून तसलीच पण स्वस्त वस्तु घेऊन समाधान मानतो कीं काय तेंहि आम्हांला शोधून काढावें लागेल. खेडेगांवचे लोक पहिल्या प्रथम स्वयंपूर्ण बनावे आणि मग शहरांतील लोकांच्या गरजा पुरविल्या जाव्या हें आम्हांला पाहावें लागेल. याकरितां आम्हांला जिल्हासंघटना बांधाव्या लागतील आणि जेथें जिल्हे काम करण्याच्या दृष्टीनें मोठे वाटतील तेथें जिल्ह्यांचे पुनः पोट-जिल्हेहि पाडावे लागतील. या अदमासें २५० जिल्ह्यांपैकीं प्रत्येकाला एक एक प्रतिनिधि असावा, त्यानें पूर्ण पाहणी करून व मुख्य कचेरीकडून गेलेल्या सूचना लक्षांत घेऊन आपला अहवाल सादर करावा. हे प्रतिनिधी संपूर्ण वेळ काम करणारे व काम तडीला नेणारे असले पाहिजेत, त्यांची या कार्यक्रमावर जिवंत श्रद्धा असली पाहिजे आणि आपल्या दैनंदिन आयुष्यक्रमांत अवश्यक फेरफार तत्काळ करण्याची त्यांची तयारी असली पाहिजे. या कामाला पैसा हा लागणारच; तथापि पैशाहूनहि त्याला दृढ श्रद्धेची व मनापासून काम करणाऱ्या माणसांची अवश्यकता आहे.

प्रश्न—या कार्यक्रमानें खादीचा कार्यक्रम मागें नाहीं का पडणार ? अजून त्याची पूर्तता व्हावयाची आहे.

उत्तर—नाहीं. खादीला तिच्या केंद्रस्थानापासून हलविणें शक्य नाहीं.

रा.ग्रं० १२९ २०-८-५४



सबंध औद्योगिक ग्रहमालेमध्यें खादी हा सूर्य राहील. बाकीच्या सर्व उद्योगांना तिच्यापासून ऊब व जीवन मिळतील.

प्र०—पुनरुज्जीवित किंवा पुरस्कार करावयाचे असे उद्योग निश्चितपणें कोणते आहेत ?

उ०—मीं दिशा दाखवून दिली आहे. कांहीं थोड्या काळापूर्वी हयात असणाऱ्या व जो मृत झाल्यामुळें लोक बेकार पडले आहेत अशा प्रत्येक उपयुक्त उद्योगाचा आपण पुरस्कार केला पाहिजे.

प्र०—तांदूळाच्या व पिठाच्या गिरण्यांवर आपण बहिष्कार पुकारावयाचा काय ?

उ०—बहिष्कार पुकारावयाचें कारण नाहीं; पण आपण लोकांना आपला तांदूळ आपणच भरडून घेण्याला, आणि आपलें पीठ आपणच दळून घेण्याला सांगूं, आणि आपण हातसडीच्या तांदूळाचा व जात्यावर दळलेल्या पिठाचा सतत प्रचार करीत राहूं आणि लोकांना सांगूं कीं, आरोग्याच्या दृष्टीनें या वस्तू खाणें हेंच अधिक हितावह आहे. आपण आळसाचा बहिष्कार करूं या.

प्र०—या कामीं कॉंग्रेस-कमिट्यांचा उपयोग करावा काय ?

उ०—अर्थात्. आपण कोणाचाहि उपयोग करून घेऊं, कोणाचीहि मदत घेऊं. आम्हांला कांहीं राजकारण करावयाचें नाहीं किंवा आमचा पक्षहि नाहीं.

प्र०—एक मध्यवर्ती समिति स्थापन करणें म्हणजे केंद्रीकरण नाहीं का झालें ?

उ०—तसेंच कांहीं नाहीं. जिल्हे हे काम करणारीं केंद्रें होतील. मुख्य कचेरी म्हणजे संबंध हिंदुस्थानभर चाललेल्या कामाची देखरेख करणारें स्थान

होईल. ती सूचना पाठवील, कारभार आपल्या हातीं घेणार नाहीं. पत्रव्यवहारानें शिकविणारी शाळा असते त्याप्रमाणें मुख्य कचेरीच्या द्वारा निरनिराळे प्रतिनिधी परस्परांशीं विचारांची व अनुभवाची देवाण-घेवाण करतील. आम्ही कारभार एके ठिकाणाहून चालविणें टाळूं पाहत आहों; आम्हांला विचारांचें, कल्पनांचें आणि शास्त्रीय ज्ञानाचें केंद्रीकरण मात्र अवश्य पाहिजे आहे.*

* 'हरिजन' ७।१२।१९३४.

## त्याचा अर्थ : : ८

“आधुनिक सुधारणेच्या विरुद्ध आपण मोठ्या उत्साहानें पण अव्यवहार्यपणें सुरू केलेल्या आणि कधीं अंत न होणाऱ्या लढाईची ही पहिली मोहीम आपण उघडली आहे असें माझ्या मनाला वाटतें. पुष्कळ वर्षांपूर्वी ‘त्या सुधारणेचा मी जागरूक शत्रु आहें’ असें आपण घोषित केलें होतें आणि आजहि आपलें चाललें तर, लाखों वर्षांपूर्वी ज्या मार्गावर ती होती त्या मार्गाकडेच तिला आपण परत घेऊन जाऊं इच्छित आहों. माझें तर या नुसत्या कल्पनेनेंच माथें फिरतें.”

एका प्रिय मित्राला ग्रामोद्योगाच्या कामीं तो आपलें सहकार्य देऊं शकेल का असें मीं विचारलें असतां त्यानें जें उत्तर दिलें त्यांतील थोडा भाग वर उद्धृत केला आहे. या मित्रानें इतक्या मोकळ्या मनानें जें आपलें मत व्यक्त केलें तसेंच मत आणखी कित्येक मंडळींचेंहि असल्याचें मला माहीत आहे; म्हणून माझी भूमिका काय हें विशद करून सांगणें बरें असें मला वाटतें. माझी जी भूमिका आहे तीच अ. भा. ग्रामोद्योग–संघाची नसती तर माझें तसें करणें एक प्रकारें धाष्ट्र्य झालें असतें.

पुनरुज्जीवित होऊं शकतील अशा ग्रामीण उद्योगधंद्यांचें पुनरुज्जीवन करण्याचा जेव्हां मी प्रयत्न करतों तेव्हां माझ्या मित्रानें आरोप केला आहे तसा कोणताहि प्रयत्न मी करीत नाहीं. ग्रामीण जीवनाचा प्रत्येक प्रेमी, खेडीं छिन्नभिन्न होणें याचा शोकजनक अर्थ काय आहे हें ओळखणारा प्रत्येकजण. जें करीत आहे किंवा करण्याचा प्रयत्न करीत आहे तेंच मी करीत आहें. खेडुतांनीं आपलें धान्य आपण दळून घ्यावें, तें पीठ त्यांच्या पौष्टिक कोंड्या-

सह त्यांनीं खावें, असें जेव्हां मी खेडुतांना सांगतों, विक्रीकरितां नसला तरी आपल्या गरजेकरितां आपल्या उंसाचा गूळ करून तोच त्यांनीं उपयोगांत आणावा असें जेव्हां मी म्हणतों, तेव्हां आधुनिक सुधारणेची गति मी का उलटवूं पाहतों ? खेडुतांना जेव्हां मी, 'नुसता कच्चा माल उत्पन्न करूनच थांबूं नका तर त्याचें बाजारी पक्क्या मालांत रूपांतर करा आणि अशा रीतीनें आपल्या रोजींत थोडी कां होईना भर टाका', असें सांगतों तेव्हां मी आधुनिक सुधारणेची गति उलटवीत असतों काय ?

आणि आधुनिक संस्कृति ही लाखों वर्षांची जुनी खास नाहीं. आपणांस तिच्या जन्माची नक्की तारीख सुद्धां सांगतां येईल. आधुनिक संस्कृतीच्या नांवाखालीं चाललेल्या पुष्कळ गोष्टी, माझें चाललें असतें तर, मीं निःसंशय नष्ट केल्या असत्या किंवा आमूलाग्र बदलल्या असत्या. पण ही माझ्या जीवनाची पुराणी कहाणी आहे. तो प्रयत्न तर खात्रीनें सुरूच आहे. त्याला यश येणें न येणें ईश्वराधीन आहे. पण चार पैसे देणाऱ्या ग्रामोद्योगांचें पुनरुज्जीवन करणें व त्यांना उत्तेजन देणें हा प्रयत्न कांहीं त्या प्रयत्नाचा भाग नाहीं; हां, तशी तर माझी प्रत्येक प्रवृत्ति तशाच तऱ्हेचा प्रयत्न असतो असें म्हणतां येईल; यांत अहिंसेचा प्रचारहि अंतर्भूत आहेच. ग्रामोद्योगांचा पुनरुद्धार म्हणजे खादी–कार्याचाच विस्तार आहे. हातकताईचा कपडा, हातानें केलेला कागद, हात-सडीचा तांदूळ, घरांत तयार केलेली रोटी व मुरंबे या वस्तू पाश्चिमात्य देशांत कांहीं नवीन नाहींत. मात्र हिंदुस्थानांत त्यांना जितकें महत्त्व आहे त्याच्या शंभरांश सुद्धां महत्त्व त्यांना तेथें नाहीं. कारण इकडे त्यांचें पुनरुज्जीवन म्हणजे खेडुतांचें जीवन व त्यांचा नाश म्हणजे खेडुतांचा मृत्यु आहे. जो पाहील त्याला हें दिसेल. यंत्रयुग वाटेल तें करो, पण तें क्रोडों लोकांना कधींहि काम देणार नाहीं; मोठ्या शक्तीवर चालणारीं यंत्रें मोठ्या प्रमाणावर आलीं कीं या क्रोडों लोकांची जागा तीं घेणारच.*

---

* 'हरिजन', ४–१–१९३५.

## सुरुवात कशी करावी ? : : ९

( १ )

पुष्कळ मंडळी पत्रें लिहून व अनेक मित्र भेटून मला विचारतात कीं, ग्रामोद्योग–कार्य आम्हीं कशा प्रकारें सुरू करावें आणि पहिल्या प्रथम कोणती गोष्ट हातीं घ्यावी ?

याचें स्पष्ट उत्तर असेंच कीं 'या कार्याचा प्रारंभ स्वतःपासूनच करावा आणि स्वतःला जें सर्वांत सुलभ आहे तेंच अगोदर करावें.'

पण या उत्तरानें पृच्छकाचें समाधान होणार नाहीं. म्हणून मी माझें म्हणणें थोडें स्पष्ट करतों.

प्रत्येकाला आपल्या रोजच्या व्यवहारांत आपण वापरीत असलेल्या अन्न, अस्त्र व इतर वस्तूंचें परीक्षण करून त्यांपैकीं ज्या परदेशी किंवा शहरी बनावटींच्या असतील त्यांच्याऐवजीं खेड्यांतील लोकांनीं आपल्या घरांत किंवा शेतांत आपल्या साध्या, बिनखर्चाच्या आणि सहज वापरतां व दुरुस्त करतां येण्याजोग्या हत्यारांनीं बनविलेल्या वस्तू वापरूं लागावें. हा बदल म्हणजेच फार मोलाचें असें शिक्षण आहे आणि तो ठोस प्रारंभ आहे. पुढें काय करावयाचें हें त्याला आपोआपच समजून येईल. उदाहरणार्थ, समजा, प्रारंभ करणारा आतांपर्यंत मुंबईच्या कारखान्यांत तयार झालेला टथ–ब्रश वापरीत

आहे व त्याला त्याच्याऐवजीं खेड्यांत तयार झालेला ब्रश पाहिजे आहे तर त्यानें बाभळीचें दांतण वापरावें. त्याचे दांत जर अधू असतील किंवा त्याला दांतच नसतील तर त्यानें दांतवणाचें एक टोंक दगडी गोट्यानें किंवा हातोडीनें जमिनीवर ठेंचावें. दुसरें टोंक चिरून त्याच्या फांकींनीं त्यानें जीभ साफ करावी. हे टूथ ब्रश कारखान्यांतील आरोग्यविघातक टूथब्रशांपेक्षां किती तरी स्वस्त व स्वच्छ असल्याचें त्याला आढळून येईल. शहरी बनावटीच्या दंतमंजनाऐवजीं साहजिकच तो वस्त्रगाळ कोळशाची पूड व मीठ समसमान मिसळून तें मिश्रण वापरील. गिरणी-कपड्याऐवजीं तो खेड्यांत काढलेली खादी घेईल, गिरणींत सडलेल्या तांदळाऐवजीं हातसडीचा, गुळगुळीत न झालेला तांदूळ घेईल, आणि पांढऱ्या शुभ्र साखरेऐवजीं खेड्यांत तयार झालेला गूळ वापरील. या गोष्टी उदाहरण म्हणून मीं सांगितल्या. त्यांचा उल्लेख मीं पूर्वी केलाच होता; पण माझ्याशीं या प्रश्नासंबंधीं चर्चा करणाऱ्या मंडळींनीं उपस्थित केलेल्या अडचणींचा विचार करतांना मीं हें पुनः लिहिलें आहे. उदाहरणार्थ, तांदळाविषयीं बोलतांना कांहीं लोक म्हणतात, 'हातसडीचा तांदूळ गिरणीच्या तांदळापेक्षां फार महाग पडतो', दुसरे कित्येकजण म्हणतात, 'हातानें सडण्याची कला विसरून गेली आहे आणि सडणारीं माणसेंच मुळीं मिळत नाहींत', तिसरे कोणी म्हणतात, 'आमच्या भागांत गिरणींत सडलेला तांदूळ मिळतच नाहीं; आम्ही रुपयाला १९ शेर हातसडीचा तांदूळ देऊं शकूं.' हे सर्वजण एक प्रकारें बरोबरहि आहेत आणि एक प्रकारें चूकहि आहेत. त्यांच्या स्वतःच्या जिल्ह्यापुरत्या अनुभवाच्या दृष्टीनें ते बरोबर आहेत. सर्वजण चूक आहेत; कारण खरें सत्य त्यांना अज्ञात आहे. माझ्याजवळ रोज जे अनुभव गोळा होत आहेत ते चकित करणारे आहेत. हें सर्व स्वतःपासून सुरुवात करण्यानें मिळत आहे. आजतागायत केलेल्या निरीक्षणाचा परिणाम पुढें दिल्याप्रमाणें आहे:—

पुरा न घांसलेला तांदूळ बाजारांत मिळत नाहीं. तो दिसायलाहि सुंदर असतो व चवीलाहि उत्कृष्ट व मधुर लागतो. अशा करडीशीं गिरण्या कधींहि चढाओढ करूं शकणार नाहींत. ती भरडण्याची रीत अगदीं साधी आहे. बहुतेक भात ( धान्य ) हलक्या घिरटीवर सहज भरडतां येतें. भाताच्या अशा

कांहीं जाती आहेत कीं, ज्यांचें भूस भरडून निघत नाहीं. अशा भाताचे तांदूळ करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे तें अगोदर उकडावें म्हणजे मग आंतल्या दाण्यापासून भूस वेगळें होतें. हा तांदूळ अत्यंत पौष्टिक असतो असें म्हणतात. अर्थात् तो अत्यंत स्वस्तहि असतो. शेतकऱ्यांनीं खेडेगांवांत आपलें भात आपणच भरडून घेतलें तर तशाच जातीच्या गिरणींत भरडलेल्या भातापेक्षां तें नेहमीं त्यांना स्वस्तच पडेल—मग तो गुळगुळीत तांदूळ असो किंवा करड असो. बाज़ारांत नेहमीं मिळणारा बहुतेक तांदूळ थोडाफार घांसून निघालेला असतो—मग तो गिरणींत भरडलेला असो किंवा हातांनीं भरडलेला असो. यत्किंचित्हि न घांसतां निघणारा तांदूळ नेहमीं हातांनीं भरडलेलाच असतो आणि तांदळाची जात तीच असेल तर, गिरणींत भरडलेल्या तांदळापेक्षां हा नेहमीं स्वस्तच असतो.

या बाबतींत आणखी संशोधन होत राहीलच. तथापि आतांपर्यंतच्या निरीक्षणानें दिसून येतें कीं, खरोखर आमच्या अक्षम्य बेपर्वाईमुळेंच तांदूळ खाणारे कोटी लोक बिघडलेला तांदूळ खातात आणि त्यासाठीं पैशाबरोबरच आपल्या शरीरस्वास्थ्याचीहि फार मोठी किंमत देतात. या निरीक्षणांत सत्व कितपत आहे हें ग्रामसेवकांनीं स्वतः अनुभव घेऊन तपासून पाहावें. ही सुरुवात कांहीं वाईट नाहीं.*

## (२)

गेल्या खेपेच्या लेखांत मी तांदळाविषयीं लिहिलें होतें. आज गव्हाचा विचार करूं. गहूं हा आहारांत पहिल्या नंबरचा नसला तरी दुसऱ्या नंबरचा अत्यंत महत्त्वाचा पदार्थ आहे. पौष्टिकपणाच्या दृष्टीनें तो धान्यांचा राजा आहे. नुसता गहूंच घेतला तर तो तांदळाहून अधिक पूर्ण आहे. गव्हाचा आटा त्याच्या मूल्यवान् कोंड्यापासून वेगळा काढला म्हणजे तो गुळगुळीत (सफा) तांदळाप्रमाणेंच समजावा. सफा तांदळाइतकाच कोंडाविरहित आटा वाईट आहे अशी साक्ष डॉक्टर लोक सर्वत्र देतात. आपल्या जात्यावर दळलेल्या संपूर्ण

*'हारिजन', २५-१-१९३५.

गव्हाचें पीठ बाजारांत मिळणाऱ्या बारीक पिठापेक्षां म्हणजे मैद्यापेक्षां केव्हांहि श्रेष्ठ व स्वस्त असतें. तें स्वस्त असतें, कारण त्यांत दळणाची मजुरी वांचते. शिवाय, बिनचाळतां घेतलेल्या गव्हाच्या पिठांत वजन घटत नाहीं; मैद्यांत वजन कमी होतें. गव्हामधील अत्यंत उत्कृष्ट भाग त्याच्या कोंड्यांत असतो. हा कोंडा जेव्हां काढून टाकला जातो तेव्हां त्यांतील पुष्टि फार भयंकर प्रमाणांत कमी होते. खेड्यांतले व इतर लोक आपल्या जात्यांत दळलेल्या गव्हाचें बिनचाळलेलें सबंध पीठ खातात तेव्हां त्यांचा पैसा तर वांचतोच, पण मुख्य म्हणजे त्यांचें आरोग्य कायम राहतें. खेड्यांतील जात्यावरचें दळण जर पुनः सुरू झालें तर पिठाच्या गिरण्या मिळवीत असलेल्या लाखों रुपयांचा मोठा हिस्सा गरजू अशा दरिद्री जनतेंत राहील व तो त्यांच्यांतच फिरत राहील.

पण जात्याचें दळण कंटाळवाणें असतें, गहूं त्यांत भरड दळला जातो आणि खेडुतांना असें स्वतःच दळणें पैशाच्या दृष्टीनें परवडत नाहीं, असे आक्षेप घेतले जातांत. खेडुतांना आपलें धान्य स्वतः दळणें जर पूर्वीः परवडत होतें तर, पिठाच्या गिरण्या आल्यानें त्यांत कांहीं फरक पडूं नये. आपल्याला सवड नसते अशी सबब त्यांनीं सांगूं नये; आणि श्रमाला बुद्धीची जोड मिळाली म्हणजे जात्यांत सुधारणा होण्याची सुद्धां पुष्कळ आशा आहे. भरड दळलें जातें या तक्रारींत वास्तविक कांहींच अर्थ नाहीं. जात्यांतून भरड दळलें जात असतें तर असंख्य वर्षें तें काळाच्या कसोटीला टिकलेंच नसतें. पण भरड दळल्या गेलेल्या पिठाचा धोका टाळण्याकरितां मी असें सुचवितों कीं, जेथें तसा संशय असेल तेथें भरड दळलेलें पीठ चाळणींतून चाळून घ्यावें आणि वर राहिलेल्या भरडीची घट्ट कांजी करावी व ती चपातीबरोबर किंवा नंतर खावी. ही योजना जर अंमलांत आणली तर दळणें म्हणजे हातचा मळ होऊन जातो आणि पुष्कळसा वेळ व पैसा त्यामुळें वांचूं शकतो.

हा सर्व बदल कार्यकर्त्यांनीं जर थोडी पूर्वतयारी केली व खेड्यांतील लोकांना नीट समजावून दिलें तरच अंमलांत येणें शक्य आहे. या कामाला कोणी 'वाहवा' म्हणणार नाहीं. पण जर खेड्यांतील लोक निरोगी व थोडे सुखांत राहावयाला पाहिजे असतील तर हें काम करणें अवश्य आहे.

यानंतर गुळाकडे आपण लक्ष दिलें पाहिजे. जे वैद्यकीय पुरावे मीं 'हरिजन'च्या अंकांत दिले आहेत त्यावरून अन्नमूल्याच्या दृष्टीनें पांढऱ्या शुभ्र साखरेपेक्षां गूळ हा केव्हांहि अधिक श्रेष्ठ आहे आणि खेड्यांतील लोकांनीं जर गूळ तयार करण्याचें बंद केलें—आणि त्याला सुरुवात झालीच आहे—तर त्यांच्या मुलांबाळांच्या आहारांत अत्यंत अवश्य असणारें अन्न ते हातचें घालवितील. त्यांनीं स्वतः गूळ खुशाल न खावा. पण मुलांची ताकद राहावयाला हवी असेल तर त्यांनीं गूळ सोडून भागणार नाहीं. बाजारांत मिळणाऱ्या मिठाईपेक्षां व पांढऱ्या साखरेपेक्षां गूळ हा अधिक चांगला आहे. सर्वसाधारण लोकांनीं गुळाचा वापर कायम ठेवणें म्हणजे खेड्यांतील लोकांच्या खिशांत कित्येक कोटी रुपये राखणें होय.

पण कांहीं कार्यकर्त्यांचें म्हणणें आहे कीं, गुळामध्यें उत्पादनाचा खर्च सुद्धां निघत नाहीं. उंसाचें पीक करणाऱ्या शेतकऱ्यांना उभ्या पिकावर पैसा पाहिजे असतो; उंसाचा गूळ करावयाचा आणि तो बाजारांत विकावयाचा इतका अवकाश त्यांना नसतो. या म्हणण्याविरुद्ध माझ्याकडे पुरावा आहे; तथापि या म्हणण्यालाहि अर्थ नाहीं असें नाहीं. माझ्या जवळ त्याला ताबडतोब उत्तर नाहीं. ज्या ठिकाणीं कच्चा माल उत्पन्न होतो त्याच ठिकाणीं त्या कच्च्या मालाची उपयुक्त पक्की वस्तु तयार होऊनहि तिचा मजुरीचा खर्च सुद्धां निघूं नये यांत मुळांतच कांहीं तरी चूक असली पाहिजे. असें प्रत्येक उदाहरण त्या त्या ठिकाणीं जाऊन तपासून पाहून शोध केला पाहिजे. खेड्याच्या लोकांनींच दिलेलें उत्तर गृहीत धरून, कार्यकर्त्यांनीं 'याला उपाय नाहीं,' असें म्हणून निराश होतां कामा नये. गुळाच्या या बाबींतून हे गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झाले; पण असेच प्रश्न सोडविण्यावर राष्ट्राची उन्नति आणि शहरांचा गांवांशीं मेळ या गोष्टी साधणार आहेत. खेड्यांतून गूळ नष्ट होतां कामा नये, मग त्यासाठीं शहरांतील लोकांना एकादा पैसा जास्त द्यावा लागला तरी चालेल, असा निश्चय आपण केला पाहिजे.

---

*'हरिजन', १-२-१९३५.

(२)

आहाराच्या कांहीं विशिष्ट वस्तूंविषयीं चर्चा करून खेड्यांतील लोकांचें स्वास्थ्य आणि संपत्ति या बाबतींत त्यांचें किती महत्त्व आहे हें मीं पूर्वीं दाखवून दिलेंच आहे. पण, त्याचप्रमाणें सफाई व आरोग्यरक्षण या प्रश्नांचेंहि तितकेंच महत्त्व आहे. या गोष्टींकडे जर योग्य लक्ष पुरविलें गेलें तर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणें आरोग्य, शक्ति आणि संपत्ति यांची वृद्धि होईल.

कांहीं परदेशी लेखकांनीं असा निर्वाळा दिला आहे कीं, पृथ्वीच्या पाठीवरील सर्व देशांत व्यक्तिगत स्वच्छतेच्या पालनाच्या बाबतींत हिंदुस्थान कदाचित् वरचढ ठरेल. पण आमच्या सामुदायिक, म्हणजेच दुसऱ्या शब्दांत खेड्यांच्या, स्वच्छतेच्या बाबतींतहि तसेंच विधान करणें शक्य होईलसें मला वाटत नाहीं. पुनः दुसऱ्या शब्दांत बोलावयाचें तर, आपण कौटुंबिक हित-संबंधाच्या फारसें पुढें पाऊल कांहीं टाकलेलें नाहीं. आपण कुटुंबाकरितां वाटेल तें बलिदान करूं, पण खेड्याकरितां म्हणजेच एक प्रकारें राष्ट्राकरितां मात्र करणार नाहीं.

कुटुंबांतील माणसें आपलें स्वतःचें घर स्वच्छ ठेवतील, पण शेजाऱ्याच्या घराची स्वच्छता राखण्याकडे त्यांचें लक्ष असणार नाहीं. ते आपल्या अंगणांतील केरकचरा, किडामुंगी काढून टाकून तें स्वच्छ ठेवतील; पण तीच घाण शेजाऱ्याच्या अंगणांत टाकावयाला ते कमी करणार नाहींत. सामुदायिक जबाबदारीच्या या अभावाचा परिणाम म्हणजे आमचीं खेडेगांवें उकिरडे बनलीं आहेत. आमच्या देशांत उघड्या पायांनीं चालण्याचा रिवाज आहे; तथापि आम्ही आमच्या सडका व रस्ते इतके घाण करतों कीं, एकाद्या चोखंदळ मनुष्याला त्यांवरून चालणें कष्टप्रद होतें. गांवच्या विहिरींत, तळ्यांत किंवा ओढ्यांत स्वच्छ, पिण्याजोगें पाणी मिळणें कठिण असतें. एकाद्या सामान्य खेड्यांत जाणाऱ्या वाटा कचऱ्यांनीं आणि घाणींनीं भरलेल्या असतात.

खेड्यांची स्वच्छता हे ग्रामोद्योग–संघापुढील सर्वांत बिकट काम म्हणतां येईल. कोणतेंहि सरकार लोकांच्या अंतःकरणपूर्वक सहकार्यावांचून त्यांच्या

संबयी बदलूं शकणार नाहीं. आणि हें सहकार्य जर मिळालें तर सरकारला त्यांत फारच थोडें करावें लागेल.

डॉक्टर व विद्यार्थी अशा बुद्धिमान् वर्गानें जर बुद्धिपुरस्सर, डोकें चालवून, कळकळीनें आणि नियमितपणें खेड्यांमधून हें काम केलें तर त्यांना हा प्रश्न यशस्वी रीत्या सोडवितां येईल. व्यक्तिगत त्याचप्रमाणें सामुदायिक आरोग्याच्या बाबतींत दक्ष असणें हा सर्व शिक्षणाचा प्रारंभ आहे.

खेड्यांमध्यें लक्ष देण्याजोग्या गोष्टी म्हणजे तळीं व विहिरी स्वच्छ करणें व ठेवणें आणि गांवांतून उकिरडे हलविणें. कार्यकर्त्यांनीं स्वतःच काम करावयाला जर सुरुवात केली, पगारी भंग्याप्रमाणें रोजच्या रोज जर ते काम करूं लागले आणि गांवच्या लोकांनींच शेवटीं तें काम करावयाचें आहे याकरितां त्यांनीं आपल्याला येऊन मिळावें अशीं आपली अपेक्षा जर त्यांनीं लोकांना नेहमीं जाणवून दिली तर आज ना उद्यां गांवचे लोक आपल्याशीं सहकार्य करीत असलेले त्यांना आढळून येतील याची त्यांनीं खात्री बाळगावी. निदान दक्षिण आफ्रिका व चंपारण्य येथील आणि गतवर्षींच्या माझ्या ओरिसामधील झपाट्याच्या पायीं प्रवासांतील माझा अनुभव असा आहे.

गल्ल्या व रस्ते यांवरील सर्व गदाळा काढून स्वच्छता करावी. आणि गदाळ्याची विल्हेवारी लावावी. त्यांत कांहीं भाग असा असतो कीं, त्याचें खत होऊं शकतें, कांहीं भाग केवळ पुरून टाकावयाचा असतो आणि कांहीं भागाचें तात्काळ संपत्तींत रूपांतर करतां येतें. वेंचलेलें प्रत्येक हाड हा मोलाचा कच्चा माल आहे व त्यापासून उपयुक्त वस्तू बनवितां येतात किंवा त्याचें दळून उत्कृष्ट खत तयार करतां येतें. चिंध्या व फाटलेले कागद यांचा कागद बनवितां येतो आणि गोळा केलेल्या मैल्याचें गांवच्या शेतांना सोनखत मिळतें. मैल्याचा उपयोग करावयाचा म्हणजे तो पातळ असो वा घट्ट असो, जास्तींत जास्त एक फूट खोल खणलेल्या जमिनीच्या मातींत वरच्यावर मिसळून टाकावयाचा. डॉ. पुअर हे 'गांवचें आरोग्य' या विषयावरील आपल्या पुस्तकांत म्हणतात कीं, मैला पुरावयाचा तो नऊ किंवा बारा इंच खोल जमिनींतच पुरला पाहिजे. (मी हें मला आठवतें तसें देत आहें.) ग्रंथकर्त्याचें म्हणणें असें आहे कीं, या

वरवरच्या मातींत सूक्ष्म जीवजंतू भरलेले असतात. या मातींत प्रकाश आणि हवा सहज शिरतात, त्यांचें या सूक्ष्म जीवजंतूंशीं मिश्रण होऊन एका आठवड्याच्या आंत मैल्याचें सुरेख, मऊ, मधुर वासाच्या मातींत रूपांतर होतें. कोणाहि गांवकऱ्याला याचा स्वतः अनुभव घेतां येईल. हें करून पाहण्याचा मार्ग म्हणजे एक तर पक्के संडास बांधून त्यांत मातीच्या कुंड्या किंवा बादल्या ठेवावयाच्या आणि रोजच्या रोज योग्य रीतीनें तयार केलेल्या जागेंत त्यांतील मैला-पाणी ओतून द्यावयाचें, किंवा जमिनींत चौरस खळगे पाडून सरळ त्यांतच शौचाला बसावयाचें. मैला गांवच्या सार्वजनिक शेतांत किंवा व्यक्तींच्या मालकीच्या शेतांत पुरतां येईल. गांवच्या लोकांच्या सहकार्यानें हें करतां येईल. एखाद्या साहसी खेडुताला मैला गोळा करून कमींत कमी त्यांतून आपल्यापुरती संपत्ति निर्माण करतां येईल. आज लाखों रुपये मोलाचें हें उत्कृष्ट खत रोज फुकट चाललें आहे, त्यामुळें हवा बिघडते आहे आणि रोग फैलावत आहेत.

खेड्यांतील तळ्यांचा उपयोग सर्रास स्नानाकरितां, कपडे धुण्याकरितां आणि पिण्याच्या व स्वयंपाकाच्या पाण्याकरितां केला जातो. पुष्कळ तळ्यांची गुरेंढोरेंहि उपयोग करतात. म्हशी-रेडे पुष्कळ वेळां त्यांत लोळत पडलेले दिसून येतात. आश्चर्य हें आहे कीं, गांवच्या तळ्यांचा असा पापयुक्त दुरुपयोग होत असतांना सुद्धां खेड्यांचा सांथीच्या रोगांनीं नाश झालेला नाहीं. जगांतील डॉक्टरलोकांची साक्ष आहे कीं, खेड्यांतील पुरवठ्याचें पाणी स्वच्छ राहीलच इकडे दुर्लक्ष केल्यामुळेंच खेड्याच्या लोकांना पुष्कळशा आजारांना बळी पडावें लागतें.

हें सेवाकार्य अलौकिक आनंद देणारें व शिक्षण देणारें आहे व हिंदुस्थानच्या पीडित जनतेला त्यापासून अगणित लाभ होणार आहे, हें कोणीहि कबूल करील. हा प्रश्न कसा हाताळावा यासंबंधीं वर मीं जें विवेचन केलें आहे त्यावरून हें स्पष्ट होईल कीं, जर कार्यकर्ते खुषीनें कामाला लागले आणि लेखणी-पेन्सिल जितक्या सुलभपणे व अभिमानानें ते चालवितात तितक्यांच सुलभतेनें व अभिमानानें ते जर झाडू व फावडें चालवूं लागले तर खर्चाचा प्रश्न जवळजवळ मिटूनच जाईल, अशी मला आशा वाटते. जें काय

भांडवल लागेल तें एक झाडू, एक बुट्टी, एक फावडें, एक छोटीशी कुऱ्हाड आणि फार तर थोडें जंतुनाशक द्रव्य एवढ्यापुरतेंच लागेल. कोरडी राख ही कोणत्याहि केमिस्टकडे मिळणाऱ्या जंतुनाशकाइतकीच परिणामकारक असूं शकते. पण या बाबतींत खेडुतांना आपल्या खेड्यांत मिळूं शकेल अशा प्रकारचें अत्यंत परिणामकारण व स्वस्त ग्रामीण जंतुनाशक कोणतें तें आम्हांस सेवापरायण रसायनशास्त्रज्ञांनीं सांगावें.*

*'हरिजन' ३-२-१९३५.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

## कातड्याचा धंदा : : १०

आमच्या खेड्यांतील कातडें कमावण्याचा धंदा हा भारतवर्षा-इतकाच प्राचीन आहे. कातडें कमावण्याचा हा धंदा नीच केव्हां समजला जाऊं लागला तें कोणी सांगूं शकणार नाहीं. प्राचीन काळीं तो नीच समजला जात नसला पाहिजे. परंतु आज आपल्या या अत्यंत उपयुक्त व अवश्यक उद्योगानें जवळ जवळ दहा लाख लोकांना वंशपरंपरा अस्पृश्य करून ठेवलें आहे हें आपल्याला माहीत आहे. ज्या दिवसापासून श्रमाचा तिरस्कार होऊं लागून तो करण्याकडे दुर्लक्ष होऊं लागलें तो या दुर्भागी देशांतील कुदिन होय. पृथ्वीचें जणूं सत्त्वच असे क्रोडों लोक—कीं ज्यांच्या उद्योगशीलत्वावरच या देशाचें अस्तित्व अवलंबून होतें—ते नीच जाति म्हणून समजण्यांत येऊं लागले आणि वेळ रिकामा घालविणाऱ्या, अगदीं हाताच्या बोटांवर मोजतां येणाऱ्या लोकांना प्रतिष्ठितपणा मिळाला ? याचा दुःखद परिणाम असा झाला कीं, हिंदुस्थानाची नैतिक आणि आर्थिक दोन्ही प्रकारची हानि झाली. या दोहोंतून कोणती हानि मोठी याचा हिशेब करणें अशक्य नसलें तरी कठिण तर आहेच. परंतु शेतकरी व कारागीर यांच्या बाबतींत दाखविलेल्या दोषास्पद बेपर्वाईमुळें आपण दरिद्री, जडमूढ आणि कायमचे आळशी बनलों आहों. उत्कृष्ट हवा, उंच पर्वत, प्रचंड नद्या आणि विस्तृत असा समुद्रकिनारा यांमुळें हिंदुस्थानापाशीं साधनसंपत्ति अलोट आहे; तिचा खेड्यांपाड्यांतून उपयोग

करून घेतला गेला असता तर दारिद्र्य आणि रोगराई येऊंच शकली नसती. पण जेव्हांपासून आम्ही शरीर–परिश्रमाची व बुद्धीची फारकत करूं लागलों तेव्हांपासून आमच्या राष्ट्राचें सर्व बाजूंनीं पतन होऊं लागलें. जगांत आज आपण सर्वांत अल्पायुषी, अत्यंत साधनशून्य आणि भयंकर लुबाडले गेलेले लोक बनलों आहों. कातड्याच्या देशी धंद्याची आज जी परिस्थिति आहे तीच कदाचित् माझें हें म्हणणें सिद्ध करून दाखवील. स्व० मधुसूदन दास, यांनीं माझे डोळे उघडले आणि मानवसमाजाच्या एका भागावर होणारा अत्याचार माझ्या दृष्टो-त्पत्तीस आणला. त्यांनीं एक चर्मालय उघडून या पातकाचें प्रायश्चित्त घेण्याचा प्रयत्न केला आहे. हें चर्मालय शैक्षणिक स्वरूपाचें आहे. त्यांचें हें कार्य त्यांच्या अपेक्षेप्रमाणें फलद्रूप झालेलें नसलें तरी कटक येथील शेंकडों चर्मकारांना त्यामुळें धंदा मिळाला आहे.

हिंदुस्थानांतून दरसाल नऊ कोटी रुपये किंमतीचें कातडें बाहेर निर्यात, होतें व तितकेंच तयार मालाच्या रूपानें हिंदुस्थानांत परत येतें, असा अंदाज केला गेला आहे. ही केवळ पैशाचीच गळती नसून बुद्धीचीहि आहे. कातडें कमावण्यामध्यें जें शिक्षण आम्हांला मिळालें पाहिजे तें आम्हांला मिळत नाहीं आणि आपल्या रोजच्या वापरासाठीं लागणाऱ्या कातड्याच्या असंख्य वस्तु तयार करण्याचेंहि शिक्षण आम्हांला मिळत नाहीं.

कातडें कमावण्याला तांत्रिक कसब लागतें. या महान् उद्योगामध्यें आपल्या शोधक बुद्धिला पुष्कळ वाव असल्याचें कित्येक रसायनशास्त्रवेत्त्यांना आढळून येईल. हा उद्योग वाढविण्याचे दोन मार्ग आहेत. एक म्हणजे, जे हरिजन गांवांत राहतात, पण गांवच्या वस्तीपासून दूर, समाजाच्या संसर्गा-पासून अलग, तुटक्याफुटक्या वाणेरड्या झोंपड्यांत पडून सडत आहेत आणि मोठ्या मुष्किलीनें बिचारे कसें तरी पोट भरीत आहेत, त्यांना मदत करून त्यांचा उद्धार करणें. हा मार्ग म्हणजे खेड्यांची पुनर्घटना करणें आणि त्यांच्याकडे कला, शिक्षण, स्वच्छता, समृद्धि आणि प्रतिष्ठा नेणें आहे. याचा अर्थ रसायनशास्त्र जाणणारी बुद्धि गांवच्या उद्धाराकडे लावणें असाहि आहे. कातडें रंगविण्याचें रसायनशास्त्र जाणणाऱ्यांना रंगविण्याच्या

सुधारलेल्या पद्धतीहि शोधून काढाव्या लागतील. गांवच्या रसायनशास्त्राज्ञाला नम्रतापूर्वक ही कला हस्तगत करावयाची आहे. खेड्यांत चाललेलें ओबड धोबड रंगकाम त्यानें शिकून समजून घेतलें पाहिजे; तें अजून अस्तित्वांत आहे, पण त्याला पाठिंबा नसल्यामुळें म्हणा किंवा त्याची हेळसांड केल्यामुळें म्हणा, तें झपाट्यानें नष्ट होत चाललें आहे. पण ती कला धोबड आहे म्हणून एकदम काढून टाकणें बरोबर नाहीं; निदान तिचें सहानुभूतिपर्वक परीक्षण तरी अगोदर झालें पाहिजे. तिनें शतकानुशतकें चांगलें काम दिलें आहे. तिच्यांत कांहींच चांगुलपणा नसता तर तिनें चांगलें काम दिलें नसतें. माझ्या माहितीप्रमाणें या बाबतींत, फक्त शांतिनिकेतन येथेंच संशोधन सुरू आहे आणि त्यानंतर तें साबरमतीच्या आश्रमांत सुरू केलें गेलें आहे; शांतिनिकेतन येथील प्रयोगाची प्रगति किती झाली याकडे मी वरचेवर लक्ष पुरवूं शकलों नाहीं. साबरमतीच्या आश्रमाचा आज जो हरिजन–आश्रम बनला आहे त्या आश्रमामध्यें त्याचें पुनरुज्जीवन होण्याची फार मोठी शक्यता आहे. जें कांहीं संशोधन व्हावयाचें आहे त्या संशोधन–सिंधूमध्यें हे प्रयोग म्हणजे केवळ बिंदुवत् आहेत.

गोरक्षण हें हिंदुधर्माचें एक मोठें अंग आहे. हाडाचा हरिजन खाण्यासाठीं कधींहि संहार गुरांचा करणार नाहीं. पण अस्पृश्य झाल्यामुळें त्याला मृतमांस खाण्याची वाईट संवय लागली आहे. तो गाय मारून खाणार नाहीं, पण मेलेल्या गाईचें मांस मात्र मोठ्या आवडीनें खाईल. शरीरशास्त्राच्या दृष्टीनें हें मांस कदाचित् हानिकारक नसेल, पण मानसिक दृष्टीनें हें मुर्दाड मांस खाण्याइतकी तिरस्करणीय गोष्ट दुसरी कोणतीहि नाहीं. तरीहि एकाद्या चर्मकाराच्या घरीं एकादी मेलेली गाय येते तेव्हां तो साऱ्या घरादाराचा उत्सवाचा दिवस होतो ? मुलें त्या मुडद्याभोंवतीं फेर धरून नाचतात आणि जनावराचें कातडें जेव्हां सोलून काढलें जातें तेव्हां तीं त्यांतील हाडें किंवा मांसाचे तुकडे उचलतात आणि एकमेकांच्या अंगावर फेंकतात. साबरमतीच्या हरिजन–आश्रमांत एक चर्मकार आहे, त्यानें आपलें घर आतां सोडलें आहे. त्या घरांतील देखाव्याचें वर्णन करतांना तो सांगतो कीं, मेलेलें जनावर दृष्टीस पडतांच साऱ्या घरादाराला आनंदाच्या उकळ्या फुटतात ! मृतमांस खाण्याची आत्मघातकी

संवय हरिजनांनीं सोडावी याकरितां प्रयत्न करतांना मला किती अडचणी आल्या आहेत त्या माझ्या मलाच माहीत? कातडें रंगविण्याची पद्धति सुधारली कीं, मृतमांस खाण्याचें आपोआप सुटेल.

तेव्हां या ठिकाणीं चांगल्या बुद्धिमत्तेची व जनावरें फाडण्याच्या कलेची जरूर आहे. गोरक्षणाच्या दिशेनें तें एक फार मोठें पाऊल आहे. गाईची दूध देण्याची कुवत कशी वाढवावी ही कला जर आपण शिकलों नाहीं, जर तिची अवलाद सुधारून बैलाला शेतकामाच्या व ओझीं वाहण्याच्या दृष्टीनें अधिक उपयुक्त बनविलें नाहीं, जर तिच्या शेणा–मुताचा खत म्हणून शास्त्रीय पद्धतीनें उपयोग केला नाहीं, आणि जेव्हां गायी–बैल मरतात तेव्हां त्यांच्या चामड्याचा, हाडांचा, मांसाचा, आंतड्यांचा वगैरे सर्वोत्कृष्ट उपयोग करण्याला जर आपण तयार झालों नाहीं तर गायीं बैलांची कत्तल कसायांच्या हातून व्हावयाची हें ठरलेंच आहे.

आज मला फक्त मेलेल्या ढोरांच्या मुडद्यांसंबंधींच बोलावयाचें आहे. या ठिकाणीं आपण ही गोष्ट चांगली लक्षांत ठेवली पाहिजे कीं, ईश्वराच्या कृपेनें गांवच्या चर्मकाराला कापलेल्या ढोरांचें नव्हे तर नैसर्गिक रीतीनें मेलेल्या ढोरांचेंच कांतडें सोलावें लागतें. मेलेलें जनावर चांगल्या प्रकारें उचलून घेऊन जाण्याचें योग्य साधन त्याच्याजवळ नसतें. तो त्याला उचलतो, फरफटत नेतो; त्यामुळें कातड्याची खराबी होते व त्याची किंमत कमी होते. गांवच्या लोकांना व जनसमुदायाला चर्मकार करीत असलेल्या बिनमोल व थोर सेवेचा मोठेपणा समजला, तर ते त्याला कातडें बिलकूल खराब न होईल अशा रीतीनें मेलेलें जनावर हलविण्याचीं साधीं, सोपीं साधनें व पद्धति पुरवितील शिकवितील.

यानंतरची क्रिया म्हणजे जनावराचें कांतडें सोलून काढण्याची. हींत अतिशय कौशल्याची जरूर आहे. गांवचा ढोर आपल्या गांवठी सुरीनें हें काम जितकें सफ़ाईदार करतो तितकें कोणीहि, अगदीं एखादा सर्जनसुद्धां, करूं शकणार नाहीं असें मला सांगण्यांत आलें आहे. ज्यांना याचें ज्ञान आहे असें समजलें जातें त्यांना मीं याबाबत विचारलें. ते मला गांवच्या

ढोरांच्या पद्धतीपेक्षां अधिक सुधारलेली पद्धति दाखवूं शकले नाहींत. अर्थात्च याचा अर्थ असा नव्हे कीं, याहून चांगली पद्धति असणारच नाहीं. मी वाचकांना फक्त माझ्या अत्यंत मर्यादित अनुभवाचा लाभ देत आहें. गांवचा ढोर हाडांचा कांहींच उपयोग करीत नाहीं; तो तीं फेंकूनच देतो. कातडें सोलून काढतांना मुडद्याच्या आजूबाजूला कुत्रीं फिरत असतात; तीं सर्व नसलीं तरी कांहीं हाडें पळवितातच. देशाचा हा मोठा तोटा आहे. हाडांचा दुसरा उपयोग होतो तो सोडून दिला तरी त्यांचें बारीक पीठ केलें तरी तें एक अत्युत्कृष्ट खत होतें. कुत्र्यांनीं पळविल्यानंतर जीं कांहीं हाडें उरतात तीं विदेशाला पाठविलीं जातात आणि त्यांच्या मुठी, बटनें इ. माल तयार होऊन तो परत आमच्याकडे येतो.

दुसरा मार्ग म्हणजे हा महान् उद्योग शहरांत घेऊन जाणें. हिंदुस्थानांत हें काम करणारीं अनेक चर्मालयें आहेत. त्यांची तपासणी हें या लेखाच्या क्षेत्राबाहेरचें काम आहे. हा धंदा शहरांत नेल्यानें हरिजनांचें कांहींच हित होणार नाहीं आणि खेड्यांचें तर नाहींच नाहीं. त्यामुळें खेड्यांतील दुप्पट संपत्ति नाहींशी होईल. उद्योगधंदे शहरांत घेऊन जाऊन वसविण्यांत हिंदुस्थानांतील खेड्यांचें व खेड्यांतील लोकांचें धीरे धीरे पण निश्चित मरण आहे. हिंदुस्थानांतील सात लाख खेड्यांत राहणाऱ्या नव्वद टक्के जनसंख्येचा निर्वाह शहरांत उद्योगधंदे सुरू करण्यानें कधींहि होऊं शकणार नाहीं. कातड्यांचा आणि असेच इतर धंदे खेड्यांतून बाहेर नेणें म्हणजे तेथें अजूनहि बुद्धीचें व हातांचें कौशल्य उपयोगांत आणण्याला जो कांहीं थोडासा वाव आहे तो काढून घेणें होय. आणि खेड्यांतील हस्तव्यवसाय जेव्हां नष्ट होतील तेव्हां खेड्यांतील लोकांना आपल्या ढोरांबरोबर फक्त शेतांत राबण्याचेंच काम राहील. वर्षांतून त्यांचे चार किंवा सहा महिने आळसांत जातील. त्यामुळें (मधुसूदन दास यांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे) त्यांची अवस्था पशूंसारखीच होऊन त्यांच्या मनाला किंवा शरीराला भरपूर पोषण मिळणार नाहीं, आणि त्यांच्या जीवनांत आनंद आणि आशा यांना अत्यल्पहि बिलकूल स्थान राहणार नाहीं.

या ठिकाणीं शंभर टक्के स्वदेशीविषयीं प्रेम असणाऱ्या सेवकाला काम आहे. आपलें धंदेवाईक कसब एका मोठ्या प्रश्नाचा निकाल लावण्याच्या कामीं उपयोगांत आणण्याला त्याला या ठिकाणीं वाव आहे. एका दगडानें तीन आंबे पाडण्यासारखें हें काम आहे. तें हरिजनांच्या फायद्याचें आहे, तें खेडेगांवच्या लोकांना उपयोगीं पडणारें आहे, आणि त्यानें काम शोधीत फिरणाऱ्या मध्यम वर्गांतील बुद्धिजीवी लोकांना प्रतिष्ठित उद्योग मिळतो. भरींत भर म्हणजे त्यामुळें बुद्धिजीवी वर्गाचा खेड्यांतील लोकांशीं प्रत्यक्ष संबंधाला येण्याची योग्य संधी मिळते.*

* 'हरिजन', ७-९-१९३४.

## “ श्रम वांचविणारीं यंत्रें का नकोत ? ” : : ११

अ. भा. ग्रामोद्योग–संघ स्थापन होणार असें समजतांच ज्या एका बाईना मोठा उत्साह वाटला होता, त्या बाई, माझा प्रारंभींचा कार्यक्रम–विषयक लेख वाचून लिहितात.

“उखळ व मुसळ यांनीं तांदूळ सडणें आणि जात्यावर दाणे दळणें हीं कामें पुनरुज्जीवित करण्याच्या व त्यांना उत्तेजन देण्याच्या विचारानेंच मला धक्का बसला आणि ग्रामसेवेसंबंधींचा माझा सारा उत्साह मावळला. ग्रामोन्नतीच्या योजनेंत श्रम वांचविणाऱ्या यंत्रांचा लाभ न घेणें म्हणजे मला तरी निदान वेळेचा व शक्तीचा भयंकर अपव्यय वाटतो. गांवच्या लोंकांनीं व ग्रामसेवकांनीं उखळ आणि जाते घेऊन बसावयाचें म्हटलें म्हणजे ग्रामसुधारणेच्या कामासाठीं त्यांना फुरसत मिळणें कठिणच. उखळ आणि जातें यांचें जुनें रडगाणें पुनः सुरू झालें तर आरंभीं आरंभीं कांहीं पुरुष हें काम उत्साहानें करतील, पण शेवटीं या साऱ्या दळण्या–कांडण्याचा भार आम्हां बायकांवरच येऊन पडेल आणि आम्ही आतांपर्यंत जी थोडीबहुत प्रगति केली आहे तिला या कामामुळें धक्का पोंचेल.”

या तक्रारीच्या मुळाशीं एक प्रकारची भ्रामक समजूत आहे. श्रम वांचविणाऱ्या यंत्रांचा फायदा घ्यावयाचा नाहीं असा प्रश्नच नाहीं. गांवच्या लोकांना पोटभर अन्न आणि अंगभर वस्त्र मिळत असतें तर हातांनीं दळण्या–कांडण्याचें कांहीं कारणच नव्हतें. अर्थातच त्यांचा आरोग्याचा प्रश्न फारसा महत्त्वाचा नाहीं किंवा तो महत्त्वाचा असला तरी जात्यावर दळलेल्या व गिरणींत दळलेल्या पिठांत किंवा घरीं कांडलेल्या व गिरणींत सडलेल्या तांदळांत कांहीं फरक नाहीं असें गृहीत धरलें आहे. पण प्रश्न असा आहे कीं, ग्रामवासी लोकांनीं जेव्हां आपल्या स्वतःच्या वापरापुरतें सुद्धां दळणें व कांडणें सोडून दिलें; तेव्हां ते आळशी बनले आणि आपल्या रिकाम्या वेळेचा आपल्या उद्धाराकरितां किंवा इतर कारणाकरितांहि त्यांनीं सदुपयोग केलाच नाहीं. उपाशीं मरणारा पुरुष (किंवा बाई) रिकाम्या वेळीं प्रामाणिकपणें चार पैसे मिळवूं शकली तर त्यांत त्याला (वा तिला) खचित आनंद होईल; कारण, आपलें रिकामें पोट भरण्याकरितां दोनचार पैसे मिळविण्याच्या कामीं तो आपला वेळ खर्चीं घालत असेल अशा वेळीं हा 'श्रम वांचविण्या'चा उपदेश त्यांला विषासारखाच वाटेल. ग्रामसेवकाला गांवांत दळण्याकांडण्याचें काम करावें लागेल ही या बाईची कल्पना चुकीची आहे. अर्थातच या कला त्यानें अवश्य शिकून घेतल्या पाहिजेत आणि उखळ, मुसळ, जातें यांची आणि अशाच दुसऱ्या अवजारांची माहिती त्याला अवश्य असली पाहिजे. त्यायोगें त्यांत कशा सुधारणा कराव्या याचा सल्ला तो लोकांना देऊं शकेल आणि त्यांच्या मर्यादाहि तो चांगल्या रीतीनें समजूं शकेल. 'उत्साहाच्या पहिल्या भरांत पुरुष दळण्याकांडण्याचं काम स्वखुषीनें करतील किंवा त्यांना करावयाला सांगितलें जाईल पण शेवटीं हा सारा भार आम्हां अबलांच्या डोक्यावरच येऊन पडेल' हेंहि या बाईचें म्हणणं बरोबर नाहीं. खरी गोष्ट अशी आहे कीं, दळणें–कांडणें हा स्त्रियांचा खास अधिकार होता आणि लाखों स्त्रिया या प्रतिष्ठित व बलवर्धक उद्योगाच्या साह्यानें स्वतःच आपला निर्वाह चालवीत होत्या. आज त्यांना जबरदस्तीनें निरुद्योगी राहावें लागत आहे कारण त्यांच्यापैकीं बहुतेकांचे जे उद्योग आम्हीं हिरावून घेतले आहेत त्यांच्या बदलीं दुसरे उद्योग त्यांना मिळालेले नाहींत.

या बाई स्त्रियांनीं केलेल्या ‘थोड्याबहुत प्रगती’ संबंधीं लिहितात तेव्हां त्यांच्या डोळ्यापुढें फक्त शहरांतील स्त्रियाच आहेत. कारण खेडेगांवच्या जीवनाला आमच्या कार्यकर्त्यांनीं अजूनपर्यंत स्पर्शहि केलेला नाहीं. बहुसंख्य कार्यकर्त्यांना या विशाल देशांतील सात लाख खेड्यांमधून लोक राहातात कसे, याचेंहि ज्ञान नाहीं. त्या बिचाऱ्यांचीं शरीरें पौष्टिक आहार व आवश्यक तितका संरक्षक कपडा मिळत नसल्यामुळें किती खंगून गेलीं आहेत याचेंहि आम्हांला ज्ञान नाहीं. आणि निःसत्त्व तांदूळ व पीठ हें जें आज त्यांचें मुख्य अन्न आहे, त्यावर पोषण करावें लागल्यामुळें त्यांच्यांतील व त्यांच्या मुलांबाळांतील दमदारपणा व राहिलें-साहिलें चैतन्यहि कसें नष्ट होत चाललें आहे याची आम्हांला दादहि नाहीं.

दळण्या-कांडण्याच्या प्रेमाकरितांच दळण्या-कांडण्याची जुनाट पद्धती पुनः चालू करण्याची तरफदारी मी करीत नाहीं. त्या पुनः हातीं घेण्याचें मी सुचवीत आहे तें अशाकरितां कीं, निरुद्योगी बनलेल्या कोट्यवधि खेडुतांना काम देण्याचा दुसरा कोणताहि मार्ग नाहीं. रोज रोज वाढत चाललेली आर्थिक हलाखी जर आपण दूर केली नाहीं तर खेडेगांवांचा उद्धार अशक्य आहे असें माझें मत आहे. म्हणून आपल्या आळसांत जाणाऱ्या वेळेचा उपयोग करण्याकडे गांवच्या लोकांचें मन वळविणें हेंच खुद्द एक भक्कम ग्रामोद्धाराचें काम आहे. या बाईना व त्यांच्यासारख्या विचारांचे जे असतील त्यांना माझें सांगणें आहे कीं, त्यांनीं कोणत्या तरी खेड्यांत जावें, कांहीं काळ तेथील लोकांमध्यें राहावें व तेथें त्यांच्याप्रमाणें राहण्याचा प्रयत्न करावा, म्हणजे मग त्यांना माझ्या म्हणण्यांत असलेला तथ्यांश बरोबर कळून येईल.*

पाने १४४
३६, भवानी

* ‘हरिजन’, ३०-११-१९३४.

## ग्रामोद्योग–संघ हा काय आहे? : : १२

[ युक्तप्रांतांतून गांधीजींची भेट घेण्याकरितां आलेल्या एका सद्गृह-स्थांनीं २८ जानेवारीं १९३५ रोजीं गांधीजींशीं जी चर्चा केली, ती दैनिक पत्रांतून या ठिकाणीं उद्धृत केली आहे. प्रसिद्ध करण्यापूर्वीं गांधीजींना ही दाखविलेली आहे. —म. दे. ]

प्रश्न:—आपल्या कल्पनेप्रमाणें, ग्रामोद्योग–संघाच्या कामाला आपण केव्हांपासून सुरुवात करणार आहां?

गांधीजी—कामाची 'सुरुवात' याचा अर्थ काय तें सांगणें कठिण आहे. पण त्याचा अर्थ गांवांत वेगवेगळ्या कार्यकर्त्यांच्या मार्फत इष्ट तें कार्य होऊं लागणें असा जर असेल तर त्याची तारीख मी निश्चितपणें ठरवूं शकत नाहीं. कारण आम्ही फार जपून पावलें टाकीत चाललों आहों 'जपून' या अर्थानें कीं चुका टाळणें शक्य आहे तोंवर आमच्या हातून चुका होऊं नयेत अशी आमची इच्छा आहे. कारण करावयाच्या कामाचें स्वरूप विविध आहे. अज्ञान–सागरांत नाव हाकारण्यासारखें हें काम आहे. पुढील महिन्याच्या पहिल्या तारखेस वर्धा येथें संघाच्या मध्यवर्ती समितीची बैठक व्हावयाची आहे तिच्यांत बहुधा कांहीं निश्चित योजना बनेल. दरम्यान आम्हीं एक क्षणहि फुकट घालविलेला नाहीं. बहुमोल माहिती आम्हीं गोळा करीत आलों आहों आणि सगळीकडून मदतीचीं आश्वासनें आम्हांला मिळत आहेत.

प्रः—सर्व प्रांतांतून एकदम संघाच्या शाखा उघडण्याचा आपला इरादा आहे, कीं कांहीं निवडक ठिकाणींच हें काम आपण सुरू करूं इच्छितां ? संघाची मुख्य कचेरी कोठें राहणार ? आपण येथून (दिल्लीहून) जाण्यापूर्वीं येथें संघाची शाखा उघडणार आहां काय ?

गांधीजी—शाखा न उघडतां हिंदुस्थानभर एजन्सीज् (प्रतिनिधी) ठेवण्याचा आमचा इरादा आहे. आमचा आदर्श हा असेल कीं, गांवागणिक एक एक प्रतिनिधि-कार्यकर्ता राहावा, म्हणजे त्यामुळें कामाची पूर्णपणें वांटणी होईल. या कामाच्या यशाचें रहस्य विकेंद्रीकरण करण्यांत आहे. मी येथून जाण्यापूर्वीं येथें एखादी शाखा उघडली जाईल कीं काय तें मला माहीत नाहीं. तथापि या बाबतींत जे कांहीं समाचार व सूचना मला मिळण्याजोग्या आहेत त्या मी गोळा करीत आहें. शेवटचा निर्णय मध्यवर्ति बोर्डच करील. संघाची मुख्य कचेरी वर्धा येथें आहे. तेथें शेठ जमनालालजींनीं आपला बहुमोल बगीचा आणि त्यांतील भव्य बंगला दिला आहे. पुढेंमागें जरूर लागली तर आणखीहि जमीन देण्याचें अभिवचन त्यांनीं दिलें आहे.

प्र०—ज्या मृत वा मृतप्राय उद्योगांचें पुनरुज्जीवन आपण करूं पाहत आहां. त्यांच्या बाबतींत सर्व अवश्यक गोष्टी समजून घेण्याच्या दृष्टीनें संघ केवळ आपल्याच माणसांवर अवलंबून राहणार आहे कीं आज हिंदुस्थानांत ज्या सरकारी किंवा बिनसरकारी संस्था काम करीत आहेत त्यांच्याकडूनहि मदत मागील ?

गां०—संघापुढील अंगीकृत कार्य एवढें विशाल आणि विस्तृत आहे कीं, बाहेरच्या मदतीवांचून त्याला कांहींच करतां येणार नाहीं; याकरितां दुसरे कार्यकर्ते जरी सरकारी असले तरी सुद्धां त्यांचें सहकार्य संघ मागून घेईल.

प्र०—आज हिंदुस्थानावर जगांतील ज्या वेगवेगळ्या आर्थिक व व्यापारि शक्तींची क्रिया-प्रतिक्रिया चालू आहे त्यांच्याशीं टक्कर देण्याचा संभव ज्या उद्योगांच्या बाबतींत नाहीं अशाच उद्योगांचें पुनरुज्जीवन करण्याचा संघाचा प्रयत्न राहणार आहे ? कीं या गोष्टी लक्षांत न घेतां, नष्ट झालेल्या साऱ्याच उद्योग-

धंद्यांचा ( प्राचीन काळीं ते भरभराटींत असतांना त्यांच्यामुळें कोटच्यवधि लोकांना अन्न मिळत होतें. एवढ्याच विचारानें ) पुनरुद्धार संघ करणार आहे ?

गां०—जे धंदे खेडेगांवचें जीवन नैतिक व भौतिक दृष्टींनीं उन्नत करण्याकरितां अवश्यक आहेत अशा सर्व धंद्यांचें पुनरुज्जीवन करण्याचा व त्यांना उत्तेजन देण्याचा प्रयत्न संघ करील. संघ आपलें काम विरोधी म्हटल्या जाणाऱ्या जागतिक शक्तींना भिऊन कांहीं सोडून देणार नाहीं.

प्र०—सर्वसाधारणपणें लोक असें समजतात कीं, हिंदुस्थानांतील सुती कापडाच्या गिरण्यांनीं खादी–उद्योगाकडे सहानुभूतीच्या दृष्टीनें पाहिलेलें नाहीं. संघ जर त्या मृत, मृतप्राय किंवा असंघटित उद्योगांचें पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न करणार असेल तर–अर्थात्च त्या उद्योगांचा अधिक संघटित पायावर उभ्या असलेल्या देशी उद्योगधंद्यांच्या हितसंबंधांशीं संघर्ष उत्पन्न होण्याचा संभव आहे म्हणून–आपल्या संघाला विरोध केला जाईल अशी आपल्याला शंका येत नाहीं काय ?

गां०—साखर, तांदूळ व पीठ यांचा गिरण्यांसारख्या यांत्रिक उद्योगांचा विरोध होईल असा संभव आहे खरा. पण या अडचणींतून आम्हांला वाट काढलीच पाहिजे व अशा अडचणींवर आम्ही विजय मिळवूं शकूं अशी मला पूर्ण आशा आहे.

प्र०—उदाहरणाकरितां म्हणून साखर विरुद्ध गूळ हाच प्रश्न घ्या. साखर हा संरक्षित उद्योग आहे आणि आज तो सुसंघटित पद्धतीनें चालला आहे. कांहीं दिवसांपूर्वीं वर्तमानपत्रांत असें प्रसिद्ध झालें होतें कीं, संघ गुळाचा खप वाढविण्याचा प्रयत्न करील. हें जर खरें असेल त्याला तर, साखर–उद्योगाचा विरोध होईल असें आपल्याला वाटत नाहीं काय ?

गां.—होईल कदाचित्. गुळाचा खप जर वाढला आणि साखरेचा कमी झाला तर हिंदुस्थानाला तें एक वरदानच होईल; कारण डॉक्टरी मतानें असें सिद्ध झालें आहे कीं, पोषणाच्या दृष्टीनें गूळ हा साखरेहून अधिक श्रेयस्कर आहे; आणि कोणत्याहि यांत्रिक उद्योगामुळें लोकांच्या आरोग्याची हानि होतां कामा नये हें पाहणें संघाचें तसेंच लोकांचेंहि कामच आहे.

प्र०—आज मोठ्या प्रमाणावर चालणाऱ्या उद्योगांना विरोध न करतां त्यांना पूरक म्हणून संघानें काम करावें कीं न करावें याविषयीं आपले विचार काय आहेत ?

गां०—याचें उत्तर मीं पूर्वींच दिलें आहे.

प्र०—आपण मृत झालेल्या ग्रामोद्योगांचें पुनरुज्जीवन करण्याचा विचार केला आहे तेथपासून (लोभी भांडवलशाही पद्धतीविरुद्ध) माणुसकीच्या, विवेकाच्या व बुद्धीला वाव देणाऱ्या पद्धतीनें होणाऱ्या हिंदुस्थानच्या औद्योगीकरणापर्यंत जाणाऱ्या मार्गावरचें आपण योजिलेलें हे एक मधलें पाऊल आहे असें मानलें तर ती चूक होईल काय ?

गां०—हिंदुस्थानसारख्या विशाल देशांतील कोट्यवधि लोकांना सक्तीनें चार महिने निरुद्योगीपण चालवावें लागत असतांना मोठ्या प्रमाणावर चालणारे उद्योगधंदे चालवूं देणें आणि तरीहि या कोट्यवधि लोकांचें जीवन बरेंचसें सुखासमाधानांत जाईलसें करणें या देशाला कसें शक्य होईल तें मला तरी समजत नाहीं. खेडेगांवांत चालवितां येणार नाहींत असे उद्योग सोडून मोठ्या प्रमाणावरील इतर केंद्रित उद्योग हिंदुस्थानांत चालविणें म्हणजे कोट्यवधि लोकांची उपासमार करणेंच होय; या उद्योगांमुळें बेकार झालेल्या लोकांना दुसरे प्रतिष्ठित धंदे मिळवून दिले तर मात्र गोष्ट वेगळी.

प्र०—ग्रामोद्योगसंघानें ज्या प्रवृत्ति हातीं घेण्याचें ठरविलें आहे, त्या प्रवृत्तींत सरकार आघाडी मारणार आहे, अशा सरकारच्या पत्रकाविषयीं वृत्तपत्रांत जें प्रसिद्ध झालें आहे तें खरें असेल तर संघाचा सरकारशीं संघर्ष होण्याचा संभव आहे असें आपल्याला वाटतें काय ?

गां०—संघाचा सरकारशीं संघर्ष होण्याचा यत्किंचित्‌हि संभव नाहीं. कारण संघानें आपल्यापुढें ठेवलेलें ध्येय (सरकारच्या कार्याचें मला यथार्थ ज्ञान झालें असेल तर) सरकारच्या कार्याहून मला भिन्न वाटतें; सफाईची बाब मात्र कदाचित् भिन्न असणार नाहीं. सरकारचीं माणसें जेथें सफाईचें काम करीत असतील अशा गांवांत आम्ही तें काम मुळींच हातीं घेतां कामा नये. सरकारतर्फे चाललेलें

काम उखडून टाकण्याचा तर आमचा बिलकुल विचार नाहीं; असला तर आमचा विचार कदाचित् त्याला पूरक होण्याचाच असूं शकेल.

प्र०—संघाच्या मार्फत खेड्यांच्या अधिक निकट संबंधांत येण्याची मोठी संधी आपणांला मिळणार आहे. तिचा उपयोग आपण कायदेभंगाची मोहीम अतिशय प्रचंड प्रमाणावर सुरू करण्याची तयारी करण्याकडे कराल असा अंदेशा सरकारला येत असल्याचें आपल्या लक्षांत आलेंच असेल ?

गां०—माझ्या डोक्यांत ही कल्पना कधींच आली नाहीं. अशा वळणा-वळणाच्या मार्गानें मीं कधीं कामच केलेलें नाहीं. माझ्या दृष्टीपुढें असणाऱ्या उद्देशाचीच त्यामध्यें हार होईल. खेड्यांची भौतिक आणि नैतिक वाढ व्हावी हीच माझी इच्छा आहे आणि ती झाली तर माझी आकांक्षा पूर्णपणें तृप्त होईल. याचप्रमाणें मला जर कधीं सविनय कायदेभंगाची चळवळ उभी करावयाची असेल तर दुसऱ्या कोणत्याहि कामाचा आधार न घेतां मी ती उभी करीन. 'सविनय' या शब्दाचा पुरेपूर अंमल जर व्हावयाचा असेल तर हा सर्व अंदेशा नाहींसा झाला पाहिजे. पण मला पुष्कळ धीर आहे आणि माझी खात्री आहे कीं, जर मीं म्हटलें तें सत्य असेल तर अंदेशा घालविण्याची कांहींहि खटपट माझ्याकडून न होतांच सर्व संशय लुप्त होईल.

प्र०—आणखी एकच प्रश्न. आपण म्हटलें होतें कीं जर सरकारला आपल्या ग्रामोद्योगाच्या योजनेचें मर्म बरोबर समजलें आणि सरकारनें आपणांस मदत दिली तर आपण चमत्कार करून दाखवूं. 'मदत' म्हणजे आपण काय समजतां ? पैशाची मदत काय ?

गां०—मी एवढेंच म्हणतों कीं जर सरकारला माझ्या कार्यपद्धतीचें रहस्य समजलें आणि मी करीत असलेल्या कामांत मला आपलें पूर्ण सहकार्य दिलें तर चमत्कार करून दाखविण्याची हमी मी घेतों. मला पैशाचें सहकार्य नको. सरकारचा मनापासून, नैतिक पाठिंबा मला पाहिजे.*

*'हरिजन' ८–२–१९३५.

## निराशा कसली ? : : १३

हिंदुस्थानांतील बहुधा सर्वांत जुने कार्यकर्ते पुढारी श्री० हरदयाल नाग लिहितात:--

"आपल्या अ. भा. ग्रामोद्योग-संघाचें काम करण्याकरितां आपल्याजवळ पुरेशा कार्यकर्त्यांची सेना नाहीं हें पाहून मन निराश होतें. या बाबतींत मीं कर्तव्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप जर आपण मजवर केला तर तो कबूल करण्यावांचून मला गत्यंतर नाहीं. माझ्या सार्वजनिक जीवनाच्या आरंभापासूनच मी ग्रामोद्योगाच्या प्रश्नाच्या आर्थिक बाजूचें अध्ययन करीत आलों आहें. आपला कार्यक्रम मला उत्साह देत नाहीं याचें कारण हेंच कीं, त्यांत ती आर्थिक बाजू मला आढळत नाहीं. कदाचित् माझी चूक असेल पण माझ्या शंका दूर होणें मला अत्यंत जरुरीचें वाटतें.

"साऱ्या हिंदुस्थानभर सर्व ग्रामोद्योगांचें भक्षण करणारा विदेशी व्यापाराचा लांडगा अजून या देशांत आहेच. आर्थिक जादूगिरीची पुंगी अजूनहि 'स्वस्तांत स्वस्त माल खरेदी करा' असेच सूर काढीत आहे आणि त्यांचा प्रभावहि पडत आहे. क्षणभर समजा कीं हिंदुस्थानची बाजार-पेठ ग्रामोद्योगांच्या वस्तूंनींच भरली आहे; पण तो माल खपविणारे किंवा खरेदी करणारे जर नसतील तर तसा माल तयार करणें म्हणजे तोटाच आहे. हातमाग खादी तयार करूं शकतो, पण गिऱ्हाईक

तयार करूं शकत नाहीं. माझा तर असा दुःखपूर्ण अनुभव आहे कीं कांतणाऱ्यां-पैकीं पुष्कळसे आपल्या स्वतःच्या कांतलेल्या सुताचे कपडे वापरीत नाहींत. पुष्कळसे कांतणारे तर खादी सुद्धां वापरीत नाहींत. सून विकलें तर त्यांना दमडी सुद्धां मिळत नाहीं. कांहींजण तर आपलें सूत विकण्याची किंवा दान म्हणून देण्याची सुद्धां मेहेरबानी करीत नाहींत. असे हौशी लोक किती दिवस कांततील ? आज हिंदुस्थानच्या सर्व खेड्यांतील कारागीर स्वतःच्या उपयोगासाठीं नव्हे तर केवळ विक्रीकारितां हातांनीं वस्तू तयार करूं लागले, तर या वस्तू खरेदी करणारे कोठून आणा-वयाचे ? जोंवर हिंदुस्थान राजकीय गुलामगिरीच्या बेड्यांनीं जखडलेला आहे तोंवर कोणताहि दुसरा देश या वस्तू विकत घेणार नाहीं. हिंदुस्थानमधील ग्राहक जर कधीं कांहीं टाळीत असतील तर ते खेड्यांत तयार झालेला माल टाळतात. गूळ तयार करणारा आपल्या देशाविषयीं तोंडदेखली भक्ति दाखविण्या-करितां फार तर गुळाचा थोडासा स्वाद घेईल, पण आपल्या चहांत किंवा दुधांत मिसळण्यासाठीं त्याचा उपयोग तो करील काय ? खेड्यांतील चांभार आपल्या दुकानांत तयार झालेला ओबडधोबड जोडा परदेशाहून आलेल्या, सुरेख, मजेदार व स्वस्त जोडा बाजूला सारून वापरील काय ? दुर्दैवानें मी असे पुष्कळ लहान लहान धंदे अयशस्वी झालेले पाहिले आहेत कीं ज्यांमध्यें पैसा डोळ्यापुढें ठेवून फक्त विक्रीसाठीं माल तयार होत होता. त्यांचें एकमेव ध्येय पैसा कमाविणें हे होतें, त्यामुळें अपयश येणारच. आपल्या स्वतःच्या कच्च्या मालापासून, अल्प श्रमानें आणि स्वतःच्या उपयोगासाठीं आमच्या खेडेगांवचे कारागीर जो माल काढूं शकतील त्याहून परदेशी माल केव्हांहि अधिक स्वस्त असूं शकणार नाहीं हा धडा या कारागिरांना जोंपर्यंत शिकविला जात नाहीं तोंपर्यंत ते परदेशी माल कधींहि टाकून देणार नाहींत. परदेशी माल खरेदी करण्याकरतां त्यांना पैसा कर्जाऊ काढावा लागतो. पण आपणांला लागणाऱ्या वस्तू जर ते स्वतःच बनवूं लागले तर त्यांना कर्ज काढण्याची जरूरच पडणार नाहीं. खेडेगांवच्या कारागिरांच्या बाबतींत सहकारी तत्त्वावर वस्तूंच्या अदलाबदलीची पद्धति ही आजच्या पैशाच्या पद्धतीपेक्षां किती तरी पटींनीं चांगली ! परदेशी व्यापाराच्या

लांडग्यामुळें हिंदुस्थानच्या खेडेगांवचे लोक इतके नीतिभ्रष्ट झाले आहेत कीं पैशावांचून व्यापाराचें दुसरें स्वरूपच त्यांच्या लक्षांत येत नाहीं.

हरदयालबाबू आतां विश्रांति घेण्याला योग्य झाले आहेत आणि ते जर सार्वजनिक कार्यांतून निवृत्त झाले तर त्याबद्दल कोणीहि तक्रार करणार नाहीं. पण पं. मदनमोहन मालवीय, अब्बास तय्यबजी आणि विजयराघवाचार्य* या त्यांच्या तीन प्रतिस्पर्ध्यांप्रमाणें काम करीत राहण्याचा त्यांचा आग्रह आहे. त्यामुळें वृद्धावस्थेच्या सबबीवर टीकाकारांनी आपली गय करावी अशी अपेक्षा त्यांना धरतां येत नाहीं. त्यांना तें नकोहि आहे हें मला माहीत आहे. त्यांचें शरीर आणि बुद्धि अबाधित राहिलीं आहेत आणि त्यांचा वाटेल तो उपयोग राष्ट्र केव्हांहि करून घेऊं शकतें.

तेव्हां त्यांना मी सांगतों कीं प्रत्यक्ष काम करणाऱ्या मंडळींना निराशेची जाणीव होत नाही. ही भूमि इतकी नवीन आहे कीं तिला तयार करण्याला बरेच दिवस लागतील. कार्यकर्त्यांनीं हातीं घेतलेल्या कामालाच ते पुरे पडत नाहींत अशी स्थिति आहे.

तेव्हां हरदयालबाबूंना जी निराशा वाटते तिचें कारण त्यांनीं जें दिलें आहे तेंच आहे असें मी म्हणतों. कर्तव्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप ते कबूल करतात. आपल्या नित्याच्या स्वभावाप्रमाणें त्यांनीं हें काम जर हातीं घेतलें असतें तर त्यांना तें कठिण वाटलें असतें खरें; पण त्यांना निराशा खचित वाटली नसती. त्यांना त्यांत आर्थिक बाजू दिसत नाहीं याचें कारण ती पाहण्याच्या दृष्टीनें त्यांनीं कामच केलेलें नाहीं.

हरिजन–कार्यांत गुंतून राहिल्यामुळें मला आढळून आलें कीं हिंदुस्थान जर नष्ट व्हावयाला नको असेल तर आम्हांला शिडीच्या अगदीं खालच्या पायरीपासून सुरुवात केली पाहिजे. तीच जर कुजलेली असेल तर माथ्यावर किंवा मधल्या पायऱ्यांवर केलेलें काम शेवटीं अपेशीच ठरणार.

---

*आज हे तिन्ही महापुरुष आणि खुद्द हरदयालबाबूहि दिवंगत झाले आहेत.

देशापुढें ठेवलेल्या या कार्यक्रमांत आर्थिक बाजूहून आणखी कांहीं विशेष आहे. या कार्यक्रमांत रेखाटण्यांत आलेल्या पद्धतीनें राष्ट्राला पोषक अन्नाचा पुरवठा करणें म्हणजे त्याला पैसा आणि आरोग्य दोन्ही देणें आहे. खेड्यांतील लोकांनीं आपला तांदूळ कांडून घेणें आणि तो वरील कवचासह असडीक खाणें म्हणजे दरसाल तीस कोटी रुपयांची बचत करणें व आरोग्य सुधारणें आहे. पण दुःखाची गोष्ट ही कीं नेहमींच्या बाजारांत असडीक, कवच राखलेला तांदूळ अशी वस्तुच मुळीं मिळत नाहीं. त्यामुळें संघाला या बाबतींत राष्ट्राला मार्गदर्शन करण्याकरितां कांहीं काळ दम धरणें भाग आहे. अन्न घ्यावयाचें तें कोणतें घ्यावें आणि तें कोणत्या पद्धतीनें तयार करावें यासंबंधींचें शिक्षण राष्ट्राला देण्याची जरूर आहे.

खेडेगांवांत भपकेदार वस्तू तयार करावयाच्या आणि नाखुष ग्राहकांवर त्या लादावयाच्या असला कोणताहि कार्यक्रम नाहीं. तसल्याच प्रकारच्या विदेशी किंवा स्वदेशी वस्तूंशीं चढाओढहि यांत नाहीं; कारण त्यांत अपेश ठरलेलेंच आहे. खेड्यांतील लोकच आपापल्या वस्तूंचे खरेदीदार होणार. ते जें कांहीं निर्माण करतील त्याचा खप त्यांच्यांतच प्रथम होणार. कारण लोकसंख्येपैकीं शेंकडा नव्वद टक्के संख्या त्यांची आहे. शहरांतील लोकांना पाहिजे असलेल्या आणि ज्या त्यांना चांगल्या प्रकारें तयार करतां येतात अशा वस्तू ते शहराकरितां तयार करतील. लोकांनीं दुधांत आणि चहांत गूळ वापरावा असाच सल्ला अगदीं निःसंशयपणें लोकांना दिला जाईल. चहांत किंवा दुधांत गूळ वापरणें आरोग्याला विघातक आहे ही समजूत भ्रामक आहे असें त्यांना सांगितलें जाईल, आजहि सांगितलें जात आहे. एका गृहस्थानें कळविलें आहे कीं, माझी पत्नी चहांत साखरेऐवजीं गूळ वापरूं लागल्यापासून तिचा बद्धकोष्ठ नाहींसा झाला. मला त्याचें आश्चर्य वाटत नाहीं; कारण गुळांत सौम्य सारकपणा आहे, तो साखरेंत मुळींच नाहीं. मध्यम वर्गांतील लोकांनीं खेड्यांना लुबाडलें आहे. खेडेगांवांना राष्ट्रीय उत्क्रांतीमधील त्यांची इज्जत व महत्त्व ओळखावयास लावून कांहींजण याचें प्रायश्चित्त करीत आहेत.

यानंतर सफाईचा प्रश्न घ्या. याकडे योग्य तें लक्ष पुरविलें तर देशाला

दरसाल दर माणशीं दोन रुपयांचा लाभ होईल. म्हणजेच दर वर्षी सहा कोटी रुपये झाले. शिवाय उत्तम आरोग्य व अधिक कार्यसाधकपणाची भर पडेल ती वेगळीच. हिंदुस्थानांतील सात लाख खेड्यांच्या डळमळत्या परिस्थितींत सर्वांगीण सुधारणा करण्याचा पायाच आजचा हा कार्यक्रम घालीत आहे. हें काम यापूर्वींच सुरू व्हावयाला पाहिजे होतें. हिंदुस्थानची राजकीय परिस्थिति कांहींहि असो, तें सुरू करणेंच अवश्य आहे. या कामांत महारापासून सावकारापर्यंत सर्व वर्गांतील खेडुतांचा समावेश होतो. सर्व पक्षांना मनःपूर्वक एकत्र येतां येईल असें हें काम आहे. त्याचें भवितव्यहि निश्चित आहे. मात्र कार्यकर्त्यांची वाण त्याला पडतां कामा नये.*

नगर वाचनालय
ता.
सातारा.

*'हरिजन', १३–४–१९३५.

## भ्रामक समजुती : : १४

घटनांचें व परिस्थितीचें बारकाईनें निरीक्षण करणारे एक सद्गृहस्थ लिहितातः—

"आपल्या ज्या पत्राचें मी उत्तर देत आहें त्या पत्रांत दर्शविलेल्या दिशेनें काम करण्याला पुष्कळ वाव आहे यांत मला बिलकुल शंका वाटत नाहीं. गृहोद्योगांना स्थान आहे. पण स्पष्ट बोलावयाचें म्हणजे मोठ्या प्रमाणांवरील उद्योगधंद्यांवर ताबा ठेवणाऱ्यांचे आर्थिक हितसंबंध बाजूला ठेवले तरी मला वाटतें कीं अशा प्रकारचे जे मोठमोठे उद्योगधंदे या देशांत कायम झाले आहेत किंवा होण्याजोगे आहेत ते नष्ट करण्याचे प्रयत्न करणें देशहिताचें होणार नाहीं. यंत्रांच्या विरुद्ध सर्वांत मोठा आक्षेप हा घेतला जातो कीं कामाला लागलेल्या माणसांचें काम हीं यंत्रें दिवसेंदिवस काढून घेत चाललीं आहेत. त्यामुळें बेकारी वाढत आहे. मुनाफा वांटण्याची आजची जी पद्धति आहे तिच्यांत बदल करण्याची अवश्यकताहि संभवतः आहे. परंतु फुरसतीचा वेळ, जर सत्कारणीं लावला गेला, तर इतर अनेक गोष्टींपेक्षां तोच अधिक महत्त्वाचा आहे. पुष्कळ लोकांचें काम कायम ठेवण्याकरितां आर्थिक दृष्ट्या परवडणारीं आणि चांगलें व अधिक प्रमाणांत काम करणारीं यंत्रें टाकून देणें माझ्या मतें अवश्य नाहीं. या यंत्रांमुळें पुष्कळ लोकांना फुरसत आणि अन्न मिळालें पाहिजे, आणि या 'पुष्कळां'त ज्यांचा या उद्योगांशीं दूरचा

सुद्धां संबंध नाहीं अशाहि लोकांचा समावेश मी करतों. हिंदुस्थानांत आहे तशी मोठी लोकसंख्या असतांना व ती एकसारखी वाढत असतांना प्रत्येकाला योग्य तितक्या आरामांत ठेवणें कधीं काळीं शक्य होईलसें मला वाटत नाहीं. शिक्षणांत व आरोग्यकारक राहणीकरणींत सुधारणा केली कीं आयुर्मान वाढेल आणि मरणाचें प्रमाण घटेल. लोकसंख्येच्या दृष्टीनें पाहिलें तर यामुळें परिस्थिति अधिकच बिघडेल. म्हणून पहिली गोष्ट जर कोणती करणें अवश्यक असेल तर ती लोकसंख्या नियंत्रित करण्याची उपाययोजना करणें ही होय आणि त्याला संततिनियमनाखेरीज गत्यंतर नाहीं असें जर मीं म्हटलें तर आपण मला क्षमा करावी. आपण त्याच्या विरुद्ध आहांत हें मला माहीत आहे. पण, सफाई, अन्नमूल्यें, गृहोद्योग इ० मध्यें सुधारणा करून तद्द्वारा आर्थिक पुनर्घटनेचा प्रश्न सोडविण्याकडे आपण आतां आपलें लक्ष पूर्णपणें देत असल्यामुळें याहि गोष्टीकडे लक्ष पुरविणें अवश्य आहे कीं नाहीं याचा विचार करावा अशी माझी आपणांला विनंति आहे.''

पत्रलेखक प्रामाणिकपणें विचार करणारा एक गृहस्थ आहे. तरी देखील ज्या दोन संघांना उद्देशून त्यानें लिहिलें त्यांच्या कार्याचें संबंध उद्दिष्टच त्याच्या लक्षांत आलेलें नाहीं असें मला दिसतें. त्यांचें उद्दिष्ट मोठे उद्योगधंदे नष्ट करणें किंवा त्यांच्या जागीं दुसरे धंदे आणणें हें मुळींच नाहीं, तर मृत किंवा मृतप्राय उद्योगाचें पुनरुज्जीवन करून त्यांच्या द्वारा कोट्यवधि लोकांना काम देणें हें आहे; या लोकांना आज पूर्ण किंवा अर्ध्या निरुद्योगी अवस्थेंत सक्तीनें राहावें लागत असल्यामुळें ते अर्धपोटी असतात. हा कार्यक्रम विध्वंसक नसून विधायक आहे. कोट्यवधि बेकारांना कांहीं हे मोठमोठे उद्योगधंदे काम देऊं शकत नाहींत व त्यांनी तशी आशाहि बाळगलेली नाहीं. त्यांचें मुख्य ध्येय आपल्या मूठभर मालकांना अर्थप्राप्ति करून देणें हें असतें, कोट्यवधि बेकारांना कामाला लावणें असें मुख्यत्वेंकरून कधींच नसतें. खादी व ग्रामोद्योग यांच्या संचालकांनीं लगतच्या भविष्यकाळांत मोठ्या उद्योगधंद्यांना धक्का लावण्याची आशाच धरलेली नाहीं. खेडुतांच्या अंधार-कोठड्यांत—ज्यांना चुकून झोंपड्या म्हणतात त्यांत—प्रकाशाचा

एकादा कवडसा आणावा एवढीच त्यांची आशा असूं शकते. ‘ फुरसतीचा वेळ जर सत्कारणीं लागला तर इतर अनेक गोष्टींपेक्षां तोच अधिक महत्वाचा आहे’ असें जेव्हां पत्रलेखक म्हणतो तेव्हां त्याची वादाची भूमिकाच उरत नाहीं. ज्या प्रवृत्ती तो मान्य करीत नाहीं त्या मुळीं त्याच्या मनांत असलेलें उद्दिष्टच पूर्ण करण्याकरितां योजिलेल्या आहेत. कोटयवधि निरुद्योगी माणसांचा रिकामा वेळ सत्कारणीं लावण्याचाच त्यांचा उद्देश आहे.

यामध्यें, यंत्रांचा भलत्या कामीं उपयोग करणें किंवा दुरुपयोग करणें म्हणजे कोटयवधि लोकांचा घात होईल अशा प्रकारें त्यांचा उपयोग करणें याच्याशीं लढाई नाहीं. हिंदुस्थानच्या सात लाख खेडयांत पसरलेल्या कोटय-वधि जिवंत यंत्रांच्या विरुद्ध हीं जड यंत्रें उभीं केली जातां कामा नयेत. यंत्रांचा सदुपयोग म्हणजे मानवी श्रमाला त्यांची मदत होणें व मानवी श्रम सुकर करणें हा होय. आज यंत्रांचा जो उपयोग केला जातो तो असा कीं, त्यामुळें लक्षावधि स्त्री–पुरुषांकडे संपूर्ण दुर्लक्ष होऊन संपात्ति मूठभर लोकांच्या हातीं सांठत जाण्याची प्रवृत्ति वाढत जात आहे आणि यंत्रांमुळें लक्षावधि लोकांच्या तोंडचा घांस काढून घेतला जात आहे. अत्यंत नाजूक अशा मानवी हत्यारांशीं संबंध न येऊं देतां जड हत्यारांचा वापर करून मोठमोठीं घबाडें सांठविण्याचा जो उन्माद चढला आहे त्यानें ओढवणाऱ्या अरिष्टांचें शमन करण्याच्या विचारानेंच चर्खासंघ व ग्रामोद्योग–संघ यांच्या रूपानें सुरू झालेली चळवळ कल्पिलेली आहे.

प्रत्येकाला योग्य तितक्या आरामांत ठेवणें कधींहि शक्य होणार नाहीं अशी पत्रलेखकाला भीति वाटत आहे. खेडयांत काम करणाऱ्यांना तशी भीति वाटत नाहीं. उलट, खेडयांतील लोकांशीं निकटचा संबंध आल्यामुळें, खेडयांचें जवळून ज्ञान झाल्यामुळें, खेडयांतील लोकांचें मन जर फक्त परंपरागत आळस झाडून टाकण्याकडे वळवितां आलें तर सर्वजण योग्य तितक्या आरामांत राहूं शकतील, फारशी उलथापालथ करण्याची सुद्धां जरूर पडणार नाहीं, अशा आशेनें या कार्यकर्त्यांचें मन भरून जातें. कांहीं असह्य गोष्टी हलक्या कराव्या लागतील यांत शंका नाहीं. पण ज्यांना भांडवलदार म्हणतात अशांच्याकडून जर थोडेंसें सहकार्य मिळालें तर क्रिया जवळ जवळ समजूनहि येणार नाहीं.

आजच्या लोकसंख्येला योग्य तितका आराम मिळवून देण्यासंबंधीं पत्र-लेखकाला जी भीति वाटते तींतूनच साहाजिकपणें लोकसंख्या वाढत जाण्याचें भय उत्पन्न होतें. मग संततिनियमनाचा अवलंब करणें हेंच तर्कयुक्त वाटतें. संततिनियमन हा मला एक अंध कूप वाटतो. संततिनियमन करणें म्हणजे अज्ञात अशा शक्तींशीं अविचारानें वागणें आहे. कृत्रिम साधनांनीं संततिनियमन करणें हें कांहीं परिस्थितींत योग्य आहे असें धरून चाललें तरी कोट्यवधि लोकांना तें लागू करणें हें अत्यंत अव्यवहार्य वाटतें. त्यांनीं कृत्रिम साधनांनीं नियमन करण्याला उद्युक्त करण्यापेक्षां आत्मसंयमन करण्याला उद्युक्त करणें अधिक सोपें आहे असें मला वाटतें. आमचा हा छोटासा भूगोल म्हणजे कांहीं कालचें खेळणें नव्हे. युगानुयुगें गेलीं, असंख्य जनसंख्या वाढली, तरी फाजील लोकसंख्येच्या भारानें तो कधीं दबला नाहीं. संततिनियमनाचीं साधनें वापरून जनन--प्रमाण जर कमी केलें नाहीं तर उपासमार होऊन हें जग नष्ट होण्याचा धोका आहे हें सत्य कांहीं लोकांच्या डोक्यांत एकाएकीं कसें बरें उद्भवलें? पत्रलेखक एका भ्रमांत सांपडला, त्यांतून तो दुसऱ्या भ्रमांत शिरला आणि त्यामुळें शेवटीं तो आतापर्यंत अज्ञात असलेल्या प्रमाणावरील संततिनियमनाच्या कृत्रिम साधनांच्या दलदलींत जाऊन फसला आहे, अशी मला भीति वाटते.*

---

* 'हरिजन' १४-९-१९३५.

## एक घातुक समजूत

: : १५

एका गृहस्थानें 'हरिजन'मध्यें चर्चा करण्याकरितां कांहीं प्रश्न मला विचारले होते. त्यांतील एक कित्येक दिवसांपासून माझ्या फायलींत पडून आहे तो हा.

"राजकीय सत्ता हातीं आल्याशिवाय कोणतीहि मोठी सुधारणा पूर्णपणें अंमलांत येणें शक्य नाहीं असें आपल्याला वाटत नाहीं काय ? आपल्याला आजची आर्थिक रचनासुद्धां सुधारावी लागेल. राजकीय पुनर्घटना झाल्यावांचून कोणतीहि पुनर्घटना होणें शक्य नाहीं आणि सडलेला व असडीक तांदूळ, चौरस आहार वगैरे गोष्टी केवळ मनोराज्यच आहेत."

पुष्कळ गोष्टी करणें आपल्या हातुन झालें नाहीं म्हणजे सबब म्हणून हा युक्तिवाद पुढें मांडलेला पुष्कळ वेळां माझ्या कानांवर आला आहे. राजकीय सत्ता हातीं आली नाहीं तर न होण्याजोग्या कांहीं गोष्टी आहेत, नाहीं असें नाहीं. तथापि अशा पुष्कळच गोष्टी आहेत कीं, ज्या होण्यासाठीं राजकीय सत्तेवर अवलंबून राहण्याचें कांहीं सुद्धां कारण नाहीं. म्हणूनच तर थोरोसारख्या विचारवंतानें म्हटलें आहे कीं, 'तेंच सरकार सर्वोत्तम, जें कमींत कमी सत्ता वापरतें.' याचा अर्थ असा कीं, जेव्हां लोकांच्या हातीं सत्ता येते तेव्हां लोकांच्या स्वतंत्रतेला कमींत कमी धक्का पोंचतो. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें तर जें राष्ट्र आपला कारभार राज्यसंस्थेचा फारसा हस्तक्षेप न होऊं देतां सुरळीतपणें

व सफलतापूर्वक चालवितें तेंच खरें लोकसत्तावादी राष्ट्र होय. जेथें ही स्थिति नसते तेथील सरकार नांवालाच लोकशाहीचें समजावें.

विचारस्वातंत्र्याला अलबत कांहींहि मर्यादा अथवा नियंत्रण नाहीं. पुष्कळ सुधारक आजकाल नवीन विचारप्रणालीवर फार मोठा भर देत आहेत हें विसरून चालणार नाहीं. आपल्या मतांमध्यें सुधारणा करावयाला आपणांपैकीं किती थोडेजण तयार आहेत ! आधुनिक शास्त्रज्ञ विचाराचें सामर्थ्य मान्य करतात आणि म्हणूनच 'जसा विचार असतो तसा मनुष्य बनतो' असें म्हटलें आहे. जो नित्य खुनाचाच विचार करतो तो खुनीच होईल आणि जो व्यभिचाराचें चिंतन करतो तो व्यभिचारीच होईल. उलट, जो नित्य सत्य—अहिंसेचें चिंतन करतो तो सत्यसाधक व अहिंसक बनेल आणि ज्याचे विचार ईश्वरावरच जडलेले आहेत तो ईश्वरमय होईल. विचाराच्या या राज्यांत राजकीय सत्तेला मुळींच कांहीं कर्तव्य नाहीं. अशाचप्रमाणें राजकीय सत्ता असण्याला अथवा नसण्याला आमच्या पुष्कळशा प्रवृत्तींमध्यें कांहीं सुद्धां महत्त्व नाहीं हें उघडच आहे. पत्रलेखकाला मी एक नम्र सूचना करूं इच्छितों. आपल्या रोजच्या सर्व प्रवृत्तींचें एक तपशीलवार टिपण त्यानें तयार करावें, म्हणजे त्याला खास असें आढळून येईल कीं, त्यांपैकीं पुष्कळशा राजकीय सत्तेशीं कांहीं संबंध नसतांनाच चालू आहेत. मनुष्यानें आपली परतंत्रता स्वतःच निर्मिली आहे. इच्छा होतांच तो स्वतंत्र होऊं शकतो.

पत्रलेखकानें आपणच 'मोठ्या' सुधारणेचा बागुलबुवा उत्पन्न केला आहे आणि मग तो त्यापासून दूर पळून जात आहे. जो लहानलहान सुधारणा करावयाला तयार होत नाहीं तो मोठ्या सुधारणा करावयाला कधींच तयार होणार नाहीं. जो आपल्या शक्तीचा जास्तींत जास्त चांगला उपयोग करतो त्याला त्यांचा विकास करणें साधत जाईल आणि मग कळून येईल कीं, आपण जी सुधारणा 'मोठी' समजलों ती तर लहानशीच होती. अशा पद्धतीनें जो आपल्या आयुष्याला वळण लावील तोच खरेंखुरें स्वाभाविक जीवन चालवील. मात्र त्याचा अनुभव घेण्याकरितां राजकीय साध्य डोक्यांतून काढून टाकलें पाहिजे. पदोपदीं आणि प्रत्येक बाबतींत राजकीय साध्याच्या दृष्टीनेंच

विचार करणें म्हणजे निष्कारण धूळ उडविणें आहे. जें अपरिहार्य आहे त्यासाठीं माथेफोड करण्यांत काय अर्थ आहे ? मरण येण्यापूर्वींच कां मरावें ?

म्हणूनच जीवनसत्त्वें, पालेभाज्या आणि असडीक तांदूळ यांसंबंधीं चर्चा करण्यांत मी खूप मन घालूं शकतों. यामुळेंच संडास साफ करण्याची अत्युत्तम पद्धति कोणती, रोज सकाळीं धरणीमातेला गलिच्छ करण्याच्या घाणेरड्या पापापासून आपल्या लोकांना वांचविण्याचा उत्तम मार्ग कोणता, हें शोधून काढण्याचें काम मला हृदयंगम वाटत असतें. या अगत्याच्या प्रश्नांचा विचार करून त्यांवर उपाय शोधून काढणें याला कांहींच राजकीय महत्त्व नाहीं आणि सरकारच्या आर्थिक धोरणाची तपासणी करणें हें मात्र अगदीं सोळा आणे राजकीय काम आहे हें कसें हेंच मला समजत नाहीं. मी करीत असलेलें व लोकांना करावयाला सांगत असलेलें काम असें आहे कीं, तें लक्षावधि लोकांना करतां येईल पण आमच्या राज्यकर्त्यांच्या धोरणाची तपासणी करण्याचें काम मात्र त्यांच्या शक्तीच्या पलीकडचें आहे, याविषयीं माझ्या मनांत बिलकुल शंका नाहीं. हें फारच थोड्या लोकांचें काम आहे यांत वाद नाहीं. मग जे त्या कामाला लायक आहेत त्यांनाच तें शक्य तितकें उत्कृष्ट करूं द्या ना ? पण जोंपर्यंत हे पुढारी मोठे बदल घडवून आणूं शकत नाहींत, तोंपर्यंत माझ्यासारख्या लाखों लोकांनीं ईश्वरानें ज्या कांहीं देणग्या आम्हांला दिल्या आहेत त्यांचा जास्तींत जास्त चांगला उपयोग कां करून घेऊं नये ? आमचीं शरीरें सेवेला अधिक लायक अशीं साधनें कां बनवूं नये ? आम्हीं आमच्या दारापुढचा व आजू-बाजूचा केरकचरा काढून स्वच्छता कां करूं नये ? आम्हीं सदोदित आजारांच्या पकडींत कां राहावें ? स्वतःला किंवा दुसऱ्या कोणालाहि मदत करण्याचें सामर्थ्य आमच्यांत कां असूं नये ?

पत्रलेखकानें जो प्रश्न केला आहे त्यांत त्याचा आळस, निराशा आणि आमच्यापैकीं पुष्कळांच्या मनावर जें औदासीन्याचें पटल आलें आहे तें दिसून येत आहे. स्वातंत्र्याविषयींची उत्कटता बाळगण्यांत मी कोणालाहि

हार जाणार नाहीं हें मी छातीठोकपणें सांगूं शकतों. मी कसल्याहि थकव्याच्या किंवा औदासीन्याच्या आहारीं गेलेलों नाहीं. पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें माझी खात्री झाली आहे कीं, माझी शक्ति व लक्ष वेधून घेणाऱ्या प्रवृत्तीच देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीला उपयोगीं पडणार आहेत, व त्यांतच अहिंसक स्वातंत्र्याचें रहस्य आहे. म्हणूनच प्रत्येक लहानथोर स्त्री–पुरुषाला या महान् यज्ञांत आपला हिस्सा अर्पण करण्याला मी आवाहन करीत आहें.*

* 'हरिजन', ११।१।१९३६.

## परत ग्रामोद्योगांकडे : : १६

नाना क्रियांचें पराकाष्ठेचें यंत्रीकरण केल्यामुळें प्रत्येक अमेरिकन माणसाजवळ छत्तीस गुलामांची बरोबरी करणारीं साधनें असतात असें म्हणतात. अमेरिकेचा कित्ता जर आपण घेतला, आणि छत्तिसांऐवजीं प्रत्येक हिंदी माणसाला तीसच गुलाम बाळगूं दिले तर आमच्या एकतीस कोटी मानवप्राण्यांपैकीं तीस कोटींनीं हाराकिरीच केली पाहिजे. कांहीं उत्साही देशभक्तांना याचें कांहींच वाटणार नाहीं इतकेंच नव्हे तर ते या गोष्टीचें उलट स्वागतच करतील हें मला माहीत आहे. ते म्हणतील, ज्यांना धड चालतांहि येत नाहीं असे तीस कोटी निःशस्त्र जीवजंतू असण्यापेक्षां सुखी, समाधानी, भरभराटींत असलेले एकच कोटि कां होईना हिंदी लोक असलेले बरे. या तत्त्वज्ञानाला माझ्यापाशीं उत्तर नाहीं; कारण हरिजन–वृत्तीनें मी भारलेला असल्यामुळें मला फक्त खेडेगांवच्या लक्षावधि लोकांच्याच शब्दांत विचार करतां येतो, त्यांतील गरिबांतल्या गरिबांच्या सुखावरच माझें सुख अवलंबून आहे मला असें वाटतें आणि त्यांना जगतां येत असेल तरच मी जगूं इच्छितों. इकडून तिकडे माझ्याबरोबर नेतां येत असलेल्या आणि मला सहज बनवितां येत असलेल्या चरख्याच्या लहानशा चातीपलीकडे माझें साधेंभोळें मन जाऊंच शकत नाहीं. यासंबंधीं एका सद्गृहस्थांनीं पुढील परिच्छेद माझ्याकडे पाठविला आहे. प्रसिद्धीकरितां तेवढा पुरें आहे.

"कांहीं उद्योगधंद्यांमधील बेकारी नष्ट करण्याकरितां नाझींनीं हुकूम

काढून माणसांना बेकार करणारीं यंत्रें थांबविली. या मनाईवर लिहितांना 'मँचेस्टर गार्डिअन' पत्र म्हणतें—'बेकारीचें अरिष्ट वाढविण्याच्या, यंत्रांच्या परिणामाविषयीं आतांपर्यंत पुष्कळच चर्चा झाली आहे; पण तींतून निघणाऱ्या अनुमानाला अनुसरून यंत्रें थांबविण्याचें काम नाझींनींच केलें. जर्मनीतील उद्योगधंद्यांमध्यें निष्कारण वांया जाणारे श्रम अथवा खर्च थांबविण्याच्या बाबतींत सुधारणा केल्यामुळें जो आश्चर्यजनक विजय मिळाला त्याचा उदोउदो जगानें करावा असें थोड्याच दिवसांपूर्वीं म्हटलें जात होतें. आज तेथील सरकार एक तर यंत्रांच्या वापराला मनाई करून किंवा कारखानदारांना कामाचे तास कमी करून व जास्त माणसें कामावर घ्यावयाला लावून यंत्रांशीं झगडा करण्याला कटिबद्ध झालें आहे. गिरणींतील कताईच्या संचाच्या बदलीं हातचक्र आणि यांत्रिक मागाच्या बदलीं हातमाग उपयोगांत आणण्याच्या श्री० गांधींच्या प्रयत्नाच्या अगदीं बरोबरीनें जर्मनींतील सिगारच्या व कांचेच्या कारखान्यांचे प्रयत्न चालू आहेत."

आपल्या या लेखाचा समारोप करतांना 'गार्डिअन'नें म्हटलें आहे कीं, 'जर्मनीचें नीतिशास्त्र जर मध्ययुगीन झालें तर त्याचें अर्थशास्त्र सुद्धां मध्ययुगीन कां न व्हावें ?' या टीकेला उत्तर देतांना एक लेखक 'गार्डिअन'मध्यें लिहितोः—

'हिटलर, गांधी आणि अन्य लोक हे आपापल्या पण भिन्न भिन्न मार्गांनीं उत्पत्तीचा वेग इतक्यापर्यंत कमी करण्याच्या प्रयत्नांत आहेत कीं ज्यायोगें उत्पादित सर्व माल खपून जाईल. त्यासाठीं त मध्ययुगीन पद्धति उपयोगांत आणीत असतील कदाचित्, पण हस्त-व्यवसाय हे कांहीं परागतिक नव्हेत किंवा जंगलीहि नव्हेत. सर्व प्रगतिमान् देशांच्या प्राथमिक व दुय्यम शाळांतून ते शिकविले जातात... वाजवी मुदतींत जर बेकारी नष्ट केली नाहीं—मग त्यासाठीं अगदीं नवीन व परंपरागत नसलेलीं साधनें वापरलीं तरी हरकत नाहीं—तर यंत्रयुग हें क्रांत्या व लढाया यांमध्यें अदृश्य होईल आणि त्या क्रांत्यांमध्यें व लढायांमध्यें आमचा सर्वांचा नाश होईल. जोंपर्यंत यंत्र हें जनसमुदायाचें त्याचप्रमाणें उच्चवर्गीयांचें सुख व उत्कर्ष वाढवितें तोंपर्यंत तें हितकारकच आहे. पण

आज पश्चिमेकडील मोठ्या प्रमाणावर कारखानदारी असलेल्या देशांत घडत आहे त्याप्रमाणें लक्षावधि लोक जेव्हां यंत्रामुळें बेकार बनतात व उपाशीं मरूं लागतात तेव्हां यंत्र हें शापरूप बनतें. माणसाकरितां यंत्र आहे, यंत्राकरितां माणूस नाहीं; आणि म्हणून तें लोकांच्या भल्याकरितांच उपयोगी पडलें पाहिजे, तें त्यांच्या डोक्यांवर बसतां कामा नये.'

जर्मनीमध्यें ग्रामोद्योगांचें पुनरुज्जीवन तरवारीच्या बळावर केलें जात आहे ही गोष्ट या ठिकाणीं अप्रस्तुत आहे. प्रस्तुत हें आहे कीं, सर्वोच्च असें यांत्रिक कौशल्य ज्या देशानें दाखविलें आणि जो देश कारखानदारीच्या बाबतींत सर्वांत पुढारलेल्या देशांपैकीं एक आहे तो देखील आपला बेकारीचा भयानक प्रश्न सोडविण्याकरितां परत ग्रामोद्योगांकडेच धांव घेत आहे.*

* 'हरिजन', २७–१०–१९३३.

## एक महान् प्रयोग : : १७

अहमदाबादच्या 'मजूर–महाजन' (मजूर–संघा)नें नुकताच एक महान् प्रयोग सुरू केला आहे. तो इतर सर्व मजूर–संघटनांनाहि उद्बोधक व महत्त्वाचा वाटल्यावांचून राहणार नाहीं. त्या प्रयोगाचें मर्म हें आहे कीं, मिलमध्यें काम करणाऱ्या मजुरांना आपल्या मुख्य धंद्याव्यतिरिक्त एकादा जोडधंदा शिकवावयाचा हेतु हा कीं, टाळेबंदी झाली, संप झाला किंवा काम हातांतून गेलें किंवा अशीच आणखी कांहीं आपत्ति आली तर उपाशी मरण्यापेक्षां उपजीविकेचें कांहीं ना कांहीं साधन त्यांच्या हाताशीं असावें. कामगारांचें जीवन म्हणजे नित्य उलथा-पालथीचें जीवन. काटकसर आणि पैशाचा विवेकपूर्वक विनियोग यांचा उपयोग होतो, नाहीं असें नाहीं; आणि त्याकडे दुर्लक्ष करणें दोषास्पदहि ठरेल. परंतु आमच्या मिल–मजुरांची प्रचंड संख्या जेमतेम निर्वाह करून कशीबशी जगते हें लक्षांत घेतां अशी झालेली बचत फार काळ उपयोगीं पडणार नाहीं. शिवाय काम करणाऱ्या माणसानें संपाच्या किंवा बेकारीच्या मुदतींत घरांत हात जोडून बसून राहणें केव्हांहि योग्य नाहीं. त्याच्या धैर्याला व स्वाभिमानाला अधिक सक्तीच्या निरुद्योगाहून हानिकारक दुसरें कांहीं नाहीं. आणीबाणीच्या वेळीं चटदिशीं हाताशीं असणारा दुसरा एकादा जोडधंदा निर्वाहाकरितां कामकऱ्यापाशीं नसेल तर कामगारवर्गाला कधींहि सुरक्षितता वाटणार नाहीं किंवा त्याच्यांत आत्म-विश्वासाची व सामर्थ्याची जाणीव कधींच उत्पन्न होणार नाहीं.

गिरणी–कामगारांपाशीं एखादा जोडधंदा असावा ही कल्पना प्रथम मला अहमदाबादच्या कामगारांनीं १९१८ सालीं जो तेवीस दिवसांचा संस्मरणीय संप चालविला होता त्या दिवसांत सुचली. त्या वेळीं माझ्या लक्षांत आलें कीं, संप जर यशस्वी व्हावयाचा असेल तर गिरणी कामगारांजवळ असा एखादा धंदा असावा कीं, जो सर्वस्वीं किंवा अंशतः तरी त्यांचा निर्वाह चालवील. म्हणजे त्यांना विसंबावें लागूं नये. संप चालू असतांना पुष्कळसे लोक थोबड कामावर लावलेले होते. गिरणी–कामगारांना एखादा जोडधंदा शिकवावा ही कल्पना मीं त्याच वेळीं सुचविली. पण पुढल्या संपापर्यंत ही सूचना तशीच पडून राहिली. थोडासा प्रारंभ त्या वेळीं झाला होता; परंतु जोडधंदा शिकविण्याकरितां एकदम एकाएकीं एखादी परिणामकारक संघटना उभी करणें कठिण होतें. दुसरा संप संपला आणि त्याबरोबरच योग्य असे जोडधंदे शोधून ते शिकविण्याचे प्रयत्नहि संपले.

या दिशेनें आतां मजूर–महाजनानें संघटित व पद्धतशीर प्रयत्न सुरू केले आहेत. फावल्या वेळांत घरबसल्या चालवितां येतील आणि बेकारीच्या काळांत बरीचशी मदत देतील अशा निवडक धंद्यांचें शिक्षण गिरणी–कामगारांना देण्यांत येतें. असे धंदे म्हणजे कापूस वेचणें व स्वच्छ करणें, तो पिंजणें व त्याचें सूत काढणें, विणणें, शिवणें, साबण व कागद तयार करणें, खिळे जुळविणें इ० होत.

भांडवलवाल्याला जसा पैसा तसें कामगारवर्गाला निरनिराळ्या धंद्यांचें कामचलाऊ ज्ञान होय, असें माझें मत आहे. मजुराचें हस्तकौशल्य हें त्याचें भांडवल आहे. भांडवलवाल्याला मजुराच्या सहकार्याशिवाय जसें आपल्या भांडवलाचें चीज करतां येत नाहीं, तसेंच भांडवलवाल्याच्या सहकार्याशिवाय कामगारालाहि आपल्या श्रमाचें चीज करतां येत नाहीं. आणि कामगार व भांडवलवाला या दोघांच्यांतहि सम प्रमाणांत बुद्धीचा ईश्वरदत्त गुण वाढला असेल व आपल्या हातून दुसऱ्याला योग्य ती न्यायाची वागणूकच मिळेल अशी शक्ति आपणांमध्यें असल्याचा विश्वास जर दोघांमध्येंहि आला असेल, तर ते परस्परांना एकाच धंद्यांतील बरोबरीचे भागीदार असल्याप्रमाणें मान देतील व एकमेकांना चाहतील. त्यांनीं परस्परांना परस्परांचे जन्मजात हाडवैरी समजण्याचें कांहींच

पाने १७० 26062 ता. १२e

कारण नाहीं. पण अडचण ही आहे कीं, भांडवलदार–वर्ग आज संघटित झालेला आहे आणि स्वतःला सुरक्षित ठेवून प्रतिकार करतां येण्यासारखी त्याची परिस्थिति असलेली दिसते, तर कामगार–वर्गाची तशी स्थिति नाहीं. कामगाराची बुद्धि त्याला कराव्या लागणाऱ्या भावनाशून्य यांत्रिक कामामुळें दडपली जाते, त्या कामानें त्याचें मन मोठें होण्याला कांहीं वाव किंवा संधीच राहत नाहीं. आपल्या स्थानाची शक्ति व संपूर्ण प्रतिष्ठा ओळखण्याला त्याला त्यामुळें अडथळा झाला आहे. आपल्या श्रमाचा मोबदला काय असावा हें त्यानें स्वत: ठरवून त्याची मागणा करण्याऐवजीं तो भांडवलवाल्यांनीं ठरवावयाचा असतो अशी समजूत करून द्यावयाला त्याला शिकविलें गेलें आहे. योग्य पद्धतींनीं त्याला एकदां संघटित होऊं द्या, त्याला वेगवेगळे धंदे शिकूं द्या, कीं मग तो आपली मान ताठ ठेवून फिरावयाला समर्थ होईल आणि निर्वाहाचें साधन नाहींसें होईल अशी भीति त्याला कधींच वाटणार नाहीं

आपण मालकांपुढें असहाय आहों असें कामगारानें समजणें हा एक फारच भयानक भ्रम आहे. अहमदाबादच्या मजूर–महाजनचा प्रयत्न कांहीं निश्चित कार्य करून दाखवून हा भ्रम काढून टाकण्याचा आहे. म्हणून ज्यांचा ज्यांचा या प्रश्नाशीं संबंध आहे त्यांनीं त्यांनीं या प्रयोगाचें स्वागतच केलें पाहिजे. मजूर–महाजननें जें हें सत्कार्य हातीं घेतलें आहे तें दृढनिश्चयपूर्वक व अढळ चिकाटीनें चालू ठेवण्यावरच यश अवलंबून आहे. कामगारांमध्यें आपल्या या कामाबद्दल बुद्धियुक्त गोडी निर्माण करणारे योग्य प्रकारचे शिक्षक मजूर–महाजनला मिळाले पाहिजेत. केवळ यांत्रिक पद्धतीनें केला जाणारा हस्तव्यवसायहि केवळ यांत्रिक पद्धतीनें केल्या जाणाऱ्या कोणत्याहि अन्य उद्योगाप्रमाणेंच मनाला मारून टाकणारा असूं शकतो. अबुद्धिपूर्वक झालेलें कार्य हें जीव निघून गेलेल्या प्रेताप्रमाणें होय.*

*'हरिजन', ३–७–१९३७.

## अपूर्व प्रदर्शन : : १८

[ मुंबई येथें भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनांत पास झालेल्या ठरावानुसार लखनौ–कॉंग्रेस स्वागत–समितीनें अ. भा. चर्खासंघ व अ. भा. ग्रामोद्योग–संघ यांचे मंत्री अनुक्रमें श्री० शंकरलाल बँकर व श्री० जे. सी. कुमारप्पा यांच्या सहाय्यानें एक प्रदर्शन उघडलें. तें ता. २८ मार्च रोजीं संध्याकाळीं गांधीजींच्या हस्तें खुलें करण्यांत आल्यामुळें मूळचेच अद्वितीय अशा प्रकारचें हें प्रदर्शन अपूर्वच झालें. त्याचें तपशीलवार वर्णन मी पुढें केव्हां तरी करीन. आज फक्त गांधीजींच्या भाषणाचा सारांश मी येथें देत आहें.— म. दे. ]

हें खादी आणि ग्रामोद्योग यांचें प्रदर्शन उघडण्याकरितां मला येथें येतां आलें याचा मला आनंद होतो. त्याबद्दल मी धन्यवाद देतों. उद्घाटनाच्या वेळींच येथें येण्याला मी फार उत्सुक होतों. डॉ० मुरारीलाल आणि श्री० शंकरलाल बँकर यांनीं हें प्रदर्शन जमवून आणविण्यांत मनापासून परिश्रम केले आहेत हें मला माहीत आहे. तरी त्या सर्वांमागें कल्पना माझीच होती. अशा प्रकारच्या खऱ्या ग्रामीण प्रदर्शनाच्या बाबतींत मी अनेक वर्षांपासून आपल्या मनांत जी कल्पना बाळगीत आलों होतों तीच या प्रदर्शनांत प्रत्यक्षांत आलेली मला दिसत आहे. १९२१ सालीं कॉंग्रेसच्या नव्या घटनेप्रमाणें पहिल्या वर्षी जेव्हां आपण अहमदाबादेंत जमलों होतों, त्या वेळीं आमची मनोवृत्ति ग्रामीण बनविण्याच्या दिशेनें आम्हीं एक पाऊल टाकलें; त्या वेळीं कॉंग्रेसच्या नियमानें

तेथें भरविण्यांत आलेलें प्रदर्शन म्हणजे एका प्रक्रियेची सुरुवातच होती; आज पंधरा वर्षांनंतर ती पक्व दशेंत आलेली आपणांला दिसत आहे. हिंदुस्थान हें चार शहरांत नसून सात लाख खेड्यांत वसलें आहे. माझें हें मत मीं अनेक वेळां सांगितलें आहे. पण आपण जे येथें जमलों आहों ते कांहीं खेडेगांवचे राहणारे नाहीं. आपण शहरवासी आहों. आम्हां शहरवासीयांची अशी समजूत आहे कीं, हिंदुस्थान शहरांतच आढळेल आणि खेडीं हीं आमच्या गरजा भागविण्याकरितांच उत्पन्न झालेलीं आहेत. खेड्यांतील गरीब बापड्या लोकांना पोटभर अन्न, अंगभर वस्त्र आणि निवाऱ्यासाठीं एखाद्या छपराचा आसरा आहे कीं नाहीं याची आम्ही कधींहि चौकशी केलेली नाहीं. गेल्या वीस वर्षांत सर्व हिंदुस्थानभर जितका मी हिंडलों आहें तितका दुसरा कोणीहि काँग्रेस-कार्यकर्ता हिंडला असेल असें मला वाटत नाहीं. केवळ हिंडून आलों याची फुशारकी मारण्याचें कांहींच कारण नाहीं. तथापि या माझ्या फिरण्यामुळें कोणत्याहि काँग्रेसकार्यकर्त्यापेक्षां किंवा पुढाऱ्यापेक्षां हिंदुस्थानच्या खेड्यांना मीच अधिक चांगल्या प्रकारें ओळखतों असा माझा नम्र दावा आहे. शहरवासीयांनीं सामान्यतः खेडेगांवांतील लोकांना लुबाडलें आहे असें मला दिसून आलें आहे. शहरवासी हा खरोखर गरीब ग्रामवासीयांच्या संपत्तीवरच जगला आहे. हिंदुस्थानांतील लोकांच्या परिस्थितीविषयीं अनेक ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं लिहिलें आहे. हिंदुस्थानांतील खेड्यांत राहणाऱ्या लोकांना जगण्याला पुरेसें मिळतें असें, माझ्या माहितीप्रमाणें तरी, कोणीहि म्हटलेलें नाहीं. उलट, त्यांनीं कबूल केलें आहे कीं, बरीचशी प्रजा जवळजवळ उपासमारीचें जीवन कंठते, शेंकडा दहा टक्के लोक अर्धपोटीं असतात, आणि कोट्यवधि लोकांना चिमूटभर घाणेरडी मीठ-मिरची व पांढरासफेद तांदूळ किंवा लाह्या यांवरच समाधान मानावें लागतें. आपणांपैकीं कोणाला जर या आहारावर राहा असें सांगितलें तर एक महिन्यापेक्षां जास्त दिवस कांहीं तो टिकवून धरण्याची अपेक्षा बाळगतां येणार नाहीं. आपली मानसिक शक्ति गमावून बसण्याची आपणांला भीति वाटेल असें खात्रीनें समजा. आणि तरीहि आमचे खेड्यांतले लोक रोजच्या रोज या दिव्यांतून जातच आहेत ! हे लोक कोणत्या परिस्थितींत

राहत आहेत, त्यांच्या हस्तव्यवसायांची स्थिति काय आहे, याचा अभ्यास करून जे कोणते ग्रामोद्योग व ज्या कोणत्या ग्रामीण कला पुनरुज्जीवित करण्याजोग्या असतील त्यांचें पुनरुज्जीवन करण्याकरितां गेल्या वर्षीं ग्रामोद्योग–संघ निर्माण झाला. ग्रामोद्योग–संघाच्या निर्मितीच्या ठरावाबरोबरच दुसरा एक असा ठराव पास झाला कीं, पुढचीं प्रदर्शनें चर्खा–संघ व ग्रामोद्योग–संघ यांनीं भरवावीं. आज जें प्रदर्शन उघडल्याचें मी जाहीर करणार आहें तें या प्रकारचें पहिलेंच प्रदर्शन आहे.

मीं तुम्हांला सांगितल्याप्रमाणें या प्रदर्शनाच्या मागची सर्व कल्पना माझी आहे आणि तरीहि मला हें कबूल केलें पाहिजे कीं ती कल्पना पूर्णत्वानें प्रत्यक्षांत येण्याच्या दृष्टीनें आपण अद्यापि फार दूर आहों. ज्यांनीं प्रदर्शन भरविलें त्यांच्या आश्चर्यकारक उद्यमशीलतेंचा तों पुरावाच आहे आणि तरीहि तें जितकें असावें तितकें पूर्ण नाहीं. त्यांना जो वेळ मिळाला होता तेवढ्या वेळांत ती पूर्णता आणणें अशक्यच होतें. खेड्यांतील कारागिरांना त्यांच्या गांवांतून येथें आणणें हें कांहीं सोपें काम नाहीं. येथें तुम्हांला दक्षिण हिंदुस्थानांतून आलेले खेड्यांतील लोक दिसतील. आपण कोठं आलों आहों हें त्यांना कदाचित् माहीतहि नसेल. उपाशीपोटीं असलेल्या या खेड्यांतील हिंदुस्थानांत सुद्धां अशा वस्तू उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आहे कीं त्या आम्हीं शहरवासीयांनीं वापरल्या तर त्यांत खेड्यांतील लोकांचें आणि आमचेंहि कल्याणच आहे, हेंच दाखविण्याचा या प्रदर्शनाचा उद्देश आहे.

कॉंग्रेसच्या पूर्वींच्या प्रदर्शनांप्रमाणें हें प्रदर्शन कांहीं तमाशा नव्हे. पूर्वींचीं प्रदर्शनें तशीं असणें साहजिकच होतें. कारण त्यांचा उद्देशच निराळा होता. प्रदर्शनाच्या उत्पन्नांतून सामान्यपणें कॉंग्रेसचा खर्च काढला जात असे. गेल्या वर्षीं हे सबंध स्वरूप पालटलें. तमाशेवजा भपक्याच्या वस्तू ठेवावयाच्या नाहींत पण प्रेक्षकांना हिंदुस्थानच्या खेडेगांवचें व त्याच्या हुन्नरीचें दर्शन घावयाचें असें आम्हीं ठरविलें. अर्थातच हा सर्व पसारा म्हणजे एक शैक्षणिक कार्य आहे. या खेपेस आम्ही उत्पन्न काढणार नाहीं असें नाहीं. पण ज्या कॉंग्रेस–अनुयायांचें चित्त स्वातंत्र्यावर जडलेलें आहे आणि खेड्यांना पुनः

पूर्वीचें स्थान देऊनच तें जे मिळवूं इच्छितात अशांच्यावरच हें अवलंबून असणार. शहरें आणि खेडीं यांच्यामध्यें जिवंत संबंध जर प्रस्थापित होतील तर हें प्रदर्शन पाहावयाला त्यांची गर्दी होईल आणि प्रदर्शनांतील निरनिराळ्या प्रात्याक्षिकांचा अभ्यास करण्याची ते काळजी घेतील.

ही गोष्ट कांहीं एकदांच प्रदर्शन पाहिल्यानें होणार नाहीं. तुम्हांला तें रोज पाहून त्यांतील प्रत्येक विभागाचा काळजीपूर्वक अभ्यास करावा लागेल. तो तुम्ही करूं लागाल म्हणजे हें प्रदर्शन भरविण्यांत खर्च झालेला शक्ति आणि उद्योग तुम्हांला समजून येतील व तुम्ही आश्चर्यानें तोंडांत बोट घालाल. जर तुम्ही सेवेच्या वृत्तीनें तें पाहाल तर तुम्हांला त्यांत अतिशय गोडी वाटेल. तुम्हांला येथें काश्मीर आणि दक्षिण हिंदुस्थान, सिंध आणि आसाम अशा दूरदूरच्या ठिकाणांहून आलेले हुन्नरी स्त्री–पुरुष दिसून येतील आणि आपली तुटपुंजी उपजीविका ते कशी मिळवितात हें तुम्हांला समजून येईल. त्यांच्या त्या एवढ्याशा मिळकतींत कांहीं भर टाकून त्यांना एक वेळचें तरी पोटभर जेवण मिळविण्याला समर्थ करणें आपल्या आवाक्यांतील आहे असें तुम्हांला आढळून येईल. मात्र त्यांना जीवन–वेतनाची हमी मिळण्याइतकी पुरेशी किंमत त्यांच्या मालाला देण्याची तुमच्या मनाची तयारी झाली पाहिजे.

प्रदर्शनांत असलेल्या अनेक विभागांचें किंवा त्यांपैकीं एका विभागाचें सुद्धां मी तुमच्यापुढें वर्णन करावें अशी तुमची अपेक्षा खास असणार नाहीं. आंत काय आहे याची चुणूक तुम्हांला बसल्या जागेवरूनहि होण्यासारखी आहे. कारण तुमच्यापुढें मोठमोठ्या कमानी उभारलेल्या नाहींत, तर अत्यंत साध्या पण अतिशय सुंदर रीतीनें सुशोभित केलेल्या भिंती आहेत; शांतिनिकेतनचे सुप्रसिद्ध कलावन्त श्री० नंदलाल बोस आणि त्यांचे सहकारी यांनीं त्या तयार केल्या आहेत. त्यांनीं साध्या कलात्मक प्रतीकांनीं खेडेगांवच्या लोकांची कारागिरी दाखविण्याचा येथें प्रयत्न केला आहे. आणि आंत जाऊन बाबू नंदलाल बोस यांनीं कित्येक आठवडे श्रम करून तयार केलेलें चित्र–प्रदर्शन जेव्हां तुम्ही पाहाल तेव्हां माझ्याप्रमाणेंच तुम्हांलाहि तेथें तासन्तास खर्च करावेसे वाटूं लागेल. पण तसेंच इतर विभागहि तुमचें मन ओढून घेतील. संगीत किंवा

सिनेमा यांसारखें तुमच्या मनाची करमणूक करणारें तुम्हांला या प्रदर्शनांत कांहीं जरी आढळलें नाहीं, तरी त्यांत तुम्हांला शिकण्याजोगें पुष्कळ मिळेल, अशी मी तुम्हांला खात्री देतों.

शेवटीं, तुम्हीं सर्वांनीं या प्रदर्शनाचे जाहिरातदार आपखुषीनें बनलें पाहिजे असें माझें तुम्हांला सांगणें आहे. म्हणजे अनेक लोकांना तें पाहावयाला यावेंसें वाटेल. हें प्रदर्शन खेडेगांवच्या लोकांकरितां भरविलेलें नाहीं, तें शहरांतील लोकांकरितां आहे. खेड्यांतील माणसें कशीं राहतात आणि त्यांची काय शक्ति आहे हें त्यांना पाहतां यावें म्हणून तें भरविलें आहे. हें प्रदर्शन भरविण्याकरितां स्वागतसमितीला जवळजवळ पसतीस हजार रुपये खर्च आला आहे. खर्चाची तोंडमिळवणी व्हावी एवढें तरी कमींत कमी तुम्हीं केलें पाहिजे. तुम्ही त्यांचे कळकळीचे जाहिरातदार झालां तर तुम्हांला तें करणें शक्य आहे. त्याबद्दल तुम्हांला कमिशन देण्याचें अश्वासन मी देऊं शकत नाहीं. तरी पण ईश्वराच्या सिंहासनापुढें जेव्हां तुम्ही उभे राहाल तेव्हां तुम्हीं कर्तव्यबुद्धीनें केलेल्या कामाबद्दल तेथें तें तुम्हांला मिळेलच याची मी ग्वाही देतों. मी येथें कांहीं दिवस राहणार आहें आणि शक्य तितक्या वेळां हें प्रदर्शन पाहण्याची अपेक्षा बाळगीत आहे. तेव्हां तुमच्यावर टाकलेला विश्वास तुम्ही कसा कायपार पाडतां तें मला दिसेलच.

खर्च जर भरून निघाला तर प्रदर्शन खेड्यांतील लोकांना मोफत उघडें ठेवण्याचा आमचा इरादा आहे.

प्रदर्शनांत तुम्हांला पुष्कळ उणिवा दिसतील, पण त्याचा दोष तुमच्या माझ्यावर आहे, खेड्यांतील लोकांवर नाहीं. पण जें काम योग्य रीतीनें होण्याला महिने लागले असते असें जबरदस्त काम कांहीं थोड्या आठवड्यांत पार पाडण्याचा प्रयत्न संयोजकांनीं केलेला आहे. म्हणून तुम्हीं आहे तें खपवून घ्यावें आणि तुम्हांला उणिवा दिसून येतीलच त्याबद्दल आम्हांला क्षमा करावी.*

---

*'हरिजन', ४।४।१९३६

"हें प्रदर्शन म्हणजे कांहीं सिनेमाचा खेळ नव्हे असें जें मीं तुम्हांला त्या दिवशीं सांगितलें तें सांगण्यांतला माझ्या मनांतील अर्थ मोठा होता. तुम्ही जेव्हां एकादा सिनेमा पाहावयाला जाता तेव्हां तुमच्या डोळ्यांना आणि कानांना भोगलोलुपतेनें आकर्षण करणाऱ्या अनेक गोष्टी तेथें तुमच्यापुढें येतात. मला तुम्हांला सांगावयाचें आहे कीं, या प्रदर्शनामध्यें शैक्षणिक मूल्य नसणारी एकहि वस्तु ठेवावयाची नाहीं असा प्रयत्न आम्हीं केला आहे. हें प्रदर्शन म्हणजे एक पवित्र तीर्थ-क्षेत्र व्हावें, तुमच्या डोळ्यांना आणि कानांना ती एक मेजवानी व्हावी, अर्थात्च इंद्रियांना शुद्ध करण्याचें सामर्थ्य असलेली आध्यात्मिक मेजवानी व्हावी, असें करण्याचा प्रयत्न आम्हीं केला आहे. तें कां हें मी तुम्हांला सांगतों. ओरिसा प्रांत आणि हाडांच्या सांपळ्यासारखे असलेले तेथील रहिवासी तुम्हांला माहीत आहेत ? तर मग त्या हाडांच्या सांपळ्यांच्या भुकेकंगाल दरिद्री भूमींतून या ठिकाणीं माणसें आलीं आहेत आणि त्यांनीं हाडें, शिंगें व चांदी यांवर चमत्कार करून दाखविले आहेत. जा आणि या वस्तू पाहून घ्या. त्या तुम्हांला अगदीं तयारच पाहावयाला मिळतील असें नाहीं, तर तयार होत असतांनाहि

पाहावयाला मिळतील. दारिद्र्यानें गांजलेल्या शरीरांतील सुद्धां मानवी आत्मा चैतन्यहीन शिंगें व धातू यांमध्यें कसा प्राण ओततो हें तुम्हांला दिसून येईल. एका गरीब कुंभारानें सुद्धां असाच मातीच्या गोळ्यांतून चमत्कार निर्माण केला आहे. ज्या वस्तूंची किंमत चार दोन आणे असेल असें मला वाटलें होतें त्यांची किंमत तेथें एकादा पैसा किंवा दोन पैसे होती, आणि तरीहि त्या वस्तूंत कलाकुसर मुळींच कमी नव्हती. माझ्या निकटच्या एका भगिनीनें हस्तिदंताचा एक कृष्ण परवां विकत घेतला. ती कधीं भगवान् कृष्णाची पूजा करणारी नव्हे, पण ती आतां मला सांगते कीं ती त्या उत्कृष्ट बालमूर्तीची पूजा आतां करूं लागली आहे.

"तेव्हां हें प्रदर्शन अशा रीतीनें एक तमाशा नसून एक प्रकारें यक्ष-नगरीच आहे. पण आमची रुचि इतकी बिघडलेली आहे कीं, आमच्या डोळ्यांसमोर घडत असलेले चमत्कार सुद्धां आम्हांला धुळीसारखे किंवा चिखलाच्या गोळ्यांसारखे वाटतात आणि परदेशाहून येणाऱ्या क्षुद्र वस्तु सुंदर व कलात्मक वाटतात. युरोपांतील कोठल्या तरी एका दूरच्या झऱ्याचें पाणी, त्याला न समजण्याजोगें कसलें तरी नांव दिलें कीं, आम्हांला चमत्कार करून दाखविणारें वाटतें आणि गंगेचें पाणी, जें पावन आणि जंतुनाशक म्हटलें जातें, तें मात्र घाणेरड्या नालींतील पाण्याहून आम्हांला फारसें चांगलें वाटत नाहीं."

"मीं वर्णिलेल्या प्रकारच्या दृश्यानें जर तुमचीं हृदयें हललीं नाहींत आणि उपाशीपोटी व अर्धपोटी लोकांकरितां थोडासा त्याग करण्याची जर तुम्हांला प्रेरणा झाली नाहीं तर नशीब तुमचें ? 'हिंदोस्तॉं हमारा' ही आमच्या अंतःकरणाला हलवून सोडणारी कविता ज्यानें केली त्या इक्बाल कवीच्या मनश्चक्षूसमोरहि असेंच कांहीं दृश्य असलें पाहिजे. त्यानें त्या कवितेंत 'हिमालय हा हिंदुस्थानचा तिन्ही त्रिकाळचा पहारेकरी आणि गंगामाता ही आमच्या संस्कृतीच्या अनेक अवस्थांतरांची 'सनातन साक्षी' असें हिंदुस्थानचें वर्णन केलें आहे. झेंडावंदनाच्या कार्यक्रमाला आपण नेहमीं हजर राहतों आणि आम्हांला आमच्या राष्ट्रीय झेंड्याचा अभिमान आहे. तुम्हांआम्हांला हिंदुस्थानांत तयार झालेल्या वस्तूंविषयीं जर आवड नसेल आणि परदेशी वस्तूंच्या पाठीमागं

जर आपण धांवत असूं तर या अभिमानाला कांहीं सुद्धां अर्थ नाहीं. आमच्या गरीब कारागीर स्त्री–पुरुषांनीं बनविलेल्या वस्तूंच्या दर्शनानें ज्यांचें हृदय हलत नाहीं आणि त्याकरितां थोडासाहि त्याग करावासा ज्यांना वाटत नाहीं त्यांनीं हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याविषयीं बोलणें फुकाचें आहे."*

* 'हरिजन', १३–४–१९३६.

# ग्राम–प्रदर्शनें

## : : २०

[ मगनवाडी येथें एक छोटेंसें प्रदर्शन भरवून ग्रामोद्योग–संघानें एक अगदीं नवीनच प्रयोग सुरू केला आहे. लखनौचें प्रदर्शन कसें असेल याची कल्पना तिकडे जे गेले नव्हते त्यांना यावी याकरितां हें प्रदर्शन मुद्दामच सर्वांना विनामूल्य उघडें ठेवलें होतें. लखनौ–प्रदर्शनांतून कित्येक तक्ते व चित्रें आणविलेलीं होतीं आणि मुख्य मुख्य उद्योगांचीं प्रात्यक्षिकें तर अर्थात्‌च प्रदर्शनाच्या आवारांत होतींच. पण जितक्या लोकांनीं तें पाहावयाला यावयास पाहिजे होतें तितके लोक आले नाहींत. लोकांना अजून शिक्षण दिलें पाहिजे. वर्ध्याला येणारे खेडच्यांपाडच्यांतील लोक एक तर काम शोधण्यासाठीं येतात किंवा आठवड्याच्या बाजाराला आपला माल किंवा भाजीपाला विकण्यासाठीं व आठवड्याचें सामान खरेदी करण्यासाठीं येतात. प्रदर्शनाला जाऊन तें पाहण्याइतकी त्यांना सवडहि नसते किंवा त्यांची प्रवृत्तीहि नसते, आणि तक्ते वाचून समजण्याइतकें अक्षरांचें ज्ञानहि त्यांना नसतें. आपलीं प्रदर्शनें आपण त्यांच्या दाराशीं घेऊन गेलें पाहिजे, त्यांच्या सवडीप्रमाणें आपली वेळ ठेवली पाहिजे आणि त्यांना समजतील अशा रीतीनें आपले तक्ते तयार केले पाहिजेत. पण वर्ध्याचें हें प्रदर्शन खेडच्यांतील लोकांपेक्षां वर्ध्याच्याच लोकांकरितां विशेषतः होतें. वर्ध्याच्या लोकांनीं त्यांच्या आंवतींभोंवतीं चाललेल्या नवीन नवीन प्रयोगांच्या बाबतींत उदासीन अनासक्तीची वृत्ति धारण केलेली आहे. हिंदुस्थानांत जशीं पुष्कळ

गांवें आहेत तशींच अनेक वर्धा शहरेंहि आहेत. प्रदर्शनाचें उद्घाटन करतांना गांधीजींनीं काढलेले पुढील उद्गार या शहरांतील लोकांना उद्देशून होते—]

"मगनवाडीकडे येत असतां दर रविवारीं भरणारा आठवड्याचा बाजार दिसला. त्या बाजारांत कच्चा माल आणि त्या कच्च्या मालापासून तयार झालेला पक्का माल दोन्हीहि भरपूर प्रमाणांत मांडलेले होते. या वस्तू या प्रदर्शनांत बऱ्याच कमी प्रमाणांत मांडलेल्या आहेत. म्हणून आठवड्याच्या बाजाराशीं आमच्या या प्रदर्शनाची तुलना माझ्या मनांत उभी राहिली. या दोहोंत मूलभूत भेद हा आहे कीं प्रदर्शन हें सर्वस्वीं खेड्यांतील व शहरांतील लोकांची सेवा व्हावी या हेतूनें भरविलेलें आहे, तर बाजार हें एक देवघेवीचें स्थान आहे आणि तेथें खेड्याचा माणूस लुबाडला जातो. त्याला तेथें आपला माल शक्य तितका स्वस्त, व पुष्कळ वेळां तर मूळ किंमतीपेक्षां सुद्धां कमी किंमत घेऊन विकणें भाग पाडलें जातें. या प्रदर्शनांत विकण्याचा—विकत घेण्याचा कांहीं प्रश्नच नाहीं. वर्धावासी लोकांना त्यांच्या आसपासच्या खेड्यांच्या बाबतींत त्यांचें कर्तव्य काय आहे हें शिकविण्याचा हें प्रदर्शन म्हणजे एक प्रयत्न आहे. तसेंच खेड्यांतील लोकांनीं आपलें जीवन सर्व दृष्टया सुधारणें कसें शक्य आहे हें लोकांना शिकविण्याचाही हा एक प्रयत्न आहे. या प्रदर्शनांत आपलीं खेडीं स्वच्छ कशीं ठेवावीं, कोणतें अन्न खावें, आपले उद्योगधंदे कसे सुधारावे व आज त्यांना त्यांतून जी मिळकत होते तीहून थोडी अधिक कशी मिळवावी हें त्यांना शिकावयास मिळेल. शहरांत राहणाऱ्यांसंबंधीं बोलावयाचें तर, आपण खेड्यांतील माणसांना सध्यां किती नाना तऱ्हांनीं लुबाडतों आणि त्यांचा माल घेऊन आपण त्यांची कशी जास्तींत जास्त सेवा करूं शकूं हें त्यांच्या मनांवर या प्रदर्शनानें जोरदारपणें बिंबेल. खेड्यांतील कारागिरांची शक्ति किती अद्भुत आहे हें लखनौ—प्रदर्शन ज्यांनीं पाहिलें त्यांना कळून चुकलेंच असेल आणि या प्रदर्शनानेंहि थोडाफार परिणाम होईलच. येथें प्रवेश—मूल्य जरी कांहींहि ठेवलेलें नसलें तरी लखनौ येथें तें ठेवलेलें होतें. तेथील प्रदर्शनाच्या बाबतींत जबरदस्त तोटा आला असा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे तो चुकीचा आहे. तिकीट—विक्रीची रक्कम २५,००० रुपयांवर जमा झाली. शिवाय

दुकानदारांकडूनहि कांहीं प्राप्ति झालीच. अर्थात्च कांहीं नाममात्र नफा झाला असण्याचा संभव आहे. असें प्रदर्शन लखनौच्या आसपास राहणाऱ्या लोकांना कित्येक वर्षें पुनः पाहावयाला मिळणार नाहीं. कुंभ—मेळा अनेक वर्षांच्या अंतरानें नियमानें भरत असतो. कॉंग्रेस व प्रदर्शन एकाच ठिकाणी कदाचित् भरू शकणार नाहींत आणि जरी प्रदर्शन तसें भरलें तरी मध्यें किती वर्षें टाकून तें भरेल हें अनिश्चित आहे. याचें एक विशेष कारण म्हणजे कॉंग्रेसकरितां आतां मोठमोठीं शहरें न निवडतां लहान कसब्यांच्या ठिकाणीं ती भरविण्याकडे प्रवृत्ति होत जाईलसें दिसतें. पण अशा तऱ्हेचीं स्थानिक प्रदर्शनें दरसाल कमी खर्चानें व्हावीं व त्यांना शैक्षणिक मूल्य वाढत्या प्रमाणांत येत जावें. उदाहरणार्थ, आज खेड्यांतल्या तेल्याची नीति बिघडली आहे. तो तेलांत कांहीं तरी सवंग घाणेरडा पदार्थ मिसळतो. त्याला या ठिकाणीं तेल हें अगदीं शुद्ध व निर्भेळ ठेवणें कसें फायद्याचें आहे हें शिकावयास मिळेल. कागद तयार करणाऱ्याला तो नीटनेटका व टिकाऊ कसा करावा याचें शिक्षण येथें मिळेल. जसजसा काळ जात जाईल तसतशी या क्रियांमध्यें सुधारणा आम्हांला दाखवितां आली पाहिजे. या वर्षीं आमच्या आजूबाजूच्या वातावरणावर किंवा शेजारच्या खेड्यांपाड्यांवर फारसा परिणाम आम्हांला करतां आलेला नाहीं हें मी जाणतों. पण त्यामुळें मला निराशा वाटत नाहीं. आम्हांला कष्टानें मार्ग काढला पाहिजे. येथें आलेल्या तुम्ही सर्वांनी जाहिरातदार होऊन खेड्यांतून गेलें पाहिजे आणि अशा प्रदर्शनांना खेड्यांतील लोकांना ओढून आणलें पाहिजे. दुःखाची गोष्ट आज ही आहे कीं, शहरवासीयांची उदासीनता खेड्यांच्या बाबतींत वाढत्या प्रमाणांत आहे. निकटच्या भविष्यकाळांत खेडीं मोडून टाकलीं जाणार आहेत अशीहि त्याची समजूत आहे. आपण गिरणींत तयार झालेल्या वस्तू हातांनीं झालेल्या वस्तूंपेक्षां अधिक पसंत करूं लागलों तर खेडीं खास नष्ट होतील. तुम्हीं येथें आलेल्या मंडळींनीं ग्राममनोवृत्तीचा संदेश घेऊन त्याचे प्रचारक म्हणून बाहेर पडलें पाहिजे.

"एक कारखाना म्हटला कीं, तो दोनचार लोकांना कामाला लावतो आणि हजारोंना बेकार करतो. तेलाच्या गिरणींतून मी शेंकडों टन तेल काढीन; पण

त्यानें मी हजारों तेल्यांनाहि बेकारींत टाकीन. याला मी विनाशक शक्ति म्हणतों; पण लक्षावधि माणसांच्या श्रमानें झालेलें उत्पादन हें विधायक आहे आणि तें सर्वांचें कल्याण साधणारेंहि आहे. मोठ्या शक्तीनें चालणारीं यंत्रें जरी सरकारच्या मालकीचीं झालीं तरी त्यांच्या द्वारां प्रचंड प्रमाणावर होणारें उत्पादन कांहीं हिताचें होणार नाहीं.

" 'पण,' कोणी कोणी विचारतात, 'लक्षावधि लोकांचे श्रम वांचवून त्यांना बौद्धिक व्यासंग करण्याकरितां अधिक फुरसत कां देऊं नये?' फुरसत कांहीं मर्यादेपर्यंत ठीक आणि अवश्यकहि आहे. ईश्वरानें मनुष्याला निढळाच्या घामानें आपलें अन्न खाण्यास निर्मिलें आहे आणि आम्हांला जें लागतें तें सर्व, आमचें अन्नसुद्धां, जादूगाराच्या पोतडींतून निर्माण व्हावें तसें आम्हीं निर्माण करण्याची शक्यता असल्याच्या कल्पनेचीसुद्धां मला भीति वाटते."* [म. दे.]

*'हरिजन', १६–५–१९३६.

## गांवकऱ्यांचें प्रदर्शन : : २१

[ ता. २५ डिसेंबर १९३६ रोजीं फैजपूर येथें खादी व ग्रामोद्योग यांचें प्रदर्शन उघडण्याच्या वेळीं गांधीजींनीं केलेल्या भाषणाचा सारांश मी पुढें देत आहें. म. दे. ]

"कॉंग्रेसचें हें अधिवेशन एका खेड्यांत भरविण्याची जबाबदारी सर्वस्वीं माझ्यावर आहे हें तुम्हांला वर्तमानपत्रांवरून कळून आलेंच असेल. वर्तमानपत्रांनीं असेंहि प्रसिद्ध केलें होतें कीं, मी डिसेंबरच्या प्रारंभाला फैजपूर येथें जाईन आणि प्रदर्शनाच्या सर्व व्यवस्थेवर देखरेख करीन. या बातमीचा उत्तरार्ध तेवढा खरा आहे आणि उगीच खोटा विनय किंवा अतिशयोक्ति न करतां मी सांगतों कीं येथें ज्या कांहीं उणिवा तुम्हांला दिसतील त्या सर्वांना जबाबदार सर्वस्वीं मी आहें. कॉंग्रेस आणि प्रदर्शन खेड्यांत भरविण्याची कल्पना मुळांत मीं काढली आणि जे कांहीं दोष वा उणिवा तुम्हांला येथें दिसतील त्यांना मींच जबाबदार राहिलें पाहिजे. तुम्हांला जें चांगलें दिसेल त्याचें श्रेय ज्यांच्याकडे येथील व्यवस्था सोंपविली होती त्यांचें आहे. कॉंग्रेस आणि प्रदर्शन खेड्यांत भरविण्याची माझी सूचना देव आणि दास्ताने यांनीं उचलून धरली आणि कोणतीहि गोष्ट पुरती करावयाची, मध्येंच सोडावयाची नाहीं या महाराष्ट्रीयांच्या स्वभावाला अनुसरून त्यांनीं आपलें वचन पार पाडलें आहे. प्रदर्शन हें माझ्याच कल्पनेला अनुसरून होणार,

कारण अ. भा. चरखा–संघ आणि अ. भा. ग्रामोद्योग–संघ यांनीं त्याची रचना केलेली आहे आणि मी चर्खा–संघाचा अध्यक्ष आहें–तसाच ग्रामोद्योग संघाचा मार्गदर्शक आहें. महाराष्ट्राच्या खेड्यांत एकादें लखनौ किंवा दिल्ली शहर निर्माण करतां कामा नये अशी सूचना मीं दिली होती. तसें करावयाचें असतें तर पुण्यांतच नसती का कॉंग्रेस आणि प्रदर्शन हीं भरवितां आलीं? पण तीं दोन्ही जर खेड्यांतच व्हावयाचीं असतील तर तीं हिंदुस्थानच्या खेड्याला शोभतील अशींच झालीं पाहिजेत आणि तें माझ्याहून अधिक चांगलें कोणालाहि साधणें शक्य नाहीं. कारण मीं त्यांना म्हटल्याप्रमाणें, मी पुष्कळ दिवसांपासून मनानें गांवकरी बनलों आहें, तर ते अगदीं अलीकडेच तसे बनले आहेत. अर्थात्च मी सुद्धां अलीकडे कांहीं महिन्यापूर्वींच शेगांवला जाऊन राहिलों आहें, आणि माझा जन्म, माझी वाढ आणि माझें शिक्षण हीं शहरांतच झालेलीं असल्यामुळें खेड्यांतील जीवनाशीं सहज जमवून घेणें माझ्याहि शरीराला कठिणच गेलें. त्यामुळें मला तेथें मलेरिया झाला. पण तुम्हांला माहीतच आहे कीं, मीं तो तत्काळ झुगारून दिला, झपाट्यानें बरा झालों आणि आतां उत्साही आणि कार्यक्षम बनलों आहें. अर्थात्च याचें श्रेय अंशतः याला आहे कीं, मी आतां चिंतामुक्त झालों आहें. सर्व चिंता मीं जवाहरलाल आणि सरदार यांच्या विशाल स्कंधांवर टाकून दिल्या आहेत. तथापि, माझ्या तनुदुरुस्तीचें खरें रहस्य मी तुम्हांला सांगतों तें हें कीं, जेथें माझें हृदय जडलें होतें तेथेंच माझ्या शरीराला राहावयाला मिळालें आहें.

येथील रचनेचें सर्व श्रेय श्री० म्हात्रे शिल्पकार व श्री० नंदलाल बोस कलाकार यांना आहे. दोन महिन्यांपूर्वीं नंदबाबूंनीं जेव्हां माझ्या विनंतीला मान दिला तेव्हां मला काय पाहिजे तें मीं त्यांना स्पष्ट करून सांगितलें आणि त्या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्याचें त्यांच्यावरच सोंपविलें. कारण ते प्रतिभावान् कलावन्त आहेत आणि मी मुळींच कलावन्त नाहीं. ईश्वरानें मला कला जाणण्याचें इंद्रिय दिलें आहे पण त्या कलेला मूर्त रूप देण्याचे अवयव दिलेले नाहींत. त्यानें नंदबाबूंना दोन्हीं दिले आहेत. प्रदर्शनाची कलात्मक बाजू सजावण्याची सर्व जबाबदारी आपणावर घेण्याचें त्यांनीं कबूल केलें, कांहीं आठवड्यांपूर्वीं ते येथें येऊन राहिले आणि सर्व त्यांनीं कांहीं स्वतःच्या देखरेखीखालीं करून

घेतलें याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. त्यामुळें सगळें टिळकनगर हेंच एक प्रदर्शन झालें आहे आणि मी आतां जेथें तें उघडणार तेथेंच तें सुरू होत नसून अगदीं मुख्य दरवाजापासून तें सुरू होत आहे; तो दरवाजा म्हणजे ग्रामकलेचा एक सुरेख नमुना आहे. अर्थात् श्री० म्हात्रे यांचेहि आपण आभार मानले पाहिजेत; कारण; सबंध रचना पूर्ण करण्यांत त्यांनीं यत्किंचित्हि कसूर केली नाहीं. आणि हें लक्षांत घ्या कीं, नंदबाबूंनीं हें सर्व उभारण्याकरितां फक्त गांवच्या सामग्रीचा आणि गांवच्याच कामगारांचा उपयोग केला आहे.

आतां तुम्हीं जाऊन हें प्रदर्शन शक्य तर माझ्या डोळ्यांनीं पाहावें. अ. भा. चर्खा–संघ व ग्रामोद्योग–संघ यांच्या वतीनें तें उभारलें गेलें आहे हें तुम्हांला समजलें म्हणजे तेथें काय पाहावयाला मिळणार हें तुम्ही जाणणारच. चर्खा–संघाचें ध्येय सबंध हिंदुस्थान खादीमय करणें हें आहे; या ध्येयापासून दुर्दैवानें आम्ही अजून फार दूर आहों. ग्रामोद्योग–संघाचें ध्येय मरत असलेल्या गृहोद्योगांचें पुनरुज्जीवन करणें हें आहे. खादी आणि इतर ग्रामोद्योग दोन्ही बाबी आमच्या खेड्यांच्या आर्थिक हिताच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

हें प्रदर्शन म्हणजे कांहीं तमाशा नव्हे. लोकांचे डोळे दिपवून सोडावेत हें किंवा त्यांना भुलवावें हा याचा उद्देश नाहीं. हें खरेंखुरें ग्राम–प्रदर्शन आहे. तें खेडेगांवांतील लोकांच्या श्रमानेंच अस्तित्वांत आलें आहे. हें केवळ शैक्षणिक कार्य आहे. खेड्यांतील लोकांनीं जर केवळ आपले हात, आपले पाय आणि आपल्या आजूबाजूचीं साधनें उपयोगांत आणलीं तर त्यांची मिळकत दुप्पट कशी होईल एवढेंच या प्रदर्शनामध्यें दिसेल. आमच्या राष्ट्रपतींनीं मला युक्त प्रांतांतील एखाद्या खेड्यांत न्यावें; मी त्या खेड्याची पुनर्रचना जमनालालजींच्या पैशांतून नव्हे तर त्या खेड्यांत राहणाऱ्या स्त्री–पुरुषांच्या हातांपायांच्या मदतीनें करण्याचें अंगावर घ्यावयास तयार आहें. मात्र शर्त एक कीं, राष्ट्रपतींनीं गांवच्या लोकांचें मन माझ्या सूचनांबरहुकूम काम करण्याला वळविलें पाहिजे. आमचे राष्ट्रपति कदाचित् म्हणतील कीं हीं गरीब माणसें आपल्या मिळकतींत जरा भर टाकूं लागलीं रे लागलीं कीं, जमनालालजीं-सारखा एखादा जमीनदार लगेच खंड वाढविणार आणि त्यांची वाढलेली

मिळकत त्यांच्या हातांतून हिसकून घेणार. पण आम्ही जमीनदाराला तसें कांहीं करूंच देणार नाहीं. आमच्या या देशासारख्या देशांत—जेथें कोट्यवधि बेकार लोकांची भरगच्च वस्ती आहे—गांवकऱ्यांनीं प्रामाणिकपणें आपली रोजी मिळवावी याकरितां त्यांच्या हातापायांना गुंतवून ठेवणारें कांहीं काम देणें अवश्य आहे याविषयीं माझ्या मनांत बिलकुल शंका नाहीं. त्यांच्याचसाठीं ही खादी आणि ग्रामोद्योग अवश्य आहेत. आज तर त्यांची अतिशयच जरूर आहे हें मला सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट दिसतें. भविष्य काळीं त्यांच्यापुढें काय वाढून ठेवलें आहे मला माहीत नाहीं व तें जाणून घेण्याची मला जरूरहि वाटत नाहीं.

[ इतकें बोलून त्यांच्यापुढें ठेवलेल्या प्रदर्शनांतील कांहीं वस्तूचें वर्णन ते करूं लागले—उदाहरणार्थ, रात्रींच्या रात्रीं तयार केलेलीं लोहाराचीं हत्यारें, नदीकांठावर उगवणाऱ्या गवतापासून आन्ध्र कारागिरांनीं तयार केलेल्या बटवे, चष्माघर अशा वस्तू, वर्ध्याच्या चर्मालयांत रंगविलेलें आणि खादीचें अस्तर लावलेलें कोल्ह्याचें कातडें इ० इ० ]

या लहान वस्तू खेड्यांतील गरीब लोकांच्या प्राप्तींत बरीच भर घालतात. आज त्यांना मिळणाऱ्या तीन पैशांऐवजीं तीन आणे मिळतील अशी जर तुम्ही त्यांना खात्री देऊं शकलां, तर आपण स्वराज्य मिळविलें असें त्यांना वाटेल. कांतणाऱ्यांकरितां हेंच आज करण्याचा प्रयत्न खादी करीत आहे.

तात्पर्य, धुळीचें सोनें कसें बनवावें हें त्यांना आपण शिकवावयाचें आहे आणि हेंच या प्रदर्शनाच्या योगानें त्यांना शिकविण्याचा उद्देश आहे. दोन महिन्यांपूर्वीं नंदबाबूंना भेटलों असतां मीं त्यांना सांगितलें, 'शांतिनिकेतनांतील तुमच्या कला-शालेमधील अमूल्य चित्रें तुम्ही इकडे आणूं नये, अवेळीं पाऊस आला तर त्यांचें मातेरें होईल.' त्यांनीं माझा सला ग्राह्य मानला आणि या ठिकाणाच्या आसपासच्याच वस्तू त्यांनीं गोळा केल्या. त्यांची दृष्टि कला-वन्ताची आहे, व त्या दृष्टीच्या साह्यानें त्यांनीं सारीं खेडीं न् खेडीं पालथीं घातलीं आणि शेतकऱ्यांच्या संसारांतून अनेक वस्तू उचलल्या. त्या वस्तू अशा

होत्या कीं साध्या डोळ्यांना त्या लक्षांत भरण्याजोग्या कलात्मक वस्तू आहेत असें कधींच वाटलें नसतें. पण मर्मज्ञ दृष्टीनें त्यांनीं त्या उचलून आणल्या, त्यांची व्यवस्थित मांडणी केली, त्याबरोबर त्यांना एक नवाच अर्थ आला !

हें प्रदर्शन पूर्वीच्या प्रदर्शनांहून लहान झाल्याबद्दल श्री. वैकुंठभाई मेहेता यांनीं क्षमा मागितली; पण क्षमा मागण्याचें कांहींच कारण नव्हतें. त्यांत एकहि फालतू वस्तू मांडलेली नाहीं. आणि येथें दाखविलेले हस्तव्यवसाय म्हणजे तितकें अधिक उत्पादनच म्हणावयाचें. उदाहरणार्थ, मुंज गवत, केळीची साल आणि बांबू यांच्यापासून केलेले हातकागदच पाहा. येथें उभें केलेलें सर्व बांधकाम जें तुम्हांला दिसत आहे त्यांत बांबूचाच मोठा हिस्सा आहे आणि हें काँग्रेसनगरांतील प्रदर्शन आटोपतांच या सर्व बांबूंचा व्यवस्थित उपयोग केला जाईल याची तुम्ही खात्री बाळगा.

आजच्या राष्ट्रपतींच्या मिरवणुकीची तयारी, विशेषतः सहा बैल॰ जोड्या लावलेला सुंदर आकाराचा व उत्कृष्ट सजविलेला रथ, या सर्वांत किती विलक्षण साधेपणा भरला होता तो तुम्हीं पाहिलाच असेल. येथें तुमच्यापुढें जें वाढलें आहे तें तुमच्यासाठीं तयार करण्याकरितां ही सर्व योजना केलेली होती. शहरांतल्या कांहींहि सुखसोयी येथें नाहींत, सर्व कांहीं गरीब खेडूत जें देऊं शकतील तेंच येथें आहे. तेव्हां हें स्थान म्हणजे आपणां सर्वांना तीर्थयात्रेचेंच स्थान झालें आहे. हीच आमची काशी आणि हीच आमची मक्का आहे. येथें स्वातंत्र्याप्रीत्यर्थ प्रार्थना करण्याकरितां आणि राष्ट्रसेवेला स्वतःला अर्पण करण्याकरितां आपण आलों आहों. गरीब शेतकऱ्यांना मगरुरी दाखविण्याकरितां आम्ही येथें आलों नसून त्यांच्या दैनंदिन कष्टांत भाग घेऊन, भंग्याचें काम करून, आपले कपडे आपणच धुऊन, आपलें पीठ आपणच दळून व अशाच इतर मार्गांनीं त्यांच्या- वरचें आपलें ओझें कमी कसें करतां येईल हें शिकण्याकरितां आपण येथें आलों आहों. काँग्रेसच्या इतिहासांत अगदीं पहिल्याप्रथम तुम्हांला सकस तांदूळ, हातानें दळलेल्या गव्हाची चपाती, भरपूर ताजी हवा आणि तुमच्या शरीराला

विसांव्याकरितां स्वच्छ भूमिमाता या गोष्टी येथें मिळत आहेत. गरीब बापड्या संयोजकांचे हातून जे कांहीं दोष झाले असतील ते तुम्ही कृपा करून सहन करा; कारण खानसाहेबांच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे, आपण सारे खुदाई खिद्मतगार म्हणजे ईश्वराचे सेवक आहों; येथें सेवा घेण्याला नव्हे तर देण्याला या.*

* हरिजन, २–१–१९३७.

## दरसाल भरणारी अध्यापन-शाला : : २२

[ ता. १० फेब्रुवारी १९३८ रोजीं हरिपुरा येथें प्रदर्शन-उद्‌घाटनाच्या वेळीं केललें भाषण. ]

जेव्हां लखनौंत अशा प्रकारचें पहिलें प्रदर्शन मीं उघडलें तेव्हां मीं म्हटलें होतें कीं, आमचीं प्रदर्शनें हीं शिक्षण देणाऱ्या शाळा झालीं पाहिजेत. तेव्हांपासून या आदर्शाकडे आमची यशस्वी रीतीनें प्रगति होत चालली आहे; आणि मी आतांच पाहून आलों तें हें प्रदर्शन (जें उघडल्याचें मी जाहीर करीत आहे ) अशीच एक दरसाल भरणारी अध्यापन-शाला आहे. पूर्वींचीं प्रदर्शनें असत तसें हें प्रदर्शन करमणुकीचें ठिकाण नाहीं. प्रदर्शन उघडें असेतोंवर आठवड्या दोन आठवड्यांत जे हजारों-लाखों लोक येऊन तें पाहून जातील त्यांना तें शिक्षण घेण्याचें स्थान आहे. तें पाहणाऱ्या गरीबाला पुढल्या वर्षाच्या प्रवासाची एक प्रकारची सामुग्री तें पुरवीत आहे. त्याला तें एका धंद्याची माहिती देऊन सज्ज करीत आहे. त्या धंद्यांत जर त्यानें आठ तास काम केलें तर त्याचें व त्याच्या कुटुंबाचें पुढचें वर्ष सुखानें जाऊं शकेल. कोणी कितीहि अडाणी किंवा अशिक्षित असो, तो अथवा ती जर आपले हात आणि पाय वापरील तर त्याला अथवा तिला प्रामाणिकपणानें निर्वाह चालविण्याचें साधन प्राप्त करून देणारें शिक्षण या प्रदर्शनांतून खात्रीनें मिळेल.

आज सकाळीं प्रदर्शनांत मीं एक तास खर्च केला. मी चरखा-संघाचा अध्यक्ष आहे आणि ग्रामोद्योग-संघाचें मी मार्गदर्शन करतों म्हणून मला या

प्रदर्शनांत नवीन असें कांहींच नसेल असें आपण कृपा करून समजूं नका. आणि तुम्हांला जरी तसें वाटलें तरी मी स्वतः मात्र तसें समजण्याइतका बावळट नाहीं. प्रदर्शनांत एक तासच काय, किती तरी तास मला घालवितां आले तरी तें मला पाहिजे आहे. प्रत्येक क्षणाला मला तेथें कांहीं ना कांहीं नवीन शिकावयाला मिळेल. पण तेथें जो कोणता उद्योग मी ग्रहण करीन त्यांतून माझ्या निर्वाहा- पुरतें कमाविण्याची शक्ति माझ्यांत येणार नाहीं हें मी कबूल करतों. आज तर माझा चरितार्थ भिक्षेवरच चालला आहे आणि माझ्यासारख्याच्या बाबतींत तें अपरिहार्यहि म्हणतां येईल. पण माझी खात्री आहे कीं, येथें मांडलेल्या अनेक क्रियांपैकीं कोणतीहि एक क्रियासुद्धां कोणत्याहि धडधाकट स्त्री—पुरुषाच्या चरितार्थाला साधन पुरेसें होणें शक्य आहे.

हिंदुस्थानचीं सात लाख खेडीं जर जिवंत ठेवावयाचीं असतील, आणि सर्व संस्कृतींच्या मुळाशीं असणारी शांति जर मिळवावयाची असेल तर चरखा हें आपल्याला सर्व हस्तव्यवसायांचें केंद्र केलें पाहिजे. अशा प्रकारें माझी चरख्यावरील श्रद्धा रोजच्या रोज वाढत आहे आणि चरख्याचा सूर्यच इतर हस्तव्यवसायरूपी ग्रहांना प्रकाशित करील हें मला अधिकाधिक स्वच्छ दिसत आहे. पण मी एक पाऊल पुढें जाऊन असें म्हणतों कीं, आपण जसे प्रचंड सूर्यमालेमध्यें नवीन नवीन तारे आणि ग्रह शोधीतच असतों, तसेंच दररोज आपण नवीन नवीन हस्तव्यवसायांचा शोध करीतच राहिलें पाहिजे. पण त्यासाठीं चरख्याला आपण खराखुरा चैतन्यदायी सूर्य बनविलें पाहिजे. १९२१ सालीं बार्डोली येथें सत्याग्रहाची मोहीम सुरू करण्याकरितां प्रत्येक घरांत चरखा अगोदर सुरू झाला पाहिजे अशी अटच घातली होती आणि ही अट जरी पूर्णपणें अंमलांत आली नाहीं तरी स्व० विठ्ठलभाईंच्या आत्याग्रहाला बळी पडून सत्याग्रह सुरू केला. त्याचा परिणाम काय झाला हें तुम्हांला चांगलें माहीत आहेच. तेव्हां, आजसुद्धां मी बारडोलीच्या लोकांना सांगेन कीं, प्रत्येक घरांत एक एक चरखा ही अट पुरी करा. त्यामुळें तुमच्या प्राप्तींत भर पडण्याला मदत होईल आणि तुम्ही स्वावलंबी बनाल.*

*'हरिजन', १९।२।१९३८.

## वेतनाचें प्रमाण ठरविण्याची जरुरी : : २३

अ. भा. ग्रामोद्योग–संघानें आपल्या एजंटांना व इतरांना पुढील प्रश्नमाला पाठविली आहे:—

"अ. भा. ग्रामोद्योग–संघाच्या आश्रयाखालीं उत्पन्न होणाऱ्या व विकल्या जाणाऱ्या सर्व वस्तूंच्या बाबतींत कारागिराला त्याच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे असा आग्रह संघानें धरण्याची सूचना करण्यांत आली आहे. याकरितां एक कामचलाऊ वेतन–प्रमाण नक्की करण्याची अवश्यकता आहे. अशा तऱ्हेचें प्रमाण सारखें काम देणाऱ्या स्त्री–पुरुषांना एकच असावें. रोज आठ तासां-प्रमाणें काम करून कमींत कमी अमुक इतकें काम पूर्ण करण्यावर तें आधार-लेलें असावें. अशा प्रकारचें वेतन उत्पादनाच्या खर्चांत धरलें जाईल आणि त्याचा विचार करूनच वस्तूची किंमत निश्चित केली जाईल. नित्याच्या व्यवहाराप्रमाणें, चढाओढीच्या बाजारांत किंमती नक्की करणें आपणांला शक्य नसेल कदाचित्, पण चढाओढींत सामील न होणाऱ्या वस्तूंच्या बाबतींत आणि गिऱ्हाइकांना आवडणाऱ्या व चांगुलपणाकरितां जो माल विशेष पसंत केला जातो त्या मालाच्या बाबतींत तसें करण्याला हरकत नाहीं.

पुढील मुद्द्यांच्या बाबतींत आपलें मत काय आहे तें समजून घेण्या-करितां ही प्रश्नावलि आपणांकडे पाठविण्यांत येत आहे:—

१. रोजचें कमींत कमी अमुक वेतन असें निश्चित करणें व वस्तूंच्या

किंमती नक्की करून तें वेतन निश्चित मिळेल अशी कारागिरांना हमी देणें या गोष्टी अंमलांत आणणें आपणांला शक्य वाटतें का ?

२. आपलें अंतिम वेतनमान आपण ठरवावें व हळूहळू त्याकडे जावें, की अगदीं कमींत कमी प्रमाणापासून सुरुवात करून पुढें तें वाढवीत जावें ?

३. तें साधण्याचा मूळ आधार काय असावा ? कपडा हा स्वतःच्या श्रमानें तयार करून घ्यावयाचा असल्यामुळें तूर्त अन्न हेंच विचारांत घेऊन जीवन–वेतन काय असावें हें आपण सुचवूं शकाल काय ? तासाला दोन पैसे हें प्रमाण फार कमी होईल काय ?

अ. भा. चरखा–संघ व ग्रामोद्योग–संघ यांनीं आणि यांसारख्याच परोपकारी संस्थांनीं स्वस्तांत स्वस्त खरीदावें आणि महागांत महाग विकावें हें व्यापारी धोरण अंमलांत आणतां कामा नये. चर्खा–संघानें स्वस्तांत स्वस्त खरीदण्याचा प्रयत्न केला आहे ही गोष्ट खरी आहे. तथापि तींविषयीं विचार इतरत्र करूं. खादीच्या विकासाच्या माझ्या अनुभवाचा फायदा ग्रामोद्योगसंघाला देण्याच्या हेतूनें संघाच्या आश्रयाखालीं काम करणाऱ्या कारागिरांना मिळणाऱ्या वेतना-संबंधींची चर्चा मीं सुरू केली त्याचा परिणाम म्हणजे ही प्रश्नमाला.

संघाच्या एजंटांमध्यें पाहिजे असलेली वस्तु जितक्या कमी किंमतींत तयार करून घेतां येईल तितक्या कमी किंमतींत तयार करून घेण्याची प्रवृत्ति असल्याचें पूर्वींच दृष्टोत्पत्तीस आलें आहे. कारागिराच्या मिळकतीवर नाहीं कुऱ्हाड चालवावयाची तर कोठें चालविणार ? म्हणून कमींत कमी दर काय असावा हें जर ठरविलें नाहीं तर ग्रामोद्योगसंघ जरी खेड्यांतील कारागिरांकरितांच जन्माला आला असला तरी त्याला धक्का पोंचण्याचा बराचसा संभव आहे.

खेड्यांतल्या गरीबबापड्या सोशिक लोकांना आपण फार काळ लुबाडीत आलों आहों. परोपकाराच्या नांवाखालीं ग्रामोद्योगसंघानें तरी या लुबाडणुकींत आणखी भर घालूं नये. खेड्यांमध्यें वस्तू शक्य तितक्या स्वस्त तयार करणें हें संघाचें उद्दिष्ट नसून खेड्यांतील बेकार लोकांना जीवन–वेतन देऊन काम पुरविणें हें त्याचें उद्दिष्ट आहे.

खेड्यांत तयार झालेल्या वस्तूंची किंमत वाढविल्यानें ग्रामोद्योग–संघ ज्या उद्दिष्टाकरितां अस्तित्वांत आला त्यावरच घाव घातल्यासारखें होईल असें कोणी म्हटलें आहे; कारण तें म्हणतात, किंमती जर जबरदस्त असल्या तर त्या वस्तू कोणीच घेणार नाहीं. वस्तू तयार करणाऱ्याला त्या वस्तूच्या किंमतींतून जर फक्त जीवनवेतनच मिळत असेल तर ती किंमत जबरदस्त कां समजली जावी? लोकांच्या कंगाल परिस्थितीचें ज्ञान करून घेण्याचें शिक्षण ग्राहक समाजाला देणें अवश्य आहे. राबणाऱ्या लाखों लोकांना जर न्याय द्यावयाचा असेल तर जें त्यांचें हक्काचें आहे तें त्यांना दिलेंच पाहिजे; ते जिवंत राहतील इतकें वेतन आपण त्यांना दिलेंच पाहिजे. त्यांच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन एक वेळचें सुद्धां पोटभर अन्न त्यांना मिळणार नाहीं एवढेंच वेतन आपण त्यांना देतां कामा नये.

गिरणींत तयार झालेल्या मालाशीं चढाओढ करण्याचें संघानें मनांत सुद्धां आणतां कामा नये, हें स्पष्टच आहे. ज्यांत आपली हारच आहे हें आपणांला माहीत आहे अशा खेळांत आपण भाग कशाला घ्यावयाचा? पैशाच्या भाषेंत बोलावयाचें तर मोठमोठे कारखाने, मग ते विदेशी असोत वा स्वदेशी, हाताच्या कामाला किंमतीच्या बाबतींत नेहमींच मागें टाकणार. संघ हा खोट्या व अमानुष अर्थशास्त्राच्या जागीं खरें व माणुसकीचें अर्थशास्त्र आणावयाचा प्रयत्न करूं इच्छितो. जिच्यामुळें उरीं फुटून मरण येईल अशी चढाओढ नव्हे तर जीवनदायी सहकार्य हा मानवाचा कायदा आहे. भावनेकडे दुर्लक्ष करणें म्हणजे मनुष्याला भावना असते हेंच विसरणें आहे. आपण जर साक्षात् ईश्वराचीं प्रतिबिंबें असूं तर थोड्यांचें भलें, किंबहुना पुष्कळांचेंहि भलें आपणांला साधावयाचें नसून सर्वांचें भलें साधावयाचें आहें हें आपण विसरतां कामा नये.

ग्रामोद्योग–संघासारख्या मानवसेवेला वाहिलेल्या संस्थेला प्रश्नमालेंत उत्पन्न केलेल्या मुद्द्यांचा विचार बाजूला सारतां येणार नाहीं. त्यांचा खरा निर्णय जर अव्यवहार्य दिसला तर तो व्यवहार्य करण्याचा संघाचा प्रयत्न असला पाहिजे. सत्य हें नेहमीं व्यवहार्य असतेंच. या दृष्टीनें विचार केला तर संघानें आंखलेल्या कार्यक्रमाला प्रौढ शिक्षण म्हणणें अगदीं योग्य होईल.

आणि संघाला जर आपल्या देखरेखीखालीं असलेल्या कारागिराचें जीवनवेतन निश्चित करावयाचें असेल तर त्याच्या घरखर्चीतहि त्यानें हळूच शिरकाव करून घेऊन त्याला दिलेली पैनपै कोठें जाते तें पाहिलें पाहिजे.

निश्चित करावयाचा सर्वांत अवघड प्रश्न म्हणजे कमींत कमी वेतन किंवा जीवन–वेतन हाच असणार. चांगल्या कर्तबगार कारागिरानें ठरवून दिलेल्या विवक्षित संख्येइतका माल काढला तर त्यासाठीं लागलेल्या आठ तासांच्या भरपूर श्रमाला आठ आणे मजुरी द्यावी* असें मीं सुचविलें आहे. आठ आणे हें निव्वळ एक चिन्ह आहे. त्यानें जीवनाला अवश्यक असणाऱ्या वस्तूंचें एक विशिष्ट परिमाण धरावयाचें. पांच माणसांच्या कुटुंबांत जर आठ तास काम करणारे दोन गडी असले तर मीं सुचविलेल्या दराप्रमाणें, ते महिन्याला तीस रुपये मिळवितील. अर्थात्च यांत सुटी किंवा आजारीपण धरलेलें नाहीं. पांच तोंडांना महिन्याला तीस रुपये म्हणजे कांहीं फार नव्हे. या ठिकाणीं सूचित केलेल्या पद्धतींत अर्थात्च स्त्री–पुरुषांचा किंवा वयाचा भेद मानावयाचा नाहीं. पण प्रश्नमाला ज्यांना पाठविली आहे त्यांतील प्रत्येकानें आपापला अनुभव पाहून सिद्धांत बांधावा आणि त्याप्रमाणें कळवावें. ×

*हा लेख १९३५ सालीं म्हणजे युद्धापूर्वी लिहिला आहे. युद्धानंतरचा हिशेब त्या मानानें वाढेल.

——अनुवादक

×'हरिजन', १३–७–१९३५.

## हिंदी उद्योगधंदे



हिंदी उद्योगधंदे म्हणजे काय, हा प्रश्न वरचेवर विचारण्यांत येतो. हिंदी प्रदर्शनाच्या बाबतींत बहुधा हा प्रश्न विचारला जातो. 'जो हिंदुस्थानांत चाललेला असेल तो हिंदी उद्योगधंदा' असें पूर्वी म्हटलें जात असे. या प्रकारें हिंदुस्थानांत स्थायी न झालेल्या युरोपीय लोकांचा भरणा असलेली गिरणी, तिच्यांतील भांडवल, कसबाचें काम करणारे कामगार आणि यंत्रसामुग्री परदेशाहून आणलेली असत तरी हिंदुस्थानच्या सर्वसामान्य लोकांना बाधक आहे असें सिद्ध होऊं शकलें तरी, 'हिंदी उद्योगधंदा' म्हणूनच समजली जात असे. तेथून आपण पुष्कळ अंतर तोडून पुढें आलों आहों. कोणताहि उद्योग हिंदी म्हणावयाचा झाला तर तो स्पष्टपणें हिंदीच जनसमुदायाच्या हिताचा असला पाहिजे, त्यांतील कसबी आणि साधे दोन्ही कामगार हिंदी असले पाहिजेत, त्याचें भांडवल व यंत्रसामुग्री हिंदीच असली पाहिजे, त्यांत कामाला लावलेल्या मजुरांना जीवन-वेतन मिळत असलें पाहिजे, त्यांची राहण्याची सोय चांगली असली पाहिजे, आणि या त्यांच्या मुलांबाळांच्या योगक्षेमाची हमी गिरणी-मालकांनीं घेतलेली असली पाहिजे. ही आदर्श व्याख्या झाली. ही व्याख्या कदाचित् चर्खासंघ व ग्रामोद्योग-संघ याच संस्था जेमतेम पुरी पाडूं शकतील. कारण या संघांना सुद्धां राहिलेलें पुष्कळ काम भरून काढावयाचें आहे. तरीपण या व्याख्येप्रमाणें तंतोतंत आपली वागणूक ठेवणें हें त्यांचें तात्कालिक उद्दिष्ट आहे.

परंतु ही व्याख्या आणि १९२०पूर्वी काँग्रेसमध्यें प्रचलित असलेली व्याख्या या दोहोंमध्यें बसणाऱ्या व्याख्यांच्या अनेक तऱ्हा आहेत. 'गिरणी–कापडाव्यतिरिक्त हिंदुस्थानांत तयार झालेला सर्व माल' अशी 'स्वदेश'ची काँग्रेसची सर्वसाधारण व्याख्या आहे. गिरणीचा प्रचंड उद्योग हा सामान्यपणें हिंदी उद्योग म्हणतां येईल. पण, जपान व लँकेशायर यांच्याशीं स्पर्धा करण्याची त्याची ताकद असली तरी सुद्धां उद्योग बहुजनसमाजाला लुबाडणारा तो आहे; खादीवर तो जितकी जीत मिळवील त्या प्रमाणांत तो बहुजनसमाजाचें दारिद्र्य वाढवितो. 'संपूर्ण औद्योगीकरणा'चें वेड आज पसरलें असल्यामुळें माझें मत अगदीं बाजूला सारलें गेलें नसलें तरी त्याबद्दल संशय व्यक्त केला जात आहे. कारखानदारीच्या प्रगतीमुळें लोकांचें वाढतें दारिद्र्य ही अपरिहार्य गोष्ट आहे आणि म्हणून तें भोगलें पाहिजे असें सांगितलें जात आहे. हें अरिष्ट अपरिहार्य आहे हेंच मी मानीत नाहीं, मग तें भोगण्याची गोष्ट तर बाजूलाच ! हिंदुस्थानाला लागणारें सर्व कापड तयार करणें, राष्ट्राचा रिकामा जाणारा वेळ केवळ कातणें व तत्पूर्वींच्या क्रिया यांमध्यें घातल्यानें, खेड्यांना शक्य आहे हें चर्खासंघानें यशस्वी रीतीनें सिद्ध करून दाखविलें आहे. अडचण आहे ती राष्ट्राचें मन गिरणीच्या कापडावरून कसें उठवावयाचें ही आहे. तें कसें करावयाचें याची चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे. या लहानशा लेखांत खेडेगांवच्या कोट्यवधि लोकांच्या भाषेंत हिंदी उद्योगधंद्याची व्याख्या काय तें सांगणें व त्या व्याख्येविषयींचीं माझीं कारणें सांगणें हा माझा उद्देश होता. राष्ट्रीय प्रदर्शनें अशाच उद्योगांकरितां असावीं कीं ज्यांना प्रत्येक रीतीनें लोकांचा पाठिंबा अवश्य आहे, प्रदर्शनाची किंवा अशाच गोष्टींचीं मदत न घेतां सुद्धां जे फोफावत असेल आणि जे आपलीं स्वतःचीं प्रदर्शनें भरवितात, अशा उद्योगांकरितां राष्ट्रीय प्रदर्शनांची शक्ति खर्च होऊं नये हें सर्वांना स्पष्ट समजलें पाहिजे.*

---

* 'हरिजन', २३।१०।१९३७.

## खरी स्वदेशी

: : २५

'स्वदेशी' या शब्दामागें 'खरी' असें विशेषण मला जर वापरावें लागलें तर एकादा टीकाकार मला विचारील, 'मग काय खोटी स्वदेशीहि आहे वाटतें ?' दुर्दैवानें 'होय' असें उत्तर देणें मला भाग आहे. खादीच्या काळापासून स्वदेशीवरील अधिकारी व्यक्ति मी समजला जात असल्यामुळें लोक पत्रांनीं माझ्या पुढें अनेक कोडीं ठेवीत असतात. म्हणून मला दोन प्रकारच्या स्वदेशींमधील भेद स्पष्ट करणें भाग झालें आहे. 'परदेशी भांडवल स्वदेशी भांडवलांत जर मिसळलेलें असलें, परदेशी बुद्धिकौशल्य जर स्वदेशी बुद्धिकौशल्याशीं मिसळलेलें असलें तर तो व्यवसाय स्वदेशी होईल काय ?' आणखीहि इतर प्रश्न आहेतच. पण परवां एका मंत्र्याला मीं जी व्याख्या सांगितली तीच मी येथें उद्धृत करतों:—"जी कोणतीहि वस्तु कोटचवधि लोकांच्या हिताच्या कामीं उपयोगीं पडते ती स्वदेशी समजावी, मग भांडवल व बुद्धि परकीय पण परिणामकारकपणें हिंदी नियंत्रणाखालीं असली तरी चालेल. या रीतीनें चर्खासंघाच्या व्याख्येची खादी, जरी तिचें सगळें भांडवल परक्यांचें असलें आणि जरी हिंदी बोर्डानें पाश्चात्य तज्ज्ञ कामाला लावलेले असले तरी, खरोखर स्वदेशी आहे. याच्या उलट बाटाचे रबरी किंवा इतर शू ( बूट ), जरी त्यांत काम करणारे सर्व मजूर हिंदी असले आणि भांडवल हिंदुस्थानकडून मिळविलेलें असलें तरी, परदेशीच म्हणावयाचे. हे कारखानदार दुहेरी रीतीनें परदेशी आहेत : कारण, कारखान्याची सत्ता परकीय

हातांत असणार आणि तयार झालेली वस्तु कितीहि स्वस्त असली तरी ती (कातडें रंगविणाऱ्या) खेडेगांवच्या ढोराला बव्हंशीं आणि खेडेगांवच्या चांभाराला सर्वस्वीं नेहमींच खाऊन टाकणार! बिहारच्या चांभाराला ही बाधक चढाओढ केव्हांच जाणवूं लागली आहे. बाटा शूमुळें युरोप बचावेल कदाचित्, पण तो म्हणजे आमच्या खेड्यांतील चांभाराचें व (कातडें रंगविणाऱ्या) ढोरांचें मरणच होय. मीं हीं दोन पटतील अशीं उदाहरणें दिलीं आहेत; दोन्ही अंशतः काल्पनिकच आहेत. चरखासंघाच्या बाबतींत भांडवल आणि बुद्धिकौशल्य यांसुद्धां सर्व स्वदेशांतीलच आहे. पण मला पाश्चात्यांची यंत्रकला जाणणारी बुद्धिमत्ता यासाठीं पाहिजे कीं ती आज चालू असलेल्या चरख्यांवर मात करून नवीन चरखा शोधून काढील. असें जरी असलें तरी हृदयाच्या गर्भांत मात्र मला असें वाटतें कीं, देशांतील लोकांनीं ज्या कांहीं सुधारणा चरख्यांत केल्या आहेत त्या मुळींच टाकाऊ नाहींत. पण हें विषयांतर झालें. मला निश्चित आशा आहे कीं, लोकांना मार्गदर्शन करणारे व त्यांची सेवा करणारे जे मंत्री व इतर कोणी असतील ते खऱ्या व खोट्या स्वदेशींमधला हा भेद जाणण्याची संवय अंगीं बाणून घेतील.*

* 'हरिजन', २५।२।१९३९ (सेवाग्राम, २०।२।३९.)

## घिप्पाड राक्षस आणि ठेंगू : : २६

[ खालीं छापलेलें श्री० वालचंद हिराचंद यांचें पत्र* वाचकांनीं अवश्य वाचावें. माझीं मतें बिनचूक मांडण्याच्या दृष्टीनें मूळ पत्रांत कांहीं सुधारणा केल्या आहेत. ]

१९ मार्च १९३१.

प्रिय महात्माजी,

मंगळवारीं तिसऱ्या प्रहरीं कित्येक उद्योगधंद्यांच्या प्रतिनिधींनीं आपली मुलाखत घेतली. त्या मुलाखतींत काय घडलें, यासंबंधींचे वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेले चुकीचे रिपोर्ट माझ्या दृष्टोत्पत्तीस आले आहेत, त्यांचीं कात्रणें यासोबत मी पाठवीत आहें. मुलाखतींत चर्चिलेले विषय मला अत्यंत महत्त्वाचे वाटत असल्यामुळें त्यांची बरोबर माहिती लोकांपुढें ठेवली जाणें अत्यंत अवश्य आहे असें मला वाटतें. आपण जें कांहीं बोललां, त्यांचा तें मला व माझ्या मित्रांना समजलें तदनुसार थोडक्यांत सारांश असा:—

"गोलमेज–परिषदेला कॉंग्रेसचे प्रतिनिधी हजर राहतील कीं नाहीं हें या क्षणीं सांगणं मला शक्य नाहीं. तरी पण तुम्हांला एवढी खात्री असूं द्या कीं, गोलमेज–परिषदेमध्यें 'हक्कांची समानता' म्हटली जाणारी जी मागणी केली गेली आहे तिच्याविरुद्ध असलेल्या तुमच्या विरोधाशीं कॉंग्रेस सहमत आहे.

---

* 'हक्कांची समानता'

"इतर देशांनीं कांहींहि केलेलें असो अथवा नसो, हिंदुस्थाननें आपल्या उद्योगधंद्यांचें रक्षण त्यांची वाढ करण्याच्या दृष्टीनें आपल्या हितसंबंधांना जास्तींत जास्त उपयुक्त असतील अशा उपाययोजना करण्याला कांहींच हरकत नाहीं.

"हिंदी हितसंबंधांना ज्या ज्या वेळीं आवश्यक वाटेल त्या त्या वेळीं राष्ट्रीय व राष्ट्रीयेतर असा भेद करण्याचा भावी हिंदी पार्लमेंटचा अधिकार अखंड व अबाधित राहील.

"ज्यांना रक्षणाची अवश्यकता आहे अशी अल्पसंख्य जमात म्हणून आपल्याला वागविलें जावें ही युरोपियनांची मागणी असमर्थनीय आहे.

"नेहरू-रिपोर्टांतील इतर भाग अग्राह्य समजल्यानंतर त्यांतून एकादा परिच्छेद उचलून तो आमच्या तोंडावर मारण्याचा कोणालाहि अधिकार नाहीं.

"या महत्त्वाच्या बाबीसंबंधीं तुम्हीं प्रचार चालवावा असा माझा तुम्हांला सल्ला आहे.

"नागरिकत्वाच्या व्याख्येसंबंधींच्या नेहरू-रिपोर्टांत आलेल्या परिच्छेदा-विषयीं सर तेजबहादुर सप्रू यांनीं जें निवेदन प्रसिद्ध केलें आहे म्हणतात त्यासंबंधीं बोलावयाचें तर तें, पंडित मोतीलाल नेहरू यांनीं असेंब्लीमध्यें त्याचा जो अर्थ विशद केला त्याच्यासह, त्याचप्रमाणें कलकत्ता येथें भरलेल्या सर्वपक्षीय परिषदेनें 'नागरिक' या शब्दाची व्याख्या करतांना जो निर्णय घेतला त्याच्याहि-सह, वाचलें जावें."

आपण आम्हांला जो सल्ला दिला त्याचा माझ्या मतानें हा वर उद्धृत केल्याप्रमाणें सारांश आहे. आपलें म्हणणें आम्हांला बरोबर समजलें आहे असें जर आपणांला वाटत असेल तर हें पत्र प्रसिद्ध करण्याची आपण मला कृपा करून परवानगी द्यावी.

आपला,

**वालचंद हिराचंद.**

पत्रांत ज्या चर्चेचा उल्लेख आहे ती चर्चा, 'हिंदुस्थानांत व्यापार करणारी ब्रिटिश जमात आणि ब्रिटिश फर्म्स व कंपन्या यांचे हक्क आणि हिंदुस्थानांत

जन्म पावलेल्या प्रजेचे हक्क यांच्यामध्यें भेद्भाव असूं नये' असें जें वरचेवर म्हटलें जातें, त्यांतून उद्‌भवली. ही भाषा बरीच निरुपद्रवी वाटते, पण तींत फार मोठा धोका लपलेला आहे.

आज परिस्थिति आहे ती अशी:—हिंदी मनुष्य हा आपल्याच देशांत ब्रिटिशांच्या दयेवर जगत आहे आणि ब्रिटिश मनुष्य येथें वरचढ झाला आहे. देशाच्या राज्यकारभारांत हिंदी मनुष्य हा सर्वसाधारणपणें निव्वळ खर्डेघाशा आहे. व्यापारांत जास्तींत जास्त म्हणजे तो इंग्रज कंपन्यांचा कमिशन-एजंट आहे. शेंकडा ५ टक्क्यांहून अधिक त्याला मिळत नाहीं, तर त्याच्या इंग्रज मुख्याला ९५ टक्के मिळकत होते. जीवनाच्या जवळजवळ प्रत्येक व्यवहारांत इंग्रज हा राज्यकर्त्यांच्या वर्गाचा असतो म्हणूनच केवळ, त्याला विशेष हक्क भोगावयास मिळतात. हिंदुस्थानच्या व्यापाराचा व उद्योगधंद्यांचा नाश करून त्याच्या जोरावर तो वर चढला आहे असें म्हटलें तर त्याला कोणाचा विरोध होण्याची भीति नाहीं किंवा त्यांत अतिशयोक्तीहि नाहीं. लँकेशायरची भरभराट व्हावी याकरितां हिंदुस्थानच्या गृहोद्योगांना ठार व्हावें लागलें. ब्रिटिशांचा जहाजांचा धंदा भरभराटावा याकरितां हिंदी जहाजांच्या धंद्याला नष्ट व्हावें लागलें! एका शब्दांत सांगावयाचें म्हणजे ब्रिटिशांना सिमल्याच्या उच्च स्थानीं राहावयास मिळावें याकरितां आम्हांला दडपून टाकण्यांत आलें! 'आमची वाढ खुंटली आहे' असें गोखले म्हणत तो कांहीं निव्वळ भाषालंकार नव्हता. तेव्हां हिंदी हितसंबंध व इंग्रजांचे किंवा युरोपियनांचे हितसंबंध यांत भेद्भाव असूं नये असें बोलणें म्हणजे हिंदुस्थानची गुलामगिरी चालूंच ठेवणं आहे. एखादा राक्षस आणि एखादा ठेंगू यांच्यामध्यें हक्कांची समानता कसची? असमान असणाऱ्या दोघांत समानता आणण्याचा विचार करण्यापूर्वी अगोदर ठेंगू मनुष्याला राक्षसाच्या उंचीचा केला पाहिजे. आणि ज्याअर्थी खालच्या मैदानावर राहणाऱ्या कोट्यवधि लोकांना उचलून सिमल्याच्या उंचीवर ठेवतां येत नाहीं, त्याअर्थी त्या उंचीवर सुरक्षित बसलेल्यांना खालीं मैदानावर उतरलें पाहिजे, हें सरळच येतें. ही क्रिया कदाचित् कठोर वाटेल; पण जर मैदानावरच्या कोट्यवधि

लोकांना विशेष हक्क असणाऱ्यांच्या बरोबरीचें व्हावयाचें असेल तर ती क्रिया अपरिहार्य आहे.

म्हणून समानतेच्या दर्जाला पोंचण्यापूर्वी आम्हांला सम पातळी करण्याच्या क्रियेमधून पसार झाल्यावांचून गत्यंतर नाहीं असें वाटतें. न्याय व्हावयाचा तर तेंच अवश्य आहे. या क्रियेला वर्णविषयक भेदभावाचें नांव देणें चुकीचें होईल. तसा कांहींच प्रश्न नाहीं. आपली विशेष हक्काची भूमिका सोडून जर ब्रिटिश आमच्याच सारखे होतील तर आमच्या देशांत प्रत्येक ब्रिटिश स्त्री, पुरुष व मूल यांना पुरेसें स्थान आहे. मग त्यांना राष्ट्राची सद्भावना मिळविण्याकरितां त्यांच्या हांकेला तत्काळ ओ देणारी ब्रिटिश फौज व शहरांची शक्ति यांचा बदला करावा लागेल; आमची सद्भावना हेंच जास्तींत जास्त प्रामाणिक संरक्षण आम्ही त्यांना देऊं शकतों आणि तेंच आम्हां दोघांनाहि अनंत पटींनीं चांगलें व प्रतिष्ठितपणाचें आहे असें म्हणण्याचें धाडस मी करतों. क्रिया चालू असतांना सर्वत्र भेदभावाचा भास होईल. पण ज्यांना आजची भूमिका अन्यायाची व कृत्रिम आहे हें पटतें त्यांना तसें भासण्याचें कारणच नाहीं. या मागणींत वर्ण-विषयक भेदभाव नाहीं हें दर्शविण्याकरितां आम्ही एवढेंच सांगतों कीं, ज्या हिंदी लोकांनीं आपल्या ब्रिटिश आश्रयदात्यांच्या मागें लपून सुरक्षित जागा व्यापल्या आहेत. त्यांनीं सुद्धां मैदानावरील आपल्या भाईबंदांच्या पातळीवर उतरावें अशी अपेक्षा त्यांच्याहि बाबतींत केली जाईल. म्हणून खरी भाषा अशी असली पाहिजे कीं आज अस्तित्वांत असलेल्या अनैसर्गिक असमानता काढून टाकण्याकरितां राज्यकर्त्या वर्गाचे आणि त्याच्या हाताला हात मिळवून राहणाऱ्या इतरांचेहि विशेषाधिकार सर्व वर्ग व जमाती समसमान होण्याइतपत कमी केले जातील.

आमच्या बाजूनें सांगावयाचें तर ब्रिटिशांचें जीवित आणि त्यांची प्रतिष्ठा आमच्या जीवित–प्रतिष्ठांइतकींच पवित्र मानून त्यांचें संरक्षण करण्यांत आपली अब्रू आहे असें आपण समजलें पाहिजे. याचा अर्थ ब्रिटिशांच्या व्यापाराचा किंवा इतर हितसंबंधांचा नाश असा नाहीं व तसा करण्याचें कारणहि नाहीं. जे येथील रहिवासी झाले, त्यांनीं आपलें शिस्तीचें जीवन, कमाविलेली बुद्धिमत्ता,

अतिशय उद्योगीपणा आणि संघटना करण्याची शक्ति यांवर अवलंबून आपल्या श्रमानें खुशाल पैसा तसाच मानमरातब मिळवावा आणि त्याचबरोबर आपल्या म्हटलेल्या देशाची आपल्या स्वतःच्या मातृभूमीवरच्या इतक्याच एकनिष्ठेनें सेवा करावी.

ब्रिटिशांचा व्यापार हिंदुस्थानच्या हितसंबंधांना बाधक नसेल तर त्याला पक्षपाताच्या भूमिकेवरहि ठेवतां येईल, पण केव्हां ? जेव्हां त्यांच्याशीं सन्मान्य सहकारित्वाच्या स्थितीला आम्ही पोंचूं तेव्हां. आणि हिंदुस्थान आंतल्या तशाच बाहेरच्या पिळणुकीपासून एकदां मुक्त झाला म्हणजे त्याची भरभराट नवल वाटेल इतक्या झपाट्यानें होणें अपरिहार्य आहे. वाढत्या उत्कर्षाबरोबर त्याच्या गरजा वाढणारच. गरजा वाढल्या कीं त्याबरोबर त्याचा आयात व्यापारहि वाढणारच. त्या वेळीं जर ब्रिटन हें आपलें भागीदार किंवा दोस्त राष्ट्र असेल तर हिंदुस्थानच्या गरजा पुरविण्याचें काम प्रामुख्यानें त्याच्याकडून व्हावयाला कांहींच हरकत नाहीं.

हें माझें स्वप्न प्रत्यक्षांत आलें तर मला आनंद होईल. तें प्रत्यक्ष व्हावें याकरितां होणाऱ्या तडजोडींत मीं भाग घेतलेला आहे. हें साध्य मिळविण्याला हिंदुस्थान समर्थ बनावा याकरितां प्रत्येक इंग्रजाची मदत मी मागत आहें. 'पूर्ण स्वराज्या'ची माझी कल्पना तुटकपणाच्या स्वातंत्र्याची नसून हितकर व गौरवशाली स्वातंत्र्याची आहे. माझा राष्ट्रवाद जरी प्रखर असला तरी इतरांचा समावेश न करून घेणारा तो नाहीं, किंवा कोणत्याहि राष्ट्राला वा व्यक्तीला बाधा पोंचविण्यासाठीं तो योजलेला नाहीं कायद्याचे सिद्धान्त हे कायद्यापेक्षां नीतीलाच अधिक धरून असतात. 'तुझ्या मालमत्तेचा उपभोग तुझ्या शेजाऱ्याला बाधा न पोंचेल अशा रीतीनें घे' या सिद्धांतांतील शाश्वत सत्यावर माझी श्रद्धा आहे.*

---

* 'यंग इंडिया', २६–३–१९३१.

## विदेशी वि० स्वदेशी : : २७

प्र०—कापडाव्यतिरिक्त इतर माल परदेशाहून हिंदुस्थानांत आणण्याच्या बाबतींत आपलें काय मत आहे ? आपल्या दृष्टीनें ताबडतोब बंदी केली पाहिजे अशा कांहीं विदेशी वस्तू आहेत काय ? भविष्य काळांत हिंदुस्थानच्या विदेशी व्यापाराचें स्वरूप काय असावें असें आपणांला वाटतें ?

उ०—कापडाव्यातिरिक्त इतर विदेशी वस्तंच्या व्यापाराच्या बाबतींत मी जवळजवळ उदासीन आहें. विदेशी म्हणून जी जी वस्तु असेल तिला ती विदेशी म्हणूनच बंदी करावी याचा पुरस्कार मीं कधींहि केलेला नाहीं. ज्या विदेशी वस्तूंमुळें आमच्या देशाच्या हितसंबंधांना बाधा पोंचण्याजोगा आहे अशा सर्व वस्तूंच्या बाबतींत संपूर्ण बहिष्कार हें माझें आर्थिक तत्त्व आहे. याचा अर्थ असा कीं, जी वस्तु योग्य रीतीनें देशांतल्या देशांत पुरविली जाण्याजोगी असेल अशी वस्तु कोणत्याहि परिस्थितींत आपण बाहेर देशांहून आणूं नये. उदाहरणार्थ, ऑस्ट्रेलियाचा गहूं अधिक चांगला असतो एवढ्याचकरितां तो आणाविणें मी पाप समजेन; पण स्कॉटलंडच्या ओटमाल धान्याची अत्यंत अवश्यकता आहे असें झालें तर तें आणविण्याला मी यत्किंचित्हि मागेंपुढें पाहणार नाहीं. कारण, तें आपल्याकडे होतच नाहीं. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें तर, कोणत्याहि विदेशी वस्तूच्या बहिष्काराला मी पापबुद्धीनें किंवा द्वेषभावनेनें उत्तेजन देणार नाहीं. किंवा उलटें उदाहरण घ्यावयाचें झालें तर, हिंदुस्थानांत

कातड्याची निर्मिति मोठ्या प्रमाणांत होते म्हणून, हिंदुस्थानच्या कातड्याचेच बूट वापरणें हें माझें कर्तव्य आहे; विदेशी कातडें स्वस्त व अधिक उंची दिसतें, त्या मानानें आपलें कातडें जरी अधिक महाग व हलक्या दर्जाचें असलें तरी काय झालें? त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत जर आम्हांला जरूर तेवढी काकवी निर्माण होत असेल तर विदेशी काकवी येथें आणणें मी निषेधार्ह समजेन. यावरून हें स्पष्ट होईल कीं, ज्या हिंदुस्थानांत आणावयाला बंदी केली पाहिजे अशा विदेशी वस्तूंची संपूर्ण यादी देणें मला जवळ जवळ अशक्य आहे. सर्व बाबतींत ज्या तत्त्वानें आपणांला चालतां येईल असें सर्वसामान्य तत्त्वच फक्त मीं आग्रहपूर्वक प्रतिपादिलें आहे. आणि आपल्या देशांतील उत्पादनाची परिस्थिति आज आहे तशीच राहील तोंवर हेंच तत्त्व भविष्य काळींहि सर्वांना लागू होईल.*

*'यंग इंडिया', १५।११।१९२८.

## खादी आणि स्वदेशी : : २८

आम्हीं खादी अंगीकारिली तेव्हां आतां स्वदेशीचा पूर्ण संदेश आम्हीं पाळला, असा विचार पुष्कळ वेळां आमच्या मनांत येतो. खादी वापरली म्हणजे हिंदुस्थानची नसलेली कोणतीहि इतर वस्तु वापरण्याला आणि पॅरिसच्या नवीन-नवीन फॅशन्स अंमलांत आणण्याला आपणांला मोकळीक झाली असें आपण समजतों. ही स्वदेशीची थट्टा आहे. हें खादीचा संदेश अवमानणें आहे. खादी वापरणें हें हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें त्रिकालाबाधित कर्तव्य आहे, तसेंच व तितकेंच जेथें आपणांला हिंदुस्थानांत तयार झालेल्या वस्तू मिळणें शक्य आहे तेथें त्या वापरणें हेंहि आपलें त्रिकालाबाधित कर्तव्य आहे, मग विदेशी त्या वस्तूंहून त्या कमी प्रतीच्या असल्या तरी चालतील. अशा किती तरी स्वदेशी वस्तू बाजारांत येतात कीं, आश्रयाभावीं त्या कायमच्या नष्ट होण्याचा धोका आहे. त्या अगदीं जशा पाहिजेत तशाच नसतील, तरीहि त्या वापरल्या पाहिजेत आणि त्यांत सुधारणा होण्याजोग्या असतील. तर तयार करणाऱ्यांना त्यांत सुधारणा करावयाला लावलें पाहिजे, हें आपलें काम आहे. उत्तम असेल तें, किंवा स्वस्तांत स्वस्त असेल तें घ्यावें हा नियम नेहमींच खरा नसतो. दुसऱ्या देशाची हवा अधिक चांगली म्हणून कांहीं आपण जसा आपला देश टाकीत नाहीं, तर तो सुधारण्याचा प्रयत्न करतों, त्याचप्रमाणें अधिक चांगल्या व स्वस्त वस्तूंकरितां आपण स्वदेशी वस्तूंचा त्याग करतां कामा नये. आपली बायको सर्वसाधारण रूपाची आहे याचें

असमाधान वाटून दुसऱ्या सुरेख दिसणाऱ्या बाईचा शोध करीत फिरणारा नवरा जसा आपल्या पत्नीशीं बेइमानी म्हणावयाचा, त्याचप्रमाणें देशांत तयार झालेल्या वस्तू टाकून देऊन अधिक चांगल्या म्हणून विदेशी वस्तू घेणारा मनुष्य आपल्या देशाशीं बेइमानच समजावयाचा. देशाच्या रहिवाशांनीं आपल्या देशांतील वस्तूंना अधिक पसंती दिली पाहिजे ही गोष्ट प्रत्येक देशाच्या प्रगतीला अवश्यक आहे.*

* 'यंग इंडिया', ३०-५-१९२९.

## कांहीं प्रश्न

: : २९

प्र०—यंत्रें हीं मानवी प्रगतीच्या नरडीला नख लावणारीं आहेत असें आपण म्हणतां. मग आपण स्वतः रेल्वेमधून व मोटारगाडींतून प्रवास कसा करूं शकतां ?

उ०—अशा कांहीं गोष्टी आहेत कीं, त्या तुम्हीं टाळूं म्हणत असलां तरी एकदम एकाएकीं त्यांतून तुम्हांला सुटतां येत नाहीं. ज्या या पार्थिव पिंजऱ्यांत मी बंदिस्त झालेला आहें तो माझ्या जीवनाच्या हानीचें मूळ आहे, तथापि तो मला चालवून घ्यावा लागतो, नव्हे, त्याचें कोडहि मला पुरवावे लागतात हें या मित्राला माहीत आहे. पण गेल्या महायुद्धामध्यें जी संघटित कत्तल झाली तिला कारण यंत्रयुग आहे, याविषयीं पृच्छकाला खरोखर शंका आहे काय ? गुदमरून टाकणारा वायु किंवा अशाच अघोर गोष्टी यांनीं आम्ही एक इंचहि पुढें गेलेलो नाहीं.

प्र०—माणसानें सर्वांत उत्तम व सर्वांत स्वस्त मिळेल ती वस्तु खरीदावी हा अर्थव्यवहारांतील कायदा चुकीचा आहे काय ?

उ०—आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनीं जे कांहीं अत्यंत निर्घृण सिद्धान्त घालून दिले आहेत त्यांपैकीं हा एक आहे. माणसांमाणसांमधील आपल्या संबंधांवर असल्या कसल्याहि अधम विचारांचें नियंत्रणहि आपण कधीं ठेवीत

नाहीं. इंग्रज मनुष्य कोळशाच्या खाणींतील इंग्रज मजुराला स्वस्त मिळणाऱ्या—उदाहरणार्थ—हिंदी मजुरापेक्षां अधिक मजुरी देतो आणि तें बरोबरहि आहे. इंग्लंडांत जर कोणी स्वस्त दरानें मजूर आणूं लागला तर क्रांति होईल. मला अधिक कार्यकुशल नोकर स्वस्तांत मिळतो आणि तो माझ्या आजच्या नोकरा इतकाच इमानीहि आहे, असें असलें तरी आजचा माझा नोकर जास्त पगार घेतो म्हणूनच मीं त्याला सोडून देणें हें माझें पापकृत्य होईल. ज्या अर्थशास्त्रांत नीतीची आणि भावनांची कदर केली जात नाहीं तें मेणाच्या बाहुलीसारखें आहे; मेणाच्या बाहुल्या अगदीं जिवंत माणसांसारख्या दिसतात; पण त्यांत खऱ्या जिवंत शरीरांतील चैतन्य असत नाहीं. आणीबाणीच्या अशा प्रत्येक वेळीं, हे नवे नवे बनविलेले आर्थिक कायदे अंमलांत आणतांना कोलमडून पडतात; आणि जीं राष्ट्रें किंवा ज्या व्यक्ति या कायद्यांचा मार्गदर्शक सिद्धांत म्हणून स्वीकार करतात त्यांना मरणें भाग पडतें. धार्मिक विधिपूर्वक तयार केलेल्या अन्नाला एकादा मुसलमान अधिक पैसे देईल किंवा एकादा हिंदु जें अन्न अगदीं शास्त्रपूत नसेल ते घेण्याचें नाकारील. या त्यांच्या आत्मत्यागामध्यें कांहीं ना कांहीं थोरपणा आहे. इंग्लंड–जपानच्या स्वस्त बाजारांत जेव्हां आम्ही आमचा कपडा खरेदी करूं लागलों तेव्हां आम्ही भ्रष्ट झालों. आमच्या शेजारच्या भाई-बंदांनीं आपल्या झोंपड्यांत तयार केलेला कपडा आमच्यासाठीं खरेदी करण्याची धार्मिक अवश्यकता जेव्हां आम्हांला पटेल तेव्हांच आम्ही पुनः सजीव होऊं.*

---

* 'यंग इंडिया', २०–१०–१९२१.

## फक्त खादीच कां ? : : ३०

प्रो. कुमारप्पा यांची माझ्या बाबतींत अशी कुरकूर आहे कीं, जरी मी अ. भा. ग्रामोद्योगसंघाचा उत्पादक आणि मार्गदर्शक असलों तरी मी त्याला सावत्र मुलाप्रमाणें वागवीत असल्यासारखा वाटतों. ही कुरकूर उथळ युक्तिवादामुळें उत्पन्न झालेली आहे, असा उलट टोमणा मीं मारला आहे. ते हार पत्करणार नाहींत, प्रतिकार करतील. आपला आरोप त्यांनीं पुनः पुनः घोळला आहे आणि इतर ग्रामोद्योग हे खादीच्या बरोबरीचे आहेत असें मी जगाला जाहीर करीपर्यंत आपणाला समाधान होणार नाहीं असें ते म्हणतात. माझ्या दृष्टीनें हें विधान इतकें उघड आहे कीं, त्याचा उच्चार शिकविण्याची गरजच नाहीं; पण तें प्रत्यक्ष लागू होण्याच्या दृष्टीनें प्रो० कुमारप्पा म्हणतात तें बरोबर आहे. कारण लोक सिद्धांतानें चालत नाहींत. कित्येक लोकांनीं माझ्याकडे नुकतीच तक्रार केली आहे कीं, आपल्याला अशीं माणसें माहीत आहेत कीं जीं खादी वापरतात, पण इतर ग्रामीण वस्तू मुळींच वापरीत नाहींत. ते म्हणतात कीं, पुष्कळ कॉंग्रेसवाले खादी वापरतात ती कॉंग्रेस–घटनेनें अवश्यक केली आहे म्हणून; पण त्यांचा तिच्यावर विश्वास नसल्यामुळें आपल्या वापरांतील इतर वस्तूंच्या बाबतींत आपल्या सोयीव्यतिरिक्त कसलाहि विचार ते करीत नाहींत. यालाच मीं 'अक्षर घेतलें आणि तत्त्व मारलें म्हणतों आणि जेथें तत्त्व मारलें तेथें प्राण निघून गेलेल्या शरीराचा. जितका उपयोग तितकाच अक्षर'

मी नेहमीं म्हणतों कीं खादी हा सूर्य आहे आणि त्याच्याभोंवतीं इतर ग्रामोद्योग ग्रहांप्रमाणें फिरतात; त्यांना स्वतंत्र अस्तित्व नाहीं. तद्वत्‌च खादी सुद्धां या दुसऱ्या उद्योगावांचून जगणार नाहीं. दोन्ही सर्वस्वीं परस्परावलंबी आहेत. खरी गोष्ट अशी आहे कीं, हिंदुस्थानाइतक्याच प्राचीन असणाऱ्या खेड्यांचा हिंदुस्थान आणि परकीय सत्तेमुळें उत्पन्न झालेल्या शहरांचा बनलेला हिंदुस्थान या दोहोंत आपणांला निवड करावयाची आहे. आज शहरें खेड्यांवर वर्चस्व गाजवून त्यांचें शोषण करीत आहेत, त्यामुळें तीं मोडकळीस येऊन नष्ट होण्याच्या मार्गांत आहेत. माझी खादी–मनोवृत्ति मला सांगते कीं हें वर्चस्व जाईल तेव्हां शहरांनीं खेड्यांच्या उपयोगीं पडलें पाहिजे. खेड्यांची पिळणूक हीच मुळीं संघटित हिंसा आहे. जर आपल्या अहिंसेवर स्वराज्याची उभारणी करावयाची असेल, तर आपल्या खेड्यांना त्यांचें योग्य स्थान द्यावें लागेल. पण शहरांतील विदेशी वा स्वदेशी कारखान्यांत निर्माण झालेल्या वस्तूंऐवजीं ग्रामोद्योगांच्या वस्तू वापरून जर आपण त्यांचें पुनरुज्जीवन केलें नाहीं, तर खेड्यांना त्यांचें योग्य स्थान आपल्या हातून कधींहि मिळणार नाहीं. मी खादी आणि अहिंसा हीं एकरूप आहेत असें कां म्हणतों याचा आतां कदाचित् उलगडा झाला असेल. खादी हा मुख्य हस्तव्यवसाय आहे. तुम्हीं खादी मारली कीं तिच्याबरोबर खेडीं आणि त्याबरोबरच अहिंसाहि तुम्हीं मारलीच म्हणून समजावें. हें मला आंकडेशास्त्रानें सिद्ध करतां येणार नाहीं पण धडधडीत आपल्या डोळ्यांपुढें मात्र सिद्ध होत आहे.*

---

* सेवाग्राम, १४–१–४०, 'हरिजन', २०–१–१९४०.

## “मी यंत्रांविरुद्ध नाहीं” : : ३१

[ शांतिनिकेतनचे एक विद्यार्थी श्री० रामचंद्रन् आणि गांधीजी यांच्या संभाषणांतून. ]

रामचंद्रन्—आपण सर्व यंत्रांच्या विरुद्ध आहां काय ?

गांधीजी—हें शरीर सुद्धां अत्यंत नाजूक असें एक प्रकारचें यंत्रच आहे हें माहीत असतां मी तसा विरुद्ध कसा बरें असेन ? खुद्द चरखा हें सुद्धां एक यंत्रच आहे; दांतकोरणेंहि यंत्रच आहे. माझा विरोध आहे तो यंत्रसामुग्रीला असा मुळींच नाहीं, तर तिच्यासंबंधीं जी एक हांव उत्पन्न झाली आहे तिला आहे. हांव आहे ती ‘ श्रमाची बचत करणारी ’ असें जिला म्हणतात त्या यंत्रसामुग्री बद्दल. माणसें श्रमाची इतकी बचत करीत जातात, कीं हजारों लोक बेकार बनतात आणि निराधार होऊन उपाशीं मरतात. मला वेळेची आणि श्रमाची बचत करावयाची आहे, पण ती कांहीं थोड्या लोकांकरितां नसून सर्वांकरितां करावयाची आहे. संपत्तीचें केंद्रीकरण मला थोड्या लोकांच्या हातीं व्हावयाला नको आहे, सर्वांच्या हातीं व्हावयाला पाहिजे आहे. आज यंत्रें कांहीं थोड्यांना कोट्यवधि लोकांच्या पाठींवर स्वार व्हावयाला मदत करीत आहेत. या सर्वांमागची प्रेरणा माणसांचे कष्ट वांचवावे अशी, भूतदयेची नसुन लोभाची आहे. अशा तऱ्हेच्या वस्तुस्थितीशीं माझी सर्व शक्ति खर्च करून मी टक्कर देत आहें.

राम०—मग आपण यंत्रांच्या विरुद्ध लढत आहां असें नव्हे, तर आज जो त्यांचा दुरुपयोग चाललेला दिसतो त्याच्या विरुद्ध लढत आहां; होय ना ?

गां०—मागेंपुढें न करतां मी याला एकदम 'होय' असें उत्तर देईन, पण त्याला मला अशी एक पुस्ती जोडावयाची आहे कीं, वैज्ञानिक सत्यें आणि शोध हे निव्वळ लोभ पुरविण्याचीं साधनें बनले आहेत तें प्रथम थांबलें पाहिजे. म्हणजे मग मजुरांकडून वाजवीपेक्षां फाजील काम करून घेतलें जाणार नाहीं आणि यंत्रें बाधारूप न होतां साह्यरूप होतील. माझें ध्येय यंत्र मात्र काढून टाकणें हें नसून त्याला मर्यादा घालणें हें आहे.

राम०—तर्कशुद्ध रीतीनें विचार करीत गेलें म्हणजे यांतून असेंच निष्पन्न होतें कीं, मोठ्या शक्तीवर चालणारीं गुंतागुंतीचीं सर्व यंत्रें नाहींशीं झालीं पाहिजेत.

गां०—तीं नाहींशीं व्हावीं लागतील. पण एक गोष्ट मी स्पष्ट करतों. मनुष्य ही प्रधान वस्तु समजली पाहिजे. मनुष्याचे अवयव खुरटे करण्याची यंत्राची प्रवृत्ति असूं नये. उदाहरणार्थ, मी बुद्धीला पटण्याजोगे अपवाद सांगतों. सिंगरचें शिवण्याचें यंत्र घ्या. आजपर्यंत शोधलेल्या कांहीं थोड्या उपयुक्त वस्तूंपैकीं तें एक आहे आणि खुद्द त्याच्या रचनेमागें एक रम्य घटना आहे. आपली बायको हातांनीं शिवण्याचें आणि दंड घालण्याचें कंटाळवाणें काम पुष्कळ वेळ करीत बसलेली सिंगरनें पाहिली, तेव्हां तिच्यावरील प्रेमामुळें त्यानें शिवणयंत्र तयार केलें. हेतु हा कीं तिला निष्कारण पडणारे श्रम वांचावे. पण त्यानें फक्त आपल्या बायकोचेंच कष्ट वांचविले नाहींत, तर जो कोणी तें यंत्र खरेदी करूं शकतो त्या प्रत्येकाचे कष्ट त्यानें वांचविले.

राम०—पण तसें असलें तरी हीं सिंगरचीं शिवण-यंत्रें तयार करण्याला सुद्धां एक कारखाना काढावाच लागेल आणि त्या कारखान्यांत मोठ्या शक्तीवर चालणारीं नेहमींचीं यंत्रें ठेवावींच लागतील.

गां०—होय, पण असे कारखाने राष्ट्राच्या मालकीचे करावे किंवा सरकारच्या नियंत्रणाखालीं ठेवावे असें म्हणण्याइतका समाजवादी मी आहें. हे कारखान अत्यंत आकर्षण करण्याजोग्या आदर्श परिस्थितींत चालले पाहि-

जेत; ते नफा काढण्याच्या दृष्टीनें नव्हे तर मानवसमाजाच्या हिताच्या दृष्टीनें चालले पाहिजेत. त्यांचा हेतु लोभ नसून प्रेम हा असला पाहिजे. मजुरांच्या परिस्थितींत बदल घडून आला पाहिजे ही गोष्ट मला पाहिजे आहे. संपत्तीच्या मागें पिसाटासारखें धांवणें बंद झालें पाहिजे, आणि मजुरांना केवळ जीवनवेतनाचीच नव्हे तर जें काम रोज मिळेल तें तेंच तेंच कंटाळवाणें मिळणार नाहीं याचीहि खात्री असली पाहिजे. अशी स्थिति झाली म्हणजे यंत्र हें त्यावर काम करण्यालाच मदत करील असें नव्हे, तर तें राज्यसंस्थेला व यंत्राच्या मालकालाहि मदत करील. आज जी माथेफिरू धांवाधांव चालली आहे ती थांबेल आणि ( मीं म्हटल्याप्रमाणें ) मजुराला काम करण्याचें आकर्षण वाटण्यासारखी आदर्श परिस्थिति निर्माण होईल. माझ्या मनांत असलेल्या अनेक अपवादांपैकीं हा फक्त एक आहे. शिवणयंत्र निघण्याच्या मागें प्रेमभावना होती. व्यक्तीच्या भोंवतींच सर्व कांहीं गुंफावयाचें व्यक्तीचे. कष्ट वांचविणें हा उद्देश असावा, आणि लोभ नव्हे तर प्रामाणिक मानव प्रेम हे प्रेरक बुद्धि असावी. अशा प्रकारें उदाहरण म्हणून, वांकड्या चाती सरळ करण्याचें यंत्र मी केव्हांहि पाहिजे म्हणेन. तें यंत्र निघालें म्हणून कांहीं लोहार चात्या करण्याचें काम थांबविणार नाहींत; पण चाती जेव्हां चांगली चालेनाशी होईल तेव्हां ती सरळ करण्याकरितां प्रत्येक कांतणाऱ्याजवळ असलें एकेक यंत्र असेल. म्हणून, लोभाची जागा प्रेमाला द्या कीं सर्व गोष्टी बरोबर होऊन जातील.*

* 'यंग इंडिया', १३-११-१९२४.

नगर वाचनालय
ता. ........
सातारा.

## यंत्र–पद्धति

: : ३२

एका पत्रलेखकानें, यंत्र–पद्धति ही ज्ञानयुक्त व हाताची अडाणीपणाची असें म्हटलें आहे, तें वादग्रस्त सिद्धांताची सत्यता गृहित धरूनच तो सिद्ध करण्यासारखें आहे. हस्तोद्योगाच्या जागीं यंत्रोद्योग हा प्रत्येक बाबतींत वरदान आहे हें अजून सिद्ध झालेलें नाहीं किंवा जें सोपें आहे तें जें कठिण आहे त्याहून अधिक चांगलें हेंहि खरें नाहीं. होणारा प्रत्येक बदल म्हणजे वरदान आहे किंवा जुनें असेल तें सारेंच त्याज्य आहे हेंहि अजून सिद्ध केलें गेलेलें नाहीं. कोटयवधि बेकार हातांनीं जें सहज करतां येण्यासारखें असेल तेंच यंत्रानें करणें ही पद्धति बाधक आहे असें माझें मत आहे. एकोणीसशें मैल लांब आणि पंधराशें मैल रुंद इतकें विस्तृत क्षेत्र व्यापणाऱ्या हिंदुस्थानच्या सात लाख खेड्यांत पसरलेल्या कोटयवधि लोकांनीं आपल्या घरच्या भाकरीप्रमाणेंच आपला कपडाहि आपल्याच गांवांत तयार करावा हेंच केव्हांहि कल्याणाचें व सुरक्षिततेचें आहे. जीवनाच्या प्राथमिक गरजांचें उत्पादन जर या खेड्यांच्या हातीं राहिलें नाहीं तर त्यांनीं अनादि काळापासून उपभोगलेलें स्वातंत्र्य त्यांना टिकवितां येणार नाहीं. पाश्चात्य परिस्थितीवरून पाश्चात्य निरीक्षक उतावीळपणें असा वितंडवाद करतात कीं जें त्यांच्या बाबतींत सत्य असेल तें हिंदुस्थानच्या बाबतींतहि सत्य असलेंच पाहिजे. पण हिंदुस्थानची परिस्थिति भौतिक बाबतींत त्यांच्याहून किती तरी भिन्न आहे. बदलत्या परिस्थितीप्रमाणें अर्थशास्त्राच्या कायद्यांची बजावणीहि बदलली पाहिजे.

यंत्रपद्धति सोपी आहे खरी. पण म्हणूनच कांहीं ती वरदानरूप असलीच पाहिजे असें नाहीं. एकाद्या जागीं घसरणें हें सोपें आहे; पण धोक्याचेंहि आहे. हाताच्या कामाची पद्धति ही निदान या बाबतींत तरी वरदान आहे, कारण ती अवघड आहे. यंत्रपद्धतीची हांव जर अशीच राहिली तर एक वेळ अशी येईल कीं तेव्हां आपण इतके दुर्बल आणि असमर्थ बनूं कीं ईश्वरानें जीं जिवंत यंत्रें आपणांला दिलीं आहेत त्यांचा उपयोग आपण विसरून गेलों याबद्दल आम्ही स्वतःलाच शिव्याशाप देऊं, असा फार मोठा संभव आहे. खेळ किंवा कुस्त्या खेळून कांहीं कोट्यावधि लोक आपली तंदुरुस्ती टेवूं शकत नाहींत. आणि त्यांनीं उपयुक्त, उत्पादक कष्टाचे व्यवसाय टाकून देऊन त्यांच्याऐवजी निरुपयोगी, अनुत्पादक आणि खर्चाळ असे खेळ आणि व्यायाम कां म्हणून पत्करावे ? आज बदल आणि करमणूक म्हणून ते ठीक आहेत. पण ज्या अन्नाच्या उत्पादनांत आपला हात किंवा हिस्सा नाहीं तें अन्न खाण्याकरितां भूक लागावी म्हणून जेव्हां हे खेळ अवश्यक व्यवसाय होऊन बसतील तेव्हां ते आपणांला त्रासदायक वाटूं लागतील.

शेवटीं, जुनें तें वाईट या समजुतीला मी आपला पाठिंबा देऊं शकत नाहीं. सत्य हें पुरातन व अवघड आहे. असत्याला आकर्षणें फार असतात. तथापि त्या अत्यंत पुरातन सत्ययुगाकडे परत जाण्याला मला आनंद वाटेल. पांढऱ्याफटक पावापेक्षां जुन्या पद्धतीची साधी मळकट दिसणारी भाकरीच केव्हांहि चांगली; कारण पांढरा करण्याच्या निरनिराळ्या क्रियांमधून जात असतांना त्याच्यांतील पौष्टिकपणा बराचसा नष्ट झालेला असतो. जुन्या तरी पण चांगल्या वस्तूंची यादी अशा रीतीनें बरीच वाढवितां येईल. चर्खा ही अशीच एक वस्तु, निदान हिंदुस्थानाकरितां तरी, आहे.

हिंदुस्थान जेव्हां स्वावलंबी, स्वयंपूर्ण व मोहांना आणि पिळणुकीला दाद न देणारा होईल तेव्हां तो पश्चिमेच्या किंवा पूर्वेच्या कोणत्याहि बलाढ्य राष्ट्राच्या गृध्रदृष्टीचें खाद्य म्हणून राहणार नाहीं आणि मग खर्चाळ सैन्याचा बोजा डोक्यावर न वाहावा लागतां त्याला सुरक्षितता वाटूं लागेल. त्याची अंतर्गत व्यवस्था हीच परचक्राला थोपवून धरणारी त्याची अत्यंत मजबूत अशी तटबंदी होईल.*

* यंग इंडिया, २–७–१९३१.

## कारखानदारी

: : ३३

"हिंदुस्थानच्या औद्योगीकरणाविषयीं तुमचें मत काय आहे ?"

"आद्योगीकरण किंवा कारखानदारी ही मानवसमाजाला शापरूप होणार आहे, असें मला वाटतें. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राला लुबाडणें सर्व काळ चालूं शकणार नाहीं. कारखानदारी–ही लुबाडण्याची तुमची ताकद, परदेशांतलि तुम्हांला खुल्या असलेल्या बाजारपेठा आणि प्रतिस्पर्ध्यांचा अभाव यांवर सर्वस्वीं अवलंबून आहे. या महत्त्वाच्या गोष्टी इंग्लंडच्या बाबतींत रोज कमी कमी होत चालल्या आहेत; म्हणूनच इंग्लंडमधील बेकारांची संख्या रोजच्या रोज वाढत आहे. हिंदुस्थाननें घातलेला बहिष्कार हा माशीचा केवळ एक दंश म्हणावयाचा. ही जर इंग्लंडची अवस्था, तर हिंदुस्थानसारख्या प्रचंड देशाचा कारखानदारीमुळें फायदा होईल असें कसें म्हणावयाचें ? खरोखरच हिंदुस्थान जेव्हां इतर देशांना लुबाडूं लागेल ( आणि कारखानदारीचा देश तो झाला तर त्याशिवाय चालणारच नाहीं ) तेव्हां इतर देशांना तो एक शाप होईल, जगाला तो एक धाक होईल. आणि इतर देशांची लुबाडणूक करण्यासाठीं हिंदुस्थानचें औद्योगिकरण करण्याचा विचार तरी मीं कां करावा ? आम्हांला आमच्या तीस कोटी बेकारांसाठीं काम काढतां येतें, पण इंग्लंडला आपल्या तीस लक्ष लोकांकरितां तें काढतां येत नाहीं आणि इंग्लंडच्या मोठमोठ्या बुद्धिमंतांची अक्कल गुंग करून टाकणारा हा बिकट प्रश्न त्यांच्यापुढें उभा आहे, ही आपत्ति तुम्हांला दिसत नाहीं

काय ? कारखानदारीचें भवितव्य अंधकारमय आहे. अमेरिका, जपान, फ्रान्स आणि जर्मनी हे देश इंग्लंडचे जबरदस्त प्रतिस्पर्धी आहेत.* हिंदुस्थानांतील मूठभर गिरण्या त्याच्याशीं चढाओढीला बसल्या आहेत आणि हिंदुस्थानांत आज जशी जागृति झाली आहे तशीच ती दक्षिण आफ्रिकेमध्येंहि होईल; तेथील नैसर्गिक, खनिज व मानवी साधनसंपत्ति हिंदुस्थानांतल्या किती तरी पटीनें विपुल आहे. आफ्रिकेंतील बलवान् लोकांपुढें बलवान् इंग्रज हे ठेंगूसारखे आहेत. ते उदार हृदयाचे जंगली लोक आहेत असें तुम्ही म्हणाल. ते उदार हृदयाचे खास आहेत, पण जंगली नाहींत आणि थोड्याच वर्षांत पाश्चात्य देशांना आफ्रिकेंत आपला माल भरून टाकण्याला बाजारपेठ मिळणार नाहीं. जर पाश्चात्य देशांच्या बाबतींत कारखानदारीचें इतकें काळें भवितव्य आहे, तर हिंदुस्थानच्या बाबतींत तर तें अधिकच काळें असणार नाहीं काय ?"×

---

* १९४०–४४च्या महायुद्धापूर्वीचा हा लेख आहे.

× श्री० महादेवभाई देसाई यांच्या 'लंडनच्या पत्रां'तील उतारा. 'यंग इंडिया', १२–११–१९२१.

## बिकट प्रश्न

: : ३४

[ लेखकः—महादेव देसाई ]

एक कार्यकर्ता कांहीं प्रश्न घेऊन आला. हे प्रश्न पूर्वी अनेक वेळां चर्चिले गेले असले तरी त्याला अजूनहि सतावीत होते. "ब्रिटिश येथें येण्यापूर्वी या देशांत खादीहि होती आणि आमचे सुरेख अन्न-पदार्थहि होते; आणि तरीहि आमची दशा आजच्याहून कांहीं चांगली नव्हती, हें आपणांला माहीत असतांना आपण खादी आणि हितकर अन्नपदार्थ यांवर इतका भर कां देत आहां?" हा त्याचा पहिला प्रश्न.

गांधीजी म्हणाले, "'यंग इंडिया' आणि 'नवजीवन' तुम्हीं वाचलीं असतील तर त्यांत या प्रश्नाची मीं अगदीं पिंजून चर्चा केली आहे. तरी तुमच्यासाठीं मी तिचा सारांश थोडक्यांत सांगतों. आमच्याकडे खादी होती, पण आपण तिचें महत्त्व जाणत नव्हतों; आपण स्वयंपूर्ण होतों, पण त्याची अवश्यकता आपणांला पटलेली नव्हती. खादी-ग्रामोद्योग चालत होते तरी त्यांमागें जाणीव फारशी नव्हती आणि तेच आपणांला जगवीत आहेत हेंहि आपण ओळखलें नव्हतें. त्यामुळें जेव्हां ते आपल्या हातांतून नष्ट झाले तेव्हां आम्हांला चुकल्या-चुकल्यासारखें झालें नाहीं; आणि आज त्यांना पुनः प्रस्थापित करण्याचा प्रयत्न होत आहे तर त्याचा काय उपयोग होणार आहे याचें आमच्यापैकीं कित्येकांना नवल वाटत आहे."

"म्हणजे याचा अर्थ राजकीय शिक्षण आणि प्रचार यांची जरुरी आहे; आणि या गोष्टी तर तुम्ही निषिद्ध समजतां !"

"स्वावलंबन, आपल्या आहारांत सुधारणा, आपली जडता फेंकून देऊन आपल्या रिकाम्या वेळेचा जास्तींत जास्त चांगला उपयोग करणें या गोष्टींचे धडे लोकांना देण्याकरितां राजकीय प्रचाराची काय गरज ?"

कार्यकर्ता म्हणाला, " माझी अडचण ही आहे कीं, आमच्या खेड्यां-तील लोक सकाळीं उठल्यापासून रात्रीं निजेपर्यंत घटकेचाहि विसांवा न घेतां गाढवासारखे राबत आहेत तरी त्यांना पुरेसें खायला मिळत नाहीं. आणि तुम्ही तर त्यांना जास्तच कष्ट करायला सांगत आहां !"

## यंत्रांची तरफदारी : : ३५

[ लेखक:—महादेव देसाई ]

ग्रामोद्योगाची चळवळ यंत्राला नाबूद करण्यासाठीं निघाली आहे कीं नाहीं, असा सवाल यंत्राची तरफदारी करणाऱ्या एका समाजवादी मित्रानें गांधीजींना केला.

गांधीजी त्या वेळीं कांतीत बसले होते. त्यांनीं उत्तरादाखल प्रतिप्रश्न केला, "हा चरखाहि यंत्रच नव्हे काय ?"

"मला हें यंत्र म्हणावयाचें नाहीं; मोठ्या यंत्रांसंबंधीं मला म्हणावयाचें आहे."

"सिंगरचें शिवणयंत्र तुम्हांला म्हणावयाचें आहे काय ? ग्रामोद्योग—चळवळीनें त्याचेंहि रक्षण होईल; आणि तसें पाहिलें तर, बहुजनसमाजाची काम करण्याची संधि जें काढून घेत नाहीं पण जें व्यक्तीला मदत करतें आणि त्याच्या कार्य—कौशल्यांत भर घालतें, तसेंच ज्याचा गुलाम न बनतां मनुष्य पाहिजे तेव्हां जें हातांत घेऊं शकतो, अशा कोणत्याहि यंत्राला ग्रामोद्योग—चळवळीनें संरक्षण दिलें जातें."

"पण मोठमोठे शोध लागले आहेत त्यांचें काय ? तुम्ही विजेचा कांहींच उपयोग करून घेणार नाहीं काय ?"

" कोण म्हणतो असे ? खेड्यांतील प्रत्येक घरांत जर वीज आपल्याला पुरवितां आली, तर खेडेगांवच्या लोकांनीं आपलीं आउतें व हत्यारें खुशाल विजेच्या साह्यानें चालवावीं. पण मग जशीं कुरणें आज त्यांच्या ताब्यांत आहेत. तशी विजेचा पुरवठा करणाऱ्या कारखान्यांवरहि मालकी ग्रामपंचायतींची किंवा सरकारची राहील. पण जेथें वीजहि नाहीं आणि यंत्रेंहि नाहींत, तेथें रिकाम्या हातांना उद्योग कोणता ? त्यांना तुम्ही काम द्याल कीं त्या हाताच्या मालकांना काम नाहीं म्हणून ते तोडून टाकायला सांगाल ?"

"सर्वांच्या कल्याणाकरितां केलेला प्रत्येक शास्त्रीय शोध मी मोलाचा मानीन. शोधांशोधांतहि फरक असतो. एकाच वेळीं माणसांच्या झुंडीच्या झुंडी मारून टाकणाऱ्या प्राणघातक वायूची मला पर्वा असणार नाहीं. मनुष्य-श्रमावर करतां येणार नाहींत अशीं लोकोपयोगाचीं कामें करण्याकरितां लागणाऱ्या मोठ-मोठ्या यंत्रांना स्थान अवश्य आहेच आहे, पण त्या सर्वांवर मालकी सरकारची असेल आणि तीं सर्वस्वीं लोकांच्या हिताकरितांच वापरलीं जातील. पुष्कळांच्या जिवांवर थोड्यांना श्रीमंत करण्याकरितां किंवा उपयुक्त श्रम करणाऱ्या पुष्कळांना बेकार करण्याकरितां म्हणून असणाऱ्या यंत्रांविषयीं मात्र मला जिव्हाळा वाटणें मुळींच शक्य नाहीं.

" पण समाजवादी असून सुद्धा तुम्ही यंत्रांचा अविचारानें उपयोग करण्याला अनुकूल होणार नाहीं. छापखाने द्या. ते चालतीलच. ऑपरेशन करण्याचीं हत्यारें द्या. तीं हातांनीं कशीं बनवितां येतील ? त्यांसाठीं मोठीं यंत्रें लागणारच. पण," चरख्याकडे बोट करून गांधीजी म्हणाले, "निरुद्योगावर इलाज करणारें यावांचून कोणतेंच यंत्र नाहीं. तुमच्याशीं बोलत असतांनाहि मी तो चालवूं शकतों आणि त्यायोगें मी देशाच्या संपत्तींत थोडीफार भर टाकतों. या यंत्राला कोणीहि गिळंकृत करूं शकणार नाहीं."*

---

* २२-६-१९३५.

## स्वदेशी उद्योग व भेदभाव : : ३६

( लेखकः—महादेव देसाई )

नव्या घटनेंतील* भेदभाव करणारीं कलमें हा आजकाल बऱ्याच चर्चेचा विषय झाला आहे आणि तें स्वाभाविकहि आहे. कारण, नव्या घटनेच्या अनेक दुष्ट लक्षणांपैकीं तें एक आहे त्यामुळेंच संवराज्य पत्करण्याजोगें नाहीं. आज 'गांधी—आयर्विन करार' ज्याला म्हणतात त्या करारनाम्यांत 'हिंदुस्थानाच्या हिताच्या दृष्टीनें' हे शब्द घालण्याचा आग्रह धरतांना गांधीजींचा जो हेतु होता त्याविषयीं संशय राहणार नाहीं. त्या करारनाम्यांत हिंदी लोकांचा सर्व विदेशी दुकानांवर निरोधन ( पिकेटिंग ) करण्याचा अधिकार मान्य करणारें जें कलम होतें त्यानें या शब्दांवर आपोआपच टीका सुरू झाली. परदेशी कापडां-मध्यें ब्रिटिश कापडहि येतेंच; मग त्या सर्व कापडांच्या बहिष्कार याचा अर्थ ब्रिटिशांनीं तयार केलेल्या कापडाच्या बाबतींत भेदभाव असा आहे काय? लॉर्ड आयर्विन यांना तसें वाटलें नाहीं. ब्रिटिश उद्योगांचें संगोपन इतरांच्या नाशावर केलें जावें याकरितां जे इतर सर्व उद्योगधंदे मारले गेले किंवा मारल्यासारखे झाले त्यांच्या बाबतींतहि तीच गोष्ट लागू आहे. नव्हे, एका मित्रानें तर हीहि गोष्ट माझ्या ध्यानीं आणून दिली आहे कीं लॉर्ड आयर्विन यांनीं हें तत्त्व तर १९३१ सालीं मान्य केलें; पण १९१६ सालाइतक्या पूर्वीं सर विल्यम क्लार्क या हिंदुस्थान—सरकार-

* १९३५चा सुधारणा—कायदा.

च्या त्या वेळच्या व्यापार व उद्योगधंदे हें खातें संभाळणाऱ्या सभासदानेंहि तें मान्य केलें होतें ! औद्योगिक कमिशन नेमण्याच्या ठरावाला पाठिंबा देतांना ते म्हणाले होते, "भांडवल, ताबा आणि व्यवस्था हिंदी लोकांच्या हातीं असावयास पाहिजे अशा उद्योगधंद्यांची उभारणी करणें हेंच आमच्या दृष्टीपुढें असलेलें उद्दिष्ट आहे." आणि "आज दुरून तुमच्याशीं चढाओढ करणाऱ्या व आपल्या प्रवृत्ती हिंदुस्थानांत सुरू करून तुमच्याच देशांत तुमच्याशीं टक्कर देणाऱ्या कारखानदारानें" निर्माण केलेल्या परिस्थितीला आपला विरोध आहे असें त्यांनीं तेव्हां सांगितलें होतें.

हें सर्व एकदां कायमचें स्पष्ट व्हावें आणि या बाबतींत गांधीजींचें अधिकृत मत व स्वदेशी उद्योगधंद्यांविषयींची त्यांची व्याख्या समजून घ्यावी याकरितां सिंद्या स्टीम नॅव्हिगेशन कंपनीच्या तीन प्रतिनिधींनीं कांहीं दिवसांपूर्वीं शेगांव येथें त्यांची मुलाखत घेतली व इतर कित्येक गोष्टींप्रमाणेंच पुढील गोष्टींविषयीं त्यांना चिंता वाटत होती असें दिसलें.

१. भेदभाव करणारीं कलमें. 'यंग इंडिया'मध्यें प्रसिद्ध झालेल्या 'धिप्पाड राक्षस आणि ठेंगू' या लेखांतून त्यांनीं खालील विधानें उद्धृत केलीं:—

"...तेव्हां हिंदी हितसंबंध व इंग्रजांचे किंवा युरोपियनांचे हितसंबंध यांत भेदभाव असूं नये असें बोलणें म्हणजे हिंदुस्थानची गुलामगिरी चालूच ठेवणें होय. राक्षस आणि ठेंगू यांच्यामध्यें हक्कांची समानता कसची ? असमान असणाऱ्या दोघांत् सामानता आणण्याचा विचार करण्यापूर्वीं अगोदर ठेंगू मनुष्याला राक्षसाच्या उंचीचा केला पाहिजे.... या क्रियेला वर्णविषयक भेदभावाचें नांव देणें चुकीचें होईल. तसा कांहींच प्रश्न नाहीं. आपली विशेष हक्काची भूमिका सोडून जर ब्रिटिश आमच्याचसारखे होतील तर आमच्या देशांत प्रत्येक ब्रिटिश स्त्री–पुरुष–मुलाला पुरेसें स्थान आहे !" "जवळ जवळ जीवनाच्या प्रत्येक व्यवहारांत इंग्रज हा राज्यकर्त्यांच्या वर्गाचा असतो म्हणूनच केवळ त्याला विशेष हक्क भोगावयास मिळतात. हिंदुस्थानच्या व्यापाराचा व उद्योगधंद्यांचा नाश करून त्यावर तो वर चढला आहे असें म्हटलें तर त्याला

कोणाचा विरो होण्याची भीति नाहीं किंवा त्यांत अतिशयोक्तीहि नाहीं. लॅंके-शायरची भरभराट व्हांवी याकरितां हिंदुस्थानच्या गृहोद्योगांना ठार व्हावें लागलें. ब्रिटिशांचा जहाजांचा धंदा भरभराटावा याकरितां हिंदी जहाजांच्या धंद्याला नष्ट व्हावें लागलें."

जहाजांच्या धंद्याचें पुनरुज्जीवन होऊन तो स्वतंत्र हिंदुस्थानांत उत्कर्षाला पोंचावयाचा आहे कीं नाहीं ?

२. हिंदी किंवा स्वदेशी कंपन्या म्हणजे कोणत्या ? अगदीं संपूर्णपणें ब्रिटिशांच्या असलेल्या कारखान्यांना व कंपन्यांना "( इंडिया ) लिमिटेड" हे शब्द जोडून गाफील जनतेच्या डोळ्यांत धूळफेक करण्याची आजकाल पद्धतच पडून गेली आहे ? "लेव्हर ब्रदर्स ( इंडिया ), लिमिटेड." या कंपनीचे कारखाने हल्लीं हिंदुस्थानांत आहेत. आपण स्वदेशी साबण काढतों असें ते सांगतात आणि बंगालमधील लहानमोठ्या कितीएक साबण-कारखान्यांना त्यांनीं जमीनदोस्त केलेच आहे. दुसरी 'इंपीरियल केमिकल्स ( इंडिया ), लि०' ही कंपनी आहे, तिला फार मोठ्या सवलती मिळाल्या आहेत. हें परदेशी माल आमच्यावर लादणें नसून परदेशी उद्योगधंदे लादणें आहे !

३. तिसरें म्हणजे अशा कांहीं कंपन्या आहेत कीं, त्यांचें संचालक-मंडळ हिंदी आहे पण व्यवस्थापक-मंडळ ब्रिटिश आहे आणि तें संचालक-मंडळाला मार्गदर्शन करीत असतें. ज्या कंपनीचें भांडवल बव्हंशीं हिंदी आहे आणि संचालक-मंडळांतहि बहुसंख्य सभासद हिंदी आहेत, पण मॅनेजिंग डायरेक्टर किंवा मॅनेजिंग एजंट म्हणून एकादी हिंदीतर फर्म आहे, त्या कंपनीला तुम्ही 'स्वदेशी' म्हणाल काय ?

गांधीजींनी या सर्व मुद्द्यांची चर्चा बऱ्याच परिपूर्ण रीतीनें केली. त्यांनीं जीं उत्तरें दिलीं तीं थोडक्यांत त्यांच्याच शब्दांत खालीलप्रमाणें:—

"१. या मुद्द्याच्या बाबतींत मीं १९३१ सालीं लिहिलेल्या लेखाची आठवण तुम्हीं मला करून दिली हें ठीक झालें. अजूनहि माझीं मतें तींच आहेत. जेथें जेथें हिंदी हितसंबंधाच्या दृष्टीनें अवश्यक असेल तेथें तेथें परदेशी

हितसंबंधांच्या बाबतींत भेदभाव—तो शब्द वापरावयाचाच असेल तर—करण्याचा हक्क स्वतंत्र हिंदुस्थानाला आहे, याविषयीं मला बिलकुल शंका नाहीं.

"२. आतां स्वदेशी कंपनीच्या व्याख्येविषयीं बोलावयाचें तर, ज्या कारखान्यांवरील किंवा कंपन्यांवरील ताबा, ज्यांचें मार्गदर्शन आणि एखाद्या मॅनेजिंग डायरेक्टरतर्फे किंवा मॅनेजिंग एजंट्स म्हणून काम करणाऱ्या फर्मतर्फे ज्यांची व्यवस्था हिंदी हातांमध्यें आहेत तेच कारखाने किंवा कंपन्या स्वदेशी आहेत असें मी म्हणेन. हिंदुस्थानांत भांडवल किंवा तज्ज्ञ लोक मिळत नसतील तेव्हां, परदेशी भांडवल किंवा तज्ज्ञ त्यांची आपणांला गरज असेल तेव्हां वापरण्याला किंवा नेमण्याला मला हरकत वाटणार नाहीं; पण हें अशाच अटीवर झालें पाहिजे कीं हें भांडवल आणि हे तज्ज्ञ लोक सर्वस्वीं हिंदी लोकांच्या हुकमतीखालीं, मार्गदर्शनाखालीं आणि व्यवस्थेखालीं असले पाहिजेत आणि त्यांचा उपयोग हिंदुस्थानच्या हिताकरितांच झाला पाहिजे.

"पण परदेशी भांडवल किंवा बुद्धि वापरणें वेगळें आणि परदेशी औद्योगिक कारखाने लादणें वेगळें. या सर्वस्वीं भिन्न गोष्टी आहेत. तुम्हीं ज्या कंपन्यांचा आतां उल्लेख केला त्या अगदीं दूरान्वयानें सुद्धां स्वदेशी म्हणतां येणार नाहींत. अशीं साहसें अंगावर घेण्यापेक्षां व राष्ट्रांतील भांडवल आणि हातीं घेतलेलीं कामें अशा रीतीनें वाढूं देण्यापेक्षां सर्वच उद्योगधंदे भविष्य काळीं खुद्द हिंदी लोकांच्याच प्रत्यक्ष सत्तेखालीं, मार्गदर्शनाखालीं आणि व्यवस्थेखालीं उभारण्याकरितां सदर उद्योगधंद्यांची वाढ कांहीं वर्षांनीं लांबविणें बरें असें मला वाटतें.

३. या प्रश्नाचें उत्तर दुसऱ्या मुद्द्याला दिलेल्या उत्तरांत समाविष्ट आहे.*

---

* २६-३-१९३८.

## वर्धा–शिक्षण–योजनेचा अर्थ : : ३७

[ लेखकः–महादेव देसाई ]

डॉ० जॉन द् बेअर हे दक्षिण हिंदुस्थानांतील एका शैक्षणिक संस्थेचे प्रमुख आहेत. लांब मुदतीच्या रजेवर जाण्यापूर्वी ते वर्ध्याला आले होते. त्यांनीं वर्धा–शिक्षण–योजनेचा बारकाईनें अभ्यास केला आहे. त्यामुळें त्यांची श्री० आर्यनायकम् व काकासाहेब यांच्याशीं बरीच उपयुक्त चर्चा झाली. गांधीजींशींहि थोडा वेळ बोलावयाला मिळावें अशी त्यांची तीव्र इच्छा होती. 'ही योजना आपल्याला अतिशय पटली, कारण तिच्या मागें अहिंसा आहे', असें ते म्हणाले. पण अभ्यासक्रमांत अहिंसेला फार कमी स्थान कां दिलें अशी त्यांची शंका होती.

गांधीजी म्हणाले, "ज्या कारणामुळें तुम्हांला ही योजना पटली तें कारण अगदीं बरोबर आहे; पण सगळाच अभ्यासक्रम कांहीं अहिंसेवर केंद्रित करता येणार नाहीं. एका अहिंसक मेंदूंतून तो बाहेर पडला आहे एवढें ध्यानांत आलें म्हणजे पुरे. पण हा अभ्यासक्रम ज्यांनीं मान्य केला आहे त्यांनीं अहिंसाहि मान्य केली आहे असें मात्र त्या अभ्यासक्रमांत गृहीत धरलेलें नाहीं. उदाहरणार्थ, कमिटींतील सर्व सभासदांनीं अहिंसा आपला धर्म म्हणून मान्य केलेली नाहीं. एकाद्या शाकाहारी मनुष्याची अहिंसेवर श्रद्धा असलीच पाहिजे असें म्हणण्याचें जसें कारण नाहीं—प्रकृतीच्या दृष्टीनेंहि कदाचित् तो शाकाहारी असूं शकेल,

त्याचप्रमाणें ज्यांना ही योजना मान्य आहे ते सर्व अहिंसेविषयीं श्रद्धा बाळगणारेच असले पाहिजेत असेंहि नाहीं."

डॉ० जॉन द बोअर म्हणाले, "होय, शिक्षणाच्या कांहीं कैवाऱ्यांना ही पद्धति अहिंसक जीवन-दर्शनावर आधारलेली आहे म्हणूनच तिच्याशीं कांहीं कर्तव्य असणार नाहीं."

"मला तें माहीत आहे. पण तसेंच म्हणावयाचें झालें तर खादीहि माझ्या जीवनदर्शनावर आधारलेली असल्यामुळेंच कांहीं पुढारी मंडळी तिचा स्वीकार करावयाला तयार नाहींत. पण त्याला मी काय करणार ? या पद्धतीच्या गर्भांत खात्रीनें अहिंसा आहे आणि ती मी सहज दाखवूनहि देऊं शकतों, पण मी ती दाखवून देतों तेव्हां लोकांना त्यांत फार कमी उत्साह राहतो हेंहि मी जाणतों; तथापि जे या पद्धतीचा स्वीकार करतात ते, कोट्यवधि भुकेकंगाल लोक असलेल्या या भूमींत या लोकांच्या मुलांना दुसऱ्या कोणत्याहि पद्धतीनें तुम्ही शिकवूं शकणार नाहीं, आणि ही पद्धत जर तुम्ही चालू ठेवूं शकलां तर परिणामीं एक नवीन आर्थिक व्यवस्था निर्माण होईल ही वस्तुस्थितीहि स्वीकारतात, एवढें मला पुरें आहे. कॉंग्रेसचे लोक स्वातंत्र्यप्राप्तीचें साधन म्हणून अहिंसा स्वीकारतात, जीवनपद्धति म्हणून स्वीकारीत नाहींत, तरी तें नाहीं का मी पुरेसें मानीत ? तसेंच हें. सबंध हिंदुस्थाननें अहिंसेचा स्वधर्म आणि जीवनपद्धति म्हणून जर स्वीकार केला तर आपण त्वरित लोकसत्ता स्थापित करण्याला समर्थ बनूं."

"असें ? डॉ० द बोअर म्हणाले, "अजून एका गोष्टीचा मला उलगडा होत नाहीं. मी समाजवादी आहें आणि अहिंसेवर माझी श्रद्धा आहे म्हणून जरी ही पद्धत मला अत्यंत पसंत वाटते, तरी एक समाजवादी या नात्यानें मला असें वाटतें कीं, या पद्धतीनें हिंदुस्थान जगापासून सुटून वेगळा पडेल. आपल्याला तर सगळ्या जगाशीं संबद्ध रहावयाचें आहे आणि समाजवादा-खेरीज दुसऱ्या कशानेंहि तें होणार नाहीं."

"मला नाहीं त्यांत अडचण वाटत", गांधीजी म्हणाले, "आम्हांला जगाचा संबंध तोडून अलग व्हावयाचें नाहीं. आम्ही सर्व राष्ट्रांशीं मोकळेपणानें

आंतरव्यवहार ठेवूं. पण आजचा जबरदस्तीनें लादलेला आंतरव्यवहार मात्र नाहींसा झाला पाहिजे. आम्ही इतर राष्ट्रांना लुबाडूं इच्छीत नाहीं, तसेंच इतरांकडून लुबाडलें जाण्याचीहि आमची इच्छा नाहीं. या पद्धतीच्या साह्यानें सर्वच मुलें उत्पादन करणारीं होतील असें आम्ही पाहत आहों आणि अशा रीतीनें साऱ्या राष्ट्रांचें स्वरूपच आम्हांला बदलून टाकावयाचें आहे; कारण तें आमचें सबंध जीवन व्यापून टाकील. पण याचा अर्थ आम्ही जगापासून तुटून वेगळे पडतों असा मात्र नव्हे. कांहीं राष्ट्रें अशीं असतील कीं तीं अमुक वस्तू निर्माण करूं शकत नाहींत म्हणून त्यांना एकमेकांशीं देवघेव करावीशी वाटेल. त्या वस्तूंकरितां त्यांना इतर देशांवर अवलंबून राहावेंच लागेल; पण जे देश अशा रीतीनें पुरवठा करतील त्यांनीं त्या राष्ट्रांनां लुबाडतां मात्र कामा नये."

"परंतु इतर देशांकडून कांहींच घ्यावें लागणार नाहीं इतका साधेपणा जर तुम्हीं जीवनांत आणला तर मग त्या देशांपासून तुम्हीं तुटकच राहाल; पण मला तर तुम्हीं अमेरिकेकरितां सुद्धां जबाबदार राहावें असें वाटतें."

"तसें जबाबदार राहावयाचें असेल तर आम्ही लुबाडणें बंद केलें पाहिजे आणि इतरांनाहि आपल्याला लुबाडूं देतां कामा नये. कारण, मग अमेरिकाहि आमचाच कित्ता गिरवील आणि आमच्यामध्यें अनिर्बंधपणें देवघेव होण्याला अडचण पडणार नाहीं."

"पण तुम्ही तर जीवन अगदीं साधें करूं इच्छितां आणि औद्योगीकरण कमी करूं इच्छितां ?"

"तीन कोटी लोकांऐवजीं तीस हजारांच्या श्रमानें माझ्या देशाच्या सर्व गरजा मला भागवितां आल्या तर माझी कांहींच हरकत नाहीं; मात्र हे तीन कोटी लोक निरुद्योगी आणि बेकार होतां कामा नयेत. समाजवादी मंडळी दिवसांतून फक्त तास, दोन तास काम करावयाला लागावें इतकें अफाट औद्योगीकरण करूं इच्छितात तें मला नको आहे."

"माणसांना फुरसत मिळेल !"

"फुरसत काय हॉकी खेळायला ?"

"तेवढ्यासाठींच नव्हे तर, इतरहि कामांकरतां उदाहरणार्थ, उत्पादक हस्तव्यवसायासाठीं सुद्धां."

"उत्पादक हस्तव्यवसायांत त्यांनीं गुंतावें हें तर मी सांगतच आहें. पण रोजीं आठ तास हातांनीं काम करूनहि ते उत्पादन करतील."

"याचा अर्थ हाच कीं, प्रत्येक घरांत एक रेडिओ आणि प्रत्येकाजवळ एक मोटर असावी अशी स्थिति पुढेंमागें समाजांत निर्माण व्हावी हें तुमच्या दृष्टीपुढें नाहीं. प्रेसिडेंट हूव्हर यांचें हें सूत्र होतें. त्यांना तर एकच नव्हे तर दोन रेडिओ आणि दोन मोटरी प्रत्येक घरांत असाव्या अशी इच्छा होती.

"इतक्या मोटरी जर आमच्याजवळ झाल्या, तर चालायला आम्हांला फारच थोडा वाव राहील ?" गांधीजी म्हणाले.

"कबूल आहे मला. दर वर्षीं आमच्या देशांत ४०,००० लोक अपघातांनीं मरतात आणि याच्या तिप्पट लोक लंगडे पांगळे होतात."

"कांहीं म्हटलें तरी हिंदुस्थानांतील सर्व खेड्यांत रेडिओ होतील तो दिवस पहायला मी जगणार नाहीं."

"पंडित जवाहरलाल तर विपुलतेच्या अर्थशास्त्राच्या भाषेंत विचार क ात असें दिसतें."

"होय, मला माहीत आहे. पण विपुलता म्हणजे काय ? तुम्ही अमेरिकेंत जसा लक्षावधि टन गहूं नष्ट करून टाकतां, तशी शक्ति म्हणजे तर विपुलता नव्हे ना ?"

"हां, हें भांडवलशाहीचें फळ आहे. हल्लीं तेथें नाश करीत नाहींत, गहूं पिकवूंच नये म्हणून लोकांना पैसे देण्यांत येतात. अंड्यांची किंमत उतरल्यामुळें लोक अंडीं एकमेकांकडे फेंकण्याचा खेळ करीत असत."

"हेंच आम्हांला नको आहे. 'विपुलता' या शब्दानें जर तुम्हांला खाण्यापिण्याला भरपूर अन्न आणि अंगभर कापड, मन व बुद्धि यांवर संस्कार करण्याला भरपूर शिक्षण, असें म्हणावयाचें असेल तर मला संतोष आहे. पण पचेल त्याहून जास्त पदार्थ पोटांत कोंबणें आणि कधींकाळींहि चांगल्या रीतीनें मी उपयोग

करूं शकणार नाहीं अशा वस्तूंचा संग्रह करून ठेवणें हें मला पसंत नाहीं. तथापि मला हिंदुस्थानांत दारिद्य्र, कंगाली, दैन्य, गलिच्छपणा, धूळ हींहि नको आहेत.''

"परंतु पंडित जवाहरलाल आपल्या आत्मचरित्रांत म्हणतात कीं, तुम्ही दरिद्रि नारायणाची पूजा करतां आणि दारिद्य्राची तें चांगलें म्हणून स्तुति करतां.''

"मला माहीत आहे.'' हंसत हंसत गांधीजी म्हणाले.*

---

* १२-२-१९१८.

## ढिगांवारी उत्पादन वि० जनतेकडून उत्पादन : : ३८

( लेखकः—श्री० प्यारेलाल )

"ग्रामोद्योगांचें व हस्तव्यवसायांचें पुनरुज्जीवन ठीक आहे." एक तरुण गृहस्थ परवां उद्गारले, (आपल्या प्रतिपक्षाच्या निश्चित मताच्या बिनचूकपणापेक्षां त्याविषयींची त्याची कळकळ पाहून त्याला मोठी सूट देत असल्याचा भाव त्यांनीं आणला होता.) "कारण आमच्या खेड्यांतल्या दरिद्री लोकांचें जीवन तरी त्यामुळें सौंदर्यमय होईल; त्याची त्यांना फार जरुरी आहे. पण, महाशय, मि० जोन्सच्या शब्दांत बोलावयाचें तर प्रचंड प्रमाणावर उत्पादन केलें नाहीं तर आमच्या 'विस्तार पावत असणाऱ्या विश्वाचें' भागेल कीं नाहीं याची मला शंका आहे. छे, छे. प्रचंड प्रमाणावर उत्पादन आणि त्यावर जनतेचा ताबा यांतच राबणाऱ्या कोट्यवधि लोकांची आशा गुंतून राहिलेली आहे. त्याच्या जागीं गांधीजी काय आणणार आहेत ?"

या प्रश्नामुळें मला गांधीजींचें दुसऱ्या गोलमेज परिषदेच्या वेळीं लंडन येथें एका अमेरिकन वृत्तपत्राच्या वार्ताहराशीं यंत्राच्या बाबतींत जें बोलणें झालें होतें तें आठवलें. त्या वेळीं गांधीजी "जनसमुदायाकडून उत्पादन" असे शब्द बोलले होते तेच मीं त्याला पुनः ऐकविले.

या भेटीपूर्वी अदमासें एक वर्ष सदर अमेरिकन गृहस्थ अमेरिकेंत मि० फोर्ड यांना भेटले होते आणि त्यांच्याशीं बोलत असतां इतर गोष्टींबरोबरच

आजची युरोपची परिस्थिति प्रचंड उत्पादन चालू ठेवण्याला विरोधी आहे असें आपलें मत त्यांनीं नमूद केलें होतें. मि० फोर्ड म्हणाले होते कीं, ही परिस्थिति थोडक्याच काळांत अवश्यमेव बदलेल आणि स्वस्त वस्तूंची मागणी लवकरच होऊं लागेल.

"लोकांचें जीवनमान वाढविण्याचा हा सवाल आहे." असें फोर्ड शेवटीं म्हणाले होते.

या गृहस्थांनीं गांधीजींना विचारलें, "गांधीजी, आपणांला असें वाटतें काय कीं प्रचंड उत्पादनानें लोकांचें जीवनमान उंचावेल ?"

"माझा त्यावर बिलकुल विश्वास नाहीं," गांधीजींनीं उत्तर दिलें, "मि०फोर्ड यांच्या युक्तिवादामागें एक फार मोठी भ्रामक समजूत आहे. उत्पादन जितक्या प्रचंड प्रमाणावर होईल तितक्याच प्रचंड प्रमाणावर त्याच वेळीं विभागणीहि झाली पाहिजे. ती जर झाली नाहीं तर नुसत्या उत्पादनामुळें जगांत फार मोठें दुःख निर्माण होईल. फोर्ड यांच्याच मोटरगाड्या घ्या. 'आतां भरपूर झालें' अशी स्थिति आज ना उद्यां येणारच. त्या अवस्थेच्या पलीकडे जाऊन मोटरींचें उत्पादन करणें शक्य होणार नाहीं. मग काय बरें होईल ?

"प्रचंड उत्पादनांत ग्राहकाला खरोखर गरज किती आहे याची दखलच घेतली जात नाहीं. प्रचंड उत्पादन हाच जर मूलतः सद्‌गुण असेल तर तें किती जरी वाढविलें तरी वाढवितां आलें पाहिजे. पण प्रचंड उत्पादनाच्या पोटांतच त्याच्या स्वतःच्या मर्यादा असतात असें निश्चितपणें दाखवून देतां येईल. सर्व देशांनीं जर प्रचंड उत्पादनाची पद्धति घेतली तर त्यांच्या वस्तू तितक्या मोठ्या प्रमाणांत खपणार नाहींत. अर्थातच मग प्रचंड उत्पादनाला खीळ बसलीच पाहिजे."

"ही 'पुरे' म्हणण्याची स्थिति पाश्चात्य देशांत येऊन चुकली आहे असें तुम्हांला वाटतें कीं काय मला समजत नाहीं. मि० फोर्ड तर म्हणतात कीं उच्च दर्जाच्या वस्तू फाजील संख्येनें कधींहि निघूं शकत नाहींत. जगाच्या गरजा एकसारख्या वाढत आहेत आणि म्हणून बाजारांत एकाद्या वस्तूच्या बाबतींत

जरी ती पुरेपूर झाल्याची अवस्था गांठली गेली असली तरी सर्वच वस्तूंच्या बाबतींत तशीच अवस्था गांठली गेली असें कधींच होणार नाहीं."

"या विषयाची अधिक सविस्तर चर्चा न करतां मी माझें पक्कें झालेलें मत स्पष्टपणें सांगतों कीं, प्रचंड उत्पादनाच्या वेडामुळेंच जगावर अरिष्ट कोसळलें आहे. यंत्रांच्या योगानें मनुष्यजातीच्या सर्व गरजा पुरतील असें जरी क्षणभर गृहीत धरलें तरी त्यांमुळें उत्पादन कांहीं विशिष्ट क्षेत्रांतच केंद्रित होईल आणि विभाजनावर नियंत्रण ठेवण्याला तुम्हांला द्राविडी प्राणायाम करावा लागेल; पण जेथें वस्तूंची गरज आहे अशाच क्षेत्रांत वस्तूंचें उत्पादन आणि विभाजन दोन्ही होतील तर उत्पादनावर आपोआपच नियंत्रण बसेल आणि फसवाफसवीला कमी संधि मिळेल; सट्टेबाजीला तर मुळींच संधि मिळणार नाहीं."

त्या अमेरिकन गृहस्थांनीं मि० फोर्ड यांची कारखानदारीच्या विकेंद्रीकरणाची आवडती योजना सांगितली. कोळसा व वाफ यांऐवजीं तारा लावून विद्युच्छक्ति अगदीं दूरदूरच्या कोन्याकोपऱ्यापर्यंत खेळवावयाची, हा एक संभवनीय इलाज मि० फोर्ड मानतात असें त्यांनीं सांगितलें. ठिकठिकाणीं कारखाने असलेल्या व ते ग्रामपंचायतींनीं चालविलेल्या शेंकडों—हजारों टुमदार, मिनधुराच्या खेड्यांचें चित्र त्यांनीं रेखाटलें आणि शेवटीं गांधीजींना विचारलें, "हें सर्व शक्य आहे असें गृहीत धरलें, तर तुमचा विरोध कितपत कमी होईल ?"

"माझा विरोध कांहीं त्यामुळें कमी होणार नाहीं," गांधीजी म्हणाले, "कारण, तुम्ही असंख्य क्षेत्रांत वस्तूंचें उत्पादन कराल हें जरी खरें असलें तरी शक्ति एकाच विशिष्ट केंद्राकडून येणार व हें शेवटीं अनर्थकारक असल्याचें आढळून येईल असें मला वाटतें. त्याच्या योगें एका कार्यकर्त्या मानवी शक्तीच्या हातीं इतकी अमर्याद सत्ता सोंपविली जाईल कीं, त्याचा विचार सुद्धां मला भीतिदायक वाटतो. उदाहरणार्थ, त्या शक्तीकडे असा ताबा दिल्याचा परिणाम असा होईल कीं मला उजेड, पाणी, हवा इ० करितां सुद्धां त्या शक्तीवरच अवलंबून राहावें लागेल. व हें माझ्या मतें भयंकर आहे."

या बोलण्याचा त्या गृहस्थांच्या मनावर चांगलाच परिणाम झाला. ते उद्गारले, "गांधीजी, मला वाटतें कीं लंडनला तुम्हीं भेट देण्याला हीं अग

सुयोग्य वेळ आहे. कारण, राजकीय प्रश्न सोडून दिले तरी ही वेळ मला अशी दिसते कीं पाश्चात्य जगाचे डोळे यंत्रांच्या बाबतींत सर्वसाधारणपणें, आणि आम्हीं जर्मनी व अमेरिका येथें प्रचंड उत्पादनाची जी पद्धति बांधीत आणली आहे तिच्या बाबतींत विशेषेंकरून, उघडले आहेत; लोक गोंधळल्यासारखे झाले आहेत आणि यंत्रांना खरोखरीच कांहीं किंमत आहे का अशी शंका त्यांना येऊं लागून, 'आम्हीं शेवटीं त्यांचा अतिरेक तर केला नाहीं ना?' असें ते स्वतःला विचारूं लागले आहेत. यंत्रांच्या फाजील उपयोगामुळें जो प्रश्न उभा राहिला आहे तो सोडविण्याकरितां युरोप आणि अमेरिका यांनीं काय करावें यासंबंधीं आपली कांहीं कल्पना आहे का?"

"हीं राष्ट्रें जगांतील दुबळ्या किंवा असंघटित म्हटल्या जाणाऱ्या मानव प्रजांना लुबाडूं शकतात हें तुम्ही पाहतच आहां." गांधीजी म्हणाले, "एकदां का या लोकांना हें प्राथमिक ज्ञान होऊन आपण इतःपर कोणासहि लुबाडूं देणार नाहीं असें त्यांनीं ठरविलें कीं मग ते आपला आपल्याला जेवढा पुरवठा आपणांला करतां येईल तेवढ्यावरच संतुष्ट रहातील आणि जीवनाच्या अत्यवश्यक गरजांच्या बाबतींत तरी निदान प्रचंड उत्पादन बंद होईल."

"एक जागतिक संघटना करून?"

"होय."

"पण या मानवप्रजांना सुद्धां त्यांच्या गरजा जसजशा वाढतील तसतशी अधिकाधिक मालाची जरूर लागेल?"

"तशी लागली तर ते स्वतःच माल तयार करतील. आणि तसें जेव्हां होईल तेव्हां प्रचंड प्रमाणावरील उत्पादन—ज्या पारिभाषिक अर्थानें पश्चिमेकडे तें समजलें जातें त्या अर्थानें—थांबेल.

"तें त्या त्या स्थानीं होईल असाच ना आपल्या म्हणण्याचा अर्थ?"

"उत्पादन आणि खप हीं दोन्ही जेव्हां त्या त्या ठिकाणीं होऊं लागतात तेव्हां अनिश्चित स्वरूपाचें व वाटेल त्या किंमतीचें उत्पादन भरमसाट गतीनें वाढविण्याचा मोह नाहींसा होतो. मग त्याबरोबरच आमच्या आजच्या आर्थिक पद्धतीमुळें उत्पन्न झालेल्या अनंत अडचणी आणि बिकट

प्रश्न सर्व संपून जातील. प्रत्यक्षच उदाहरण घ्याः—इंग्लंड आज जगाचें कापड-दुकान आहे त्यामुळें व्यापारपेठ राखून ठेवण्याकरितां त्याला जग आपल्या गुलामगिरींत ठेवणें जरुरीचें असतें. पण जो बदल माझ्या दृष्टीपुढें आहे तो झाला तर इंग्लंड आपल्या साडेचार कोटी लोकसंख्येच्या प्रत्यक्ष गरजेइतकेंच उत्पादन करील. ती गरज भागली कीं उत्पादन थांबलेंच. कोणा लोकांना गरज असो अथवा नसो, त्याचा विचारहि न करतां आणि त्या लोकांना कंगाली येईल हें लक्षांतहि न घेतां केवळ जास्तींत जास्त सोनें ओढण्याच्या हेतूनें उत्पादन चालू ठेवलें जाणार नाहीं; मग कांहीं थोड्या लोकांच्या खिशांत कृत्रिम रीत्या सांठे जमणार नाहींत आणि इतर लोकांच्या बाबतींत मात्र विपुलता असूनहि दैन्य अशी अवस्था उत्पन्न होणार नाहीं. आज हें उदाहरण अमेरिकेंत घडत आहे. अमेरिका ही आपले सर्व प्रकारचे लहानलहान दागिने विकून किंवा आपलें अप्रतिम कसब विकून—अर्थात्च तें विकण्याचा तिला अधिकार आहे आज जगावर आपलें स्वामित्व टिकविण्याला समर्थ बनली आहे. प्रचंड प्रमाणावरील उत्पादनाची कमाल मर्यादा तिनें गांठली आहे आणि तरीहि ती बेकारी किंवा दैन्य नष्ट करूं शकलेली नाहीं. अमेरिकेंत कांहीं लोकांच्या जवळ उतू जाण्याइतकी संपत्ति असुन सुद्धां अजून असे हजारों, कदाचित् लाखों लोक तेथें आहेत कीं जे दैन्यांत दिवस कंठीत आहेत ? प्रचंड प्रमाणावरील यः उत्पादनानें सगळ्या अमेरिकन राष्ट्राचा कांहीं फायदा होत नाहीं.”

“याचा दोष विभाजनपद्धतीकडे आहे.” सदर वार्ताहर म्हणाले, “याचा अर्थ असा कीं आमची उत्पादनपद्धति जरी पूर्णत्वाच्या शेवटच्या बिंदूला पोंचली आहे. तरी विभाजन अजून दोषपूर्ण आहे. विभाजनांत जर समानता आणतां आली तर प्रचंड प्रमाणावरील उत्पादनांत जें वाईट असेल तें मरून जाणार नाहीं. काय ?”

“नाहीं,” गांधीजी म्हणाले, “वाईट आहे तें त्या पद्धतींत मुळांतच आहे. उत्पादन जर स्थानिक कारणापुरतें झालें तर विभाजन समान प्रमाणांत होऊं शकेल. म्हणजेच विभाजन आणि उत्पादन हीं दोन्हीं जोडीनें चाललीं पाहिजेत. जोंपर्यंत तुम्ही आपला माल खपविण्याकरतां जगाचे बाजार धुंडाळूं

वाचनालय

इच्छीत आहों तोंपर्यंत विभाजन समान होणार नाहीं. याचा अर्थ पाश्चात्य देशांनीं विज्ञानांत आणि संघटना-शास्त्रांत जी आश्चर्यकारक प्रगति केली आहे तिचा जगाला कांहीं उपयोग नाहीं असा नव्हे. याचा अर्थ एवढाच कीं, पाश्चात्य राष्ट्रांनीं आपलें कसब वापरलें पाहिजे. त्यांना आपल्या कसबाचा उपयोग मानव्याच्या दृष्टीनें जर परदेशांत करावयाचा असेल तर अमेरिका म्हणेल, 'चला, आम्हांला पूल कसे बांधावे हें माहीत आहे. आम्ही तें गुप्त ठेवणार नाहीं; आम्ही सार्‍या जगाला सांगूं कीं पूल कसे तयार करावयाचे तें आम्ही तुम्हांला शिकवितों, पण त्यासाठीं आम्ही तुमच्याकडून कांहींहि घेणार नाहीं.' अमेरिका म्हणते, 'जेथें इतर राष्ट्रें गव्हाचें एक पोतें पिकवूं शकतात तेथें आम्ही दोन हजार पिकवितों.' तर मग अमेरिकेनें ही कला शिकण्याची ज्यांना इच्छा आहे त्यांना विनामूल्य शिकवावी, पण सार्‍या जगाकरितां गहूं पिकविण्याची महत्त्वाकांक्षा मात्र धरूं नये. कारण त्यायोगें जगावर एके दिवशीं खरोखर दुःखच कोसळेल."

त्यानंतर त्या अमेरिकन सद्‌गृहस्थांनीं रशियाचा उल्लेख करून गांधी-जींना विचारलें, "तुमच्या म्हणण्याप्रमाणें कमी कारखानदारी असलेल्या राष्ट्रांना न लुबाडतां, किंवा असमान विभाजनाच्या खड्ड्यांत न पडतां प्रचंड प्रमाणावर उत्पादन करण्याची कला ज्यानें वाढविली असा रशिया देश नाहीं काय ? "

गांधीजी उतरले, "म्हणजेच दुसर्‍या शब्दांत, सरकारच्या ताब्यांत असलेल्या कारखानदारीवर—अथवा ज्या अर्थ-व्यवस्थेंत उत्पादन आणि विभाजन आज सोव्हिएट रशियांत चाललें आहे त्याप्रमाणें सरकारच्या ताब्यांत असतें व ज्याचें नियंत्रण सरकार करतें अशा पद्धतीवर—मीं आपलें मत व्यक्त करावें अशी तुमची इच्छा आहे. अर्थात् हा नवा प्रयोग आहे व अंतीं त्याला कितपत यश मिळेल हें मला सांगतां येणार नाहीं. हा प्रयोग जर जबरदस्तीवर आधारलेला नसता तर त्यावर मी फिदा झालों असतों. पण आज तो ज्याअर्थीं जबरदस्तीवर आधारलेला आहे त्याअर्थीं तो आपल्याला कोठवर आणि कोठें नेणार आहे हें मला माहीत नाहीं."

"तर मग 'प्रचंड प्रमाणावर उत्पादन' हें हिंदुस्थानचें आदर्श भवितव्य असें चित्र तुमच्या डोळ्यांपुढें नाहींच म्हणावयाचें !" अमेरिकन गृहस्थानें विचारलें.

"आहे, प्रचंड प्रमाणावर उत्पादन माझ्या डोळ्यांपुढें खात्रीनें आहे." गांधीजी म्हणाले, "पण जबरदस्तीवर आधारलेलें मात्र नाहीं. शेवटीं चरख्याचा संदेश तोच आहे. तेंहि प्रचंड प्रमाणावर उत्पादनच आहे, पण लोकांच्या घराघरामधून उत्पादन. एका व्यक्तीचें जेवढें उत्पादन त्याला कोटींनीं गुणलें तर तें प्रचंड प्रमाणावरील उत्पादनच नाहीं कां झालें? पण 'प्रचंड प्रमाणावरील उत्पादन' या पारिभाषिक शब्दांचा तुमचा ठरलेला अर्थ म्हणजे 'शक्य तितक्या कमी माणसांनीं गुंतागुंतीच्या यंत्रांच्या साह्यानें केलेलें उत्पादन' असा आहे हें मला पूर्ण समजलें आहे. मी स्वतःशींच म्हणतों कीं हें चुकीचें आहे. माझीं यंत्रें कोट्यवधि लोकांच्या घरांत ठेवतां येतील अशा अत्यंत प्राथमिक पद्धतीचीं असलीं पाहिजेत. दुसरी गोष्ट, माझ्या पद्धतीमध्यें श्रम हें माझें चालतें नाणें आहे, धातु नव्हे. जो कोणी आपले श्रम वापरूं शकतो त्याच्याजवळ तें नाणें आहे, संपत्ति आहे. तो आपल्या श्रमाचें रूपांतर कपड्यांत वा धान्यांत करतो. त्याला जर पॅराफिन तेल पाहिजे असलें आणि तें तर तो उत्पन्न करूं शकत नाहीं, तर तो आपलें वाढाव्याचें धान्य तें तेल मिळविण्याकरितां उपयोगांत आणतो. हा स्वतंत्र, न्याय्य आणि समानतेच्या संबंधावर आधारलेला श्रमाचा विनिमय आहे आणि म्हणून ती चोरी होत नाहीं. तुम्ही म्हणाल अदलाबदलीची "ही जुनाट पद्धति तुम्हीं परत आणली.' पण राष्ट्राराष्ट्रांमधला सारा व्यापार या अदलाबदलीच्या पद्धतीवरच उभा नाहीं का?

"या पद्धतीमुळें दुसरा एक काय फायदा होतो तो पाहा. तुम्हांला तो कितीहि पटींनीं वाढवितां येतो. पण केंद्रीभूत असलेलें उत्पादन तुम्हीं वाटेल तितकें वाढविलें कीं बेकारीच उत्पन्न होते. सुधारलेलीं यंत्रें आणल्यानें जे कामगार बेकार होतील त्यांना इतर धंद्यांत कामें मिळतील, असें तुम्ही म्हणाल. पण संघटित देशांत--जेथें कामें ठरलेलीं आणि मर्यादितच असतात तेथें--एका विशिष्ट प्रकारच्या यंत्रांचा उपयोग करण्याच्या बाबतींतच कामगार अतिशय वाकबगार झालेले असतात. तेथें ही गोष्ट अशक्य असते हें तुमच्याच अनुभवावरून तुम्हांला माहीत आहे. आज इंग्लंडांत तीन कोटींच्यावर लोक बेकार पडलेले नाहींत काय? परवांच मला एक प्रश्न विचारण्यांत आला होता: 'या तीन कोटी

बेकारांचें आज आम्ही काय करीत आहों ?' ते कांहीं एका दिवसांत कारखान्यांतून शेतावर जाऊं शकत नाहींत. हा फार मोठा प्रश्न आहे."

यावरून चर्चा शेतीमध्यें यंत्रें वापरण्याकडे वळली.

"यंत्रानें शेती केली तर, अमेरिकेंत आणि कानडा देशांत जसा फार मोठा फरक पडला, तसा हिंदुस्थानांत पडणार नाहीं काय ?" त्या अमेरिकन गृहस्थांनीं विचारलें.

"पडेल कदाचित्." गांधीजींनीं उत्तर दिलें, "पण हा प्रश्न असा आहे कीं, त्याला उत्तर द्यावयाला मी लायक नाहीं. इकडे हिंदुस्थानांत गुंतागुंतीचीं यंत्रें शेतीमध्यें वापरून आमचा आतांपर्यंत तरी फायदा झालेला नाहीं. आम्ही यंत्रांवर बहिष्कार घालीत नाहीं, आम्ही त्या बाबतींत सावधगिरी बाळगून प्रयोग करीत आहों. परंतु मोठ्या शक्तीनें चालणारीं शेतीचीं यंत्रें अवश्यक आहेत असें आम्हांला दिसून आलें नाहीं."

गांधीजी हे यंत्रमात्राचे उघड उघड शत्रु आहेत अशी कल्पना मनावर ठसवून घेऊन हे अमेरिकन गृहस्थ आणि त्यांच्याबरोबरचे सोबती आले होते. ते उद्गारले, "कांहीं लोकांच्या मनावर अशी छाप आहे कीं तुम्ही सर्वसाधारणपणें यंत्रांच्या विरुद्धच आहां. पण मला वाटतें हें खरें नाहीं."

"तें अगदीं चूक आहे", गांधीजी म्हणाले, "चर्खा हें सुद्धां यंत्रच आहे. ती एक सुंदर कलात्मक वस्तु आहे. सर्वत्र चालू शकणारें यंत्र कसें असावें. याचा हा नमुना आहे. बहुजनसमाजाला शोभणारें असें हें यंत्र आहे."

"तर मग तुम्ही यंत्रांच्या विरुद्ध आहां. ते त्यामुळें उत्पादन आणि विभाजन कांहीं थोड्या लोकांच्या हातीं केंद्रीभूत होतें म्हणून आणि तसें तें होते तेव्हांच. होय ना ?" शेवटीं अमेरिकन गृहस्थानें निष्कर्ष काढला.

"बरोबर आहे तुमचें म्हणणें मला विशेष हक्कांचा आणि मक्तेबाजीचा तिटकारा आहे. जें सर्वसाधारण जनतेबरोबर मिळत नाहीं तें मला निषिद्ध आहे. बस्स, एवढेंच." गांधीजी म्हणाले.*

*२–११–१९३४.

३६, भवानी पेठ